मराठी महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# महासागर

मुंबई कार्यालय
बोरा बाजार स्ट्रीट, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.
फोन : ०२२ ३१८५ ७७३५

पालघर कार्यालय
कार्यालय क्रमांक ४०९, पद्मीबाई, विरार रेल्वे सबवे समोर, विरार पूर्व., ता. वसई, जि. पालघर. ४०१ ३०५. मो. ९८९२९६८७२५.

नाशिक कार्यालय
'आनंदी', कोतवाल पार्क, टिळकवाडी, वेद मंदिरासमोर, धामणकर कॉर्नर, नाशिक ४२२००२. मो. ९८९०१०९९७८

वितरण
मो. नं. ८४२४९३६४३६

नाशिक | PRGI Reg. No.MHMAR/25/A0219 | शुक्रवार, ८ ऑगस्ट २०२५ | वर्ष: १ | अंक:७० | पाने-८ | किमत रू. २ + वितरण खर्च रू. १ एकूण रू.३

## लाडक्या बहिणींना हप्त्याचे वितरण

**कोल्हापूर , दि. ७ वृत्तसंस्था**

राज्यातील लाडक्या बहिणींना सरकारकडून मिळणाऱ्या हप्त्याची वाट पाहावी लागत असून १५०० रुपये बँक खात्यात कधी जमा होणार, याचीच वाट पाहिली जात आहे. आता, महिला व बालकल्याणमंत्री आदिती तटकरे यांनी लाडकी बहीण योजनेच्या हप्त्याबाबत माहिती दिली आहे. लाडकी बहीण योजनेचा रक्षाबंधन पूर्वसंध्येला हप्ता द्यायला सुरुवात होईल, अशी माहिती आदिती तटकरेंनी दिली. कालपासूनच पात्र लाभार्थ्यांना याचे वितरण सुरू झाले आहे, असेही त्यांनी सांगितले. विशेष म्हणजे गतवर्षी रक्षाबंधनाच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने २ महिन्यांचा हप्ता एकत्रितपणे दिल्याने महिलांना थेट ३ हजार रुपये मिळाले होते. मात्र, यंदा एकच हप्ता मिळणार आहे.

अग्राग्रलेख

## खरीखरी

### कबुतरांच्या पंखात आरोग्य


कबूतरांच्या बाबतीत उच्च न्यायालयाने निर्णय दिलेला आहे. गेली काही वर्ष कबुतरांना भर वस्तीमध्ये दाणे खाऊ घालण्याचा कार्यक्रम परंपरा किंवा धार्मिक कृती अथवा सेवेच्या नावाखाली सुरू असतो. कबूतर हा अत्यंत उपयुक्त प्राणी आहे असे जुन्या काळात म्हटले जायचे. कबूतर म्हणजे जुन्या काळातील डाकसेवा होती नळ आणि दमयंती यांच्या प्रेमाच्या कथेत राजहंस हा सुद्धा पक्षीच होता. तात्पर्य असे की पक्षांविषयी सहानुभूती, प्रेम आणि भूतदया सर्वांच्या मनात असतेच. त्यामुळे मुंबईसारख्या शहरात कबूतरखाने आहेत. अनेक श्रीमंतांच्या घरात म्हणजे गॅलरीत किंवा गच्चीवर कबुतरांसाठी खाद्यान्न पुरविले जाते. मात्र आता मुंबईच्या उच्च न्यायालयाने असा आदेश काढला आहे की, या कबुतरांना अशा प्रकारे सार्वजनिक ठिकाणी मोठ्या प्रमाणात दाणे खायला घालून त्यांची संख्या वाढवणे म्हणजे आसपास राहणाऱ्या मनुष्यांच्या आरोग्यासाठी हानीकारक आहे. उच्च न्यायालयाने नोंदवलेले हे मत म्हणजे कायदाच असतो. गेली काही दशके परंपरा आणि धार्मिक भावना म्हणून कबुतरांना दाणे टाकत राहणे हे धार्मिक किंवा पुण्यकर्म आहे असे समजून हे कार्य अजूनही सुरूच आहे. उच्च न्यायालयाच्या आदेशाला या लोकांचा विरोध आहे असे नाही. अनेकांना हे आदेश अजून ठाऊकच नाहीत, केवळ अज्ञानापोटी धार्मिक श्रद्धा म्हणून अजूनही दाणे टाकणे सुरूच आहे. न्यायालयासमोर पुरावे सादर झालेले आहेत त्यावरून न्यायालय म्हणते की, काही वर्षांपूर्वी सुरू झालेली परंपरा आणि धार्मिक भावनेपेक्षा लोकांचे आरोग्य महत्त्वाचे आहे. म्हणूनच त्या आदेशाचे उल्लंघन करू नका असे न्यायालयाने कठोरपणे म्हटलेले आहे. कोणतेही न्यायालय धार्मिक भावना दुखावतील असा आदेश देणार नाही. ज्या अर्थी न्यायालयाने हा आदेश दिलाय त्याअर्थी परिस्थिती निश्चितपणे गंभीर आहे. हे आपण मान्य करायलाच पाहिजे. जनतेच्या आरोग्याची आणि भावनांची काळजी घेणे हे सरकारचे कर्तव्य आहे पण आता सरकारच्या भूमिकेपेक्षा न्यायालयाच्या आदेशाला अधिक वजन आहे. सरकारी कायदे कसे मोडावे आणि त्यातून कसे बाहेर पडावे यासाठी काळे डगलेवाले तयारच असतात. पण भूतदया करून स्वर्गात स्थान मिळवण्याच्या उद्देशाने कबूतर खाण्याला खाना देणे सुरू आहे. त्यामुळे आपल्या मानवी आरोग्यावर परिणाम होतोच, असे दिसल्याने भूतदया, धर्मभावना या गोष्टींना अधिक चालना देण्यापेक्षा न्यायालयाच्या आदेशाचे पालन करावे. तसेच सरकारनेही लोक जागरणासाठी किंवा जागृतीसाठी याचा प्रचार करावा. एकूणच हा प्रश्न कितीही पारंपरिक आणि धार्मिक भावनेशी निगडित असला तरी ज्याप्रमाणे न्यायमूर्ती म्हणत आहेत त्याप्रमाणे धार्मिक, भावनिक गोष्टींपेक्षा जन आरोग्य जास्त महत्त्वाचे आहे. आरोग्याला कबुतरांच्या पंखात उडून जाऊ देऊ नका, हीच आजची शिकवण आहे.

nagpurpost@gmail.com
Mob.No.9922970023

# निवडणूक आयोगाकडून मतचोरी

**नवी दिल्ली, दि. ७ वृत्तसंस्था**

**निवडणूक आयोगाने मतांची चोरी केली आहे. महाराष्ट्रात काही महिन्यांत लाखो मतदारांची नावे यादीत जोडण्यात आली, जी गोष्ट खूपच चिंताजनक आहे. ४० लाख मतदार गूढ आहेत. पाच महिन्यांत येथे अनेक मतदार जोडले गेले. निवडणूक आयोगाने मतदार यादीबद्दल उत्तर द्यावे. मतदार यादी बरोबर आहे की चूक हे त्यांनी सांगावे. असा राहुल गांधी यांनी निवडणूक आयोगावर हल्लाबोल करीत निवडणूक आयोगाने भारतीय जनता पक्षाने संगनमताने निवडणूक चोरली असा गंभीर आरोप राहुल गांधी यांनी केला आहे.**




राहुल गांधी यांनी आपल्या सादरीकरणात गुरकिरत सिंग या बोगस मतदाराची माहिती दिली. एकाच मतदारसंघात वेगवेगळ्या मतदार याद्यात या मतदाराच्या नावाचा समावेश होता. ही यादीही राहुल गांधी यांनी दाखवली. तसेच याच मतदाराने चार विविध राज्यातही मतदान केल्याचे तिथल्या मतदार यादीतून दिसून येत असल्याचेही राहुल गांधी म्हणाले.

राहुल गांधी पुढे म्हणाले की, ११,९६५ बोगस मतदारांनी अनेकवेळा विविध राज्यातून मतदान केले आहे. या मतदारांची यादीही त्यांनी पत्रकार परिषदेत दाखवली. तसेच पुढे जाऊन त्यांनी खोटे पत्ते असल्याची मतदार यादी दाखवली. ज्यामध्ये अनेक मतदारांचा घराचा क्रमांक ० असल्याचे दाखवले. तसेच अनेक मतदारांच्या वडिलांचे नाव इंग्रजी आद्यक्षरावरून काहीही ठेवल्याचेही त्यांनी दाखवले.

राहुल गांधी सादरीकरण असताना वडिलांच्या नावावरून पत्रकारांमध्ये हशा पिकला. यावर राहुल गांधी म्हणाले की, तुम्हाला नक्कीच हे हास्यास्पद वाटत असेल. पण या अशा पद्धतीमुळे संपूर्ण यंत्रणाच उध्वस्त झाली आहे.

राहुल गांधी म्हणाले की, विविध राज्यांच्या निवडणुकीच्या आधी वातावरण वेगळे असायचे. ओपिनियन पोल आणि एक्झिट पोल वेगवेगळे होते. हरियाणा, महाराष्ट्र आणि मध्य प्रदेशमध्ये हे चित्र दिसले. निकालानंतर असे चित्र बनवले जायचे की, या या कारणामुळे भाजपाचा विजय झाला. जेव्हा बॅलेट पेपरवर निवडणूक घेतली जात होती. तेव्हा भारतात एका दिवसात निवडणूक व्हायची. पण आता ईव्हीएमने मतदान होऊनही अनेक टप्पे घेतले जातात. या सर्व कारणांमुळे आम्हाला निवडणूक प्रक्रियेवर पहिल्यांदा संशय बळावला. महाराष्ट्रात लोकसभेला आमच्या आघाडीला चांगले यश मिळाले. पण विधानसभेत सुपडा साफ झाला. कारण पाच महिन्यात महाराष्ट्रात एक कोटी मतदार वाढले, असा दावा राहुल गांधी यांनी केला.

**७० वर्षीय वृद्धेचा प्रथम मतदार म्हणून उल्लेख**

पत्रकार परिषदेत बोगस मतदारांची माहितीबरोबरच फॉर्म ६ चा दुरूपयोग झाल्याचा आरोप राहुल गांधींनी केला. यासाठी त्यांनी एका ७० वर्षीय वृद्ध महिलेचे उदाहरण दिले. या महिलेच्या नावाने दोन वेळा फॉर्म ६ भरण्यात आला होता. तसेच त्यांच्या नावाने दोन वेळा मतदान झाल्याचेही राहुल गांधी यांनी दाखवून दिले. ३३,६९२ मतदारांची एका मतदारसंघात अशाप्रकारे नोंदणी झाल्याचे गांधी यांनी दाखवले. या सर्व उमेदवारांचे वय ७० ते ९५ वर्षांच्या घरात असल्याचेही ते म्हणाले.

### राहुल गांधी यांनी आरोपांसह उघड केला प्रक्रियेतील घोटाळा

### २४ तासांत स्वाक्षरीसह शपथपत्र द्या निवडणूक आयोगाचे राहुल गांधींना आदेश

मतदार यादीत अपात्र मतदारांचा समावेश आणि पात्र मतदारांना हटवण्याबाबत केलेल्या आरोपांबाबत सहीनिशी शपथपत्र सादर करण्याचे आदेश कर्नाटक निवडणूक आयोगाच्या आयुक्तांनी दिले आहेत. त्यासाठी निवडणूक आयोगाने राहुल गांधी यांना शुक्रवारी दुपारी ३ वाजेपर्यंतची मुदत दिली आहे. याबाबत निवडणूक आयोगाने प्रसिद्ध केलेल्या पत्रकामध्ये म्हटले आहे की, राहुल गांधी हे मतदार यादीतील कोणत्या नावांना बनावट मानतात, त्यांचा पार्ट क्रमांक आणि सिरियल नंबर काय आहेत. तसेच हे दावे ते वैयक्तिक माहितीच्या आधारावर देह आहेत, हे त्यांनी स्पष्ट केले पाहिजे. तसेच राहुल गांधी यांनी दिलेली माहिती खोटी आढळल्यास त्यांच्यावर आरपी ॲक्ट १९५० च्या कलम ३१ आणि भारतीय न्याय संहिता २०२३ च्या कलम २२७ अंतर्गत कायदेशीर कारवाई केली जाऊ शकते.



# मला मोठी किंमत मोजावी लागेल, पण मी तयार आहे

### ट्रम्प यांच्या ५० टक्के टॅरिफवर पंतप्रधान मोदींचे सडेतोड उत्तर

**नवी दिल्ली, दि. ७ वृत्तसंस्था**

भारत रशियाकडून तेल खरेदी करत असल्यामुळे अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी बुधवारी भारतावर २५ टक्के अतिरिक्त आयात शुल्क (टॅरिफ) लादत असल्याची घोषणा केली. ट्रम्प यांनी याआधी जाहीर केलेले २५ टक्के शुल्क लागू होण्याच्या १४ तास आधी ट्रम्प यांनी हा नवा आदेश काढला आहे. आधीच्या २५ टक्के आयात शुल्काची अंमलबजावणी आजपासून सुरू झाली आहे, तर अतिरिक्त कराची अंमलबजावणी व्हाइट हाऊसमधून आदेश निघाल्यापासून २१ दिवसांनी केली जाईल.

दरम्यान, यावर भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पहिली प्रतिक्रिया दिली आहे. मोदी यांनी ट्रम्प यांच्या अरेरावीला संयमी उत्तर दिलं आहे. मोदी म्हणाले, "भारत आपल्या शेतकऱ्यांच्या, पशूपालकांच्या, मच्छिमारांच्या हिंतांबाबत कुठल्याही प्रकारची तडजोड करणार नाही." मोदी यांची ही टिप्पणी थेट वॉशिंग्टनसाठी संदेश असल्याचं मानलं जात आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले, "भारत आपल्या शेतकऱ्यांच्या, पशूपालकांच्या, मच्छिमारांच्या हितांच्या बाबतीत कुठल्याही प्रकारची तडजोड करणार नाही. मला जाणीव आहे की यासाठी मला मोठी किंमत मोजावी लागेल. परंतु, मी त्यासाठी तयार आहे. भारत आपल्या शेतकऱ्यांचा पाठीशी खंबीरपणे उभा आहे. त्यांच्या कल्याणासाठी मी प्रत्येक आव्हानाला तोंड देण्यासाठी तयार आहे." वाढत्या आंतरराष्ट्रीय दबावाला न जुमानता मोदी यांनी ग्रामीण भारताच्या, खेड्यांमधील समुदायांच्या संरक्षणाच्या जबाबदारीबाबतचा सरकारचा निर्धार मोदी यांनी यावेळी अधोरेखित केला.

## व्यायामासाठी गेलेल्या सहा मुलांना भरधाव ट्रकने चिरडले, चौघांचा जागीच मृत्यू

**गडचिरोली, दि. ७ प्रतिनिधी**

गडचिरोलीमध्ये भीषण अपघात झाल्याची माहिती समोर आली आहे. भरधाव ट्रकने ६ मुलांना चिरडल्याची माहिती आहे. या अपघातात ४ जणांचा मृत्यू झाला आहे. तर दोघांना नागपुरच्या रूग्णालयांमध्ये हलवण्यात आलं आहे. गडचिरोली- नागपूर राष्ट्रीय महामार्गावरील काटली येथे ही भीषण अपघाताची घटना घडली आहे. सहाही मुलं रस्त्यावर व्यायाम करत असताना अज्ञात ट्रकची जोरदार धडक बसली. दोन मुलांचा जागीच मृत्यू तर दोघांचा गडचिरोलीच्या रुग्णालयात मृत्यू झाला आहे. या अपघातानंतर काटली गावात शोककळा पसरली आहे, मिळालेल्या माहितीनुसार सहाही मुलं रस्त्यावर व्यायाम करत होती, त्याचवेळी अज्ञात ट्रकची जोरदार धडक बसल्याने दोन मुलांचा जागीच मृत्यू झाला. तर दोघांचा गडचिरोलीच्या रुग्णालयात उपचारांसाठी नेण्यात आलं मात्र उपचारादरम्यान दोघांचा मृत्यू झाला आहे. तर आणखी दोघांना नागपुरच्या रूग्णालयात हलवण्यात आलं आहे, या अपघातानंतर काटली गावात शोककळा पसरली आहे, संतप्त गावकऱ्यांकडून राष्ट्रीय महामार्गावर चक्काजामचा प्रयत्न करण्यात आला.

## प्रांजल खेवलकरांच्या मोबाईलमध्ये महिलांचे नग्न फोटो -चाकणकर

**पुणे, दि. ७ प्रतिनिधी**

पुण्यातील खराडी येथील रेव्ह पार्टी प्रकरणी माजी मंत्री एकनाथ खडसे यांचे जावई प्रांजल खेवलकर यांना पोलिसांनी अटक केली होती. सध्ये ते तरुंगात आहेत. या रेव्ह पार्टीत पोलिसांनी गांजासदृश पदार्थ, दारुच्या बॉटल्स जप्त केल्या होत्या. या प्रकरणात आता राज्य महिला आयोगानेही उडी घेतली आहे. या प्रकरणाचा महिलांची तस्करी या दृष्टीनेही तपास करावा अशी मागणी महिला आयोगाने पोलिसांकडे केले आहे. असे असतानाच आता राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांनी थेट पत्रकार परिषद घेऊन एकनाथ खडसे यांच्या जावयावर गंभीर स्वरुपाचे आरोप केले आहेत. खेवलकरांच्या मोबाईलमध्ये महिलांचे आक्षेपार्ह फोटो आहेत, असं असा खळबळजनक दावा चाकणकर यांनी केला आहे.

रुपाली चाकणकर यांनी पत्रकार परिषद घेऊन मोठे दावे केले आहेत. पुण्यातील रेव्ह पार्टी प्रकरणात प्रांजल खेवलकर, निखील पोपटाणी, समीर फकीर मोहम्मद सय्यद, सचिन भोबे, श्रीपाद मोहन यादव तसेच त्यांच्यासोबत असलेल्या दोन महिला यांना पुण्यात ताब्यात घेण्यात आले होते. पार्टीच्या ठिकाणाहून ४१ लाख ३५ हजार किमतीचा कोकने, गांजा, दहा मोबाईल, हुक्का पॉट, दारुच्या बॉटल तसेच इतर अमली पदार्थ जप्त करण्यात आले होते, अशी माहिती चाकणकर यांनी दिली. प्राजंल खेवलकर यांच्या पुण्यातील हडपसर येथील घरातून एक मोबाईल जप्त करण्यात आला होता. या मोबाईलचे सायबर तज्ज्ञांच्या मदतीने तांत्रिक विश्लेषण करण्यात आले आहे. या मोबाईलच्या हिडन फोल्डरमध्ये महिलांसोबतच्या चॅटिंगचे स्क्रीनशॉट, पार्टीचे फोटो, व्हिडीओ तसेच महिलांचे नग्न आणि अर्धनग्न फोटो, अशोभनीय कृत्यांचे व्हिडीओ हाती लागले आहेत, अशी खळबळजनक माहिती रुपाली चाकणकर यांनी दिली.

## देशात अघोषित एनआरसी लागू केला आहे का ? - उद्धव ठाकरे

**नवी दिल्ली, दि. ७ वृत्तसंस्था**

शिवसेना यूबीटी पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी दिल्लीत एका पत्रकार परिषदेत घेत महाराष्ट्र आणि देशाच्या राजकीय परिस्थितीवर आपली भूमिका स्पष्ट केली. यावेळी त्यांनी केंद्र आणि राज्य सरकारवर अनेक मुद्द्यांवरून टीका केली. उद्धव ठाकरे यांनी केंद्र सरकारच्या धोरणांवरही कडाडून टीका केली. बिहारमध्ये सध्या सुरु असलेल्या मतदार याद्यांच्या घोळावरही त्यांनी भाष्य केलं.

उद्धव ठाकरे यांनी म्हटलं की, बिहारमध्ये निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर मतदार याद्यांचा घोळ झाला आहे. त्याबाबतचा निर्णय आला की नाही याची कल्पना नाही. मात्र स्वत:ची ओळख मतदारांनी पटवून द्यायची. म्हणजेच याचा अर्थ असा की, देशात अघोषित एनआरसी लागू झाला का? देशात जेव्हा सीएए आणि एनआरसी विषय गाजला होता. दिल्लीत त्याच्यावरून रान पेटलं होतं. साधारण त्यावेळी विषय हाच होता, तुम्ही तुमची ओळख पटवून द्या. त्यामुळे देशाता आता एनआरसी लागू झाला आहे का? याचं स्पष्टीकरण निवडणूक आयोगाने द्यावं, असं उद्धव ठाकरे यांनी म्हटलं.

एकनाथ शिंदे यांच्या दिल्लीतील भाजप नेत्यांसोबतच्या बैठकीबद्दल विचारले असता, उद्धव ठाकरे यांनी शिंदे गटाला थेट 'गद्दार' म्हटले. "बाळासाहेबांना ज्यांनी विरोध केला, त्याच मार्गावर शिंदे गट गेला आहे. त्यांच्या मताला काहीच किंमत नाही. शिंदे त्यांच्या 'मालकांना' भेटायला दिल्लीत आल्याची उपरोधिक टीकाही त्यांनी केली.

## नागरिकांचे आरोग्य महत्त्वाचे, आदेशाचा अवमान करू नका- मुंबई उच्च न्यायालय

**मुंबई, दि. ७ प्रतिनिधी**

मुंबईतील कबुतरखाने बंद केल्यानंतर हा मुद्दा चिघळला आहे. दादरमधील कबुतरखाना परिसरात पोलीस आणि नागरिकांमध्ये झटापट झाल्याचेही दिसले. त्यामुळे राज्य सरकारनेही मवाळ भूमिका घेत कबुतरांना मर्यादित स्वरुपात खाद्य पुरवठा करण्याचा निर्णय घेतला. पण, आता मुंबई उच्च न्यायालयाने कबुतरखाने बंद ठेवण्याचा निर्णय कायम ठेवत मुंबई महापालिका आणि राज्य सरकारला झटका दिला आहे.

पावसाळी अधिवेशनामध्ये मुंबईतील कबुतरखान्यांमुळे नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न उद्भवत असल्याचा मुद्दा उपस्थित झाला होता. कबुतराच्या विष्ठेमुळे दुर्मिळ आजार होत असल्याच्या मुद्द्यानंतर मुंबईतील कबुतरांना खाद्य टाकण्यास आणि कबुतरखाने बंद करण्याचा निर्णय घेतला गेला. पण, त्याला आता विरोध



सुरू झाला आहे.

मुंबई उच्च न्यायालयात कबुतरखान्यांसंदर्भात गुरुवारी सुनावणी झाली. यावेळी न्यायालयाने कबुतराखान्यांमुळे नागरिकांच्या आरोग्याला धोका असल्याचे सांगत कबुतरखाने बंदीचा निर्णय कायम ठेवला.

न्यायालय म्हणाले, "कबुतरांसाठी पर्यायी जागेचा विचार केला जाऊ शकतो. कबुतरखान्यांच्या आजूबाजूने हजारो लोक येतात जातात. त्यांच्या आरोग्याचा प्रश्न आहे. या सगळ्या प्रकरणाला कुठलाही वेगळा रंग देण्याची गरज नाही. आमच्यासाठी नागरिकांचं आरोग्य महत्त्वाचं आहे. कबुतरखान्यांवर बंदीचा आधीचा निर्णय कायम असेल", असे सांगत कबुतरांना खाद्य आणि पाणी देण्याची बंदी न्यायालयाने कायम ठेवली आहे.

"वैद्यकीय अहवाल मागवण्यात आला होता. तज्ज्ञ डॉक्टरांच्या समितीच्या अहवालात गंभीर आजाराची लक्षणे दिलेली आहेत. त्याचा विचार करून नागरिकांचे आरोग्य सगळ्यात महत्त्वाचे आहे. त्यामुळे आम्ही हा निर्णय दिला. हाच निर्णय कायम असेल. आमच्या निर्णयाचा अवमान कुणीही करू नये. यावर आक्षेप असेल, तर तुम्ही वरच्या न्यायालयात दाद मागू शकता", असेही न्यायालयाने सुनावले.

"तज्ज्ञ समिती नेमून सखोल अभ्यास करावा. समितीने नागरिकांचे हित डोळ्यासमोर ठेवून अभ्यास करावा. नागरिकांच्या आरोग्याचं रक्षण करणे हे महापालिकेचे कर्तव्य आहे. कबुतरांसाठी पर्यायी जागेचा विचार केला जाऊ शकतो", असेही न्यायालयाने स्पष्ट केले.

## प्रधानमंत्री पीक विमा योजना

www.pmfby.gov.in

UIN: IRDAN126RP0001V01201617

(भारत सरकार व महाराष्ट्र शासनाची योजना, एआयसी द्वारा लागू)

फसल बीमा कराओ सुरक्षा कवच पाओ

खरीप 2025

विविध नैसर्गिक आपत्तींमुळे नुकसानीपासून शेतकऱ्यांना आर्थिक संरक्षण देण्याच्या दृष्टिकोनातून राज्यात प्रधानमंत्री पीक विमा योजना राबविण्यात येत आहे.

**खरीप हंगाम विमा योजनेतील पिके:** भात (धान), खरीप ज्वारी, बाजरी, नाचणी (रागी), मका, तूर, मूग, उडीद, सोयाबीन, भुईमूग, तीळ, कारळे, कापूस व कांदा या अधिसूचित पिकांसाठी, अधिसूचित क्षेत्रातील शेतकऱ्यांना भाग घेता येईल.

महत्त्वाच्या बाबी



- अंतिम मुदत: १४ ऑगस्ट २०२५
- योजनेत भाग घेण्यासाठी शेतकऱ्याचा ॲग्रीस्टॅक नोंदणी क्रमांक आणि ई पीक पाहणी बंधनकारक आहे.
- अधिसूचित क्षेत्रात अधिसूचित पिके घेणारे सर्व शेतकरी या योजनेत भाग घेऊ शकतात.
- कर्जदार आणि बिगर कर्जदार शेतकऱ्यांना योजनेतील सहभाग ऐच्छिक आहे.
- ई पीक पाहणी व विमा घेतलेले पीक यात तफावत आढळल्यास विमा अर्ज रद्द होईल व भरलेला विमा हप्ता जप्त होईल.
- विमा अर्ज भरण्यासाठी प्रति शेतकरी सीएससी विभागास रुपये ४० मानधन केंद्र शासनाने निर्धारित करून दिले आहे. ते संबंधित विमा कंपनी मार्फत सीएससी विभागात दिले जाते त्यामुळे शेतकऱ्यांनी त्यांचा विमा हप्ता व्यतिरिक्त इतर शुल्क सीएससी चालक यांना देऊ नये.
- एखाद्या अर्जदाराने बोगस किंवा फसवणूक करून विमा योजनेचा लाभ घेण्याचा प्रयत्न केल्यास त्यांना पुढील किमान पाच वर्ष काळ्या यादीत टाकून शासनाच्या कोणत्याही योजनेचा लाभ मिळणार नाही.
- मंजूर नुकसान भरपाई अर्जदार यांचे आधार संलग्न बँक खात्यात थेट केंद्र शासन पोर्टलवरून जमा करण्यात येणार आहे.
- सर्व पिकांसाठी जोखीम स्तर ७० टक्के.

### उंबरठा उत्पादन

अधिसूचित क्षेत्रातील अधिसूचित पिकांचे उंबरठा उत्पादन हे मागील सात वर्षातील सर्वाधिक उत्पादनाची पाच वर्षांच्या सरासरी उत्पादन गुणिले त्या पिकाचा जोखीम स्तर विचारात घेऊन निश्चित केला जातो.

### विमा संरक्षणाच्या बाबी:

पीक पेरणी पासून काढणी पर्यंतच्या कालावधीत विविध नैसर्गिक घटक कीड व रोगांचा प्रादुर्भाव इत्यादी कारणांमुळे पीक कापणी प्रयोगाद्वारे येणारे सरासरी उत्पादन हे त्या महसूल मंडळासाठीच्या उंबरठा उत्पादनापेक्षा कमी आल्यास त्या महसूल मंडळामधील त्या पिकाचा विमा घेतलेल्या सर्व शेतकऱ्यांना समप्रमाणात नुकसान भरपाई मिळणार आहे.

### विमा योजनेत सहभागी होण्याकरिता शेतकऱ्याने काय करावे?

अधिसूचित क्षेत्रातील अधिसूचित पिकासाठी पीक कर्ज घेतलेल्या शेतकऱ्यास या विमा योजनेत सहभाग बंधनकारक नाही. त्यासाठी शेतकऱ्याने विमा योजना भाग घेण्याच्या अंतिम दिनांक आधी किमान सात दिवस आधी संबंधित बँकेस विमा हप्ता न भरणे बाबत लेखी कळवणे गरजेचे आहे.

बिगर कर्जदार शेतकऱ्याने आपला ॲग्रीस्टॅक नोंदणी क्रमांक, ७/१२ चा उतारा, बँक पासबुक, आधार कार्ड आणि पीक पेरणीचे स्वयंघोषणापत्र घेऊन प्राधिकृत बँकेत विमा अर्ज देऊन व हप्ता भरून सहभाग घ्यावा. याशिवाय कॉमन सर्विस सेंटर (सीएससी) च्या मदतीने आपण विमा योजनेत सहभाग घेऊ शकता किंवा www.pmfby.gov.in या पोर्टलचे सहाय्य घेऊ शकता. भाग घेतलेल्या शेतकऱ्याने नंतर ई पीक पाहणी नोंद पूर्ण करावी

योजनेच्या माहितीसाठी संपर्क पीक विमा योजनेच्या अधिक माहितीसाठी किंवा नुकसान भरपाई माहितीसाठी केंद्र शासनाचे कृषी रक्षक पोर्टल हेल्पलाइन १४४४७ वर संपर्क करावा, किंवा संबंधित विमा कंपनी प्रतिनिधि, स्थानिक कृषी विभाग कार्यालयाशी संपर्क साधावा

**जिल्हे:** अहिल्यानगर, नाशिक, चंद्रपूर, सोलापूर, जळगाव, सातारा, वाशिम, बुलढाणा, सांगली, नंदुरबार, परभणी, वर्धा, नागपूर, नांदेड, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, हिंगोली, अकोला, धुळे, पुणे, जालना, गोंदिया, कोल्हापूर, छत्रपती संभाजीनगर, भंडारा, पालघर, रायगड, यवतमाळ, अमरावती, गडचिरोली

**विमा कंपनी:** एग्रीकल्चर इन्शुरन्स कंपनी ऑफ इंडिया लिमिटेड

अधिक माहितीसाठी QR Code स्कॅन करावा.



HO/25-26/1A/16

भारतीय कृषी बीमा कंपनी® | AGRICULTURE INSURANCE COMPANY OF INDIA LTD

AIC कृषक सत्य रक्षणम् ग्रामीण अर्थव्यवस्था के संरक्षक

मुंबई क्षेत्रीय कार्यालय: "लोक चेंबर्स", मरोळ मरोशी रोड, मरोळ, अंधेरी (पूर्व), मुंबई-४०००५९ | मुख्य कार्यालय: प्लेट B & C, ५ वा मजला, ऑफिस ब्लॉक १. ईस्ट किडवाई नगर, नवी दिल्ली-११००२३
ईमेल: pikvima@aicofindia.com, वेबसाईट: www.aicofindia.com | सीआयएन: U74999DL2002PLC118123, आयआरडीएआय: 126
aicofindialtd aicofindia aicofindia

कृषि रक्षक पोर्टल हेल्पलाइन १४४४७

*केवळ जाहिरात

* केवळ जाहिरात (योजनेच्या सर्व अटी व शर्ती लागू). | फसल हो या कृषि संपदा । बीमा सुरक्षा हमारा वादा ।। | विमा आग्रहाची विषय वस्तू आहे





# || जोतिर्लिंग- भिमाशंकर ||



अध्यात्म
दिलीप देशपांडे
जामनेर, जिल्हा जळगाव
८९९९५६६९१७

भारतातील बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक भीमाशंकर हे पुणे जिल्ह्याच्या खेड तालुक्यात आहे. भगवान शंकराचे प्रसिद्ध ज्योतिर्लिंग आहे. मोटेश्वर महादेव म्हणून हे शिवलिंग ओळखले जाते. या मंदिरा शेजारीच कमळजा मंदिर आहे .कमळजा म्हणजे पार्वतीचाअवतार असून येथेही भाविकांची गर्दी असते. श्रावणी सोमवार,संपूर्ण श्रावण महिना आणि महाशिवरात्र या दिवशी येथे भाविकांची खूप गर्दी असते तसेच वर्षभर पूर्ण भारतभरातून तसेच परदेशातून अनेक भाविक यात्रा कंपनीमार्फत भीमाशंकर येथे ज्योतिर्लिंगाचे दर्शन घेण्यासाठी येत असतात. पुण्यापासून हे ठिकाण साधारणपणे 110 ते 120 किलोमीटर आहे. या ज्योतिर्लिंगामधून पश्चिम महाराष्ट्रातील प्रमुख नद्यांपैकी भीमा नदी उगम पावते. परंतु, ती तिथून गुप्त होते आणि मंदिरापासून जंगलात साधारणपणे १.५ किमी पूर्वेला पुन्हा प्रकटते असे मानले जाते.

भीमाशंकर हे ठिकाण सह्याद्रीच्या प्रमुख रांगेत असून अतिशय घनदाट अरण्याने वेढले गेले आहे. १९८४ साली या अरण्याची अभयारण्य म्हणून घोषणा झाली. या अरण्यात अनेक पक्षी आणि निरनिराळ्या प्रकारचे प्राणी आढळतात. सांबर, बिबट्या,चित्ते, रानमांजर,तसेच उडणारी खार म्हणजे शेकारू येथे आढळतात. अतिशय घनदाट जंगल, निसर्ग परिसर आणि तीर्थक्षेत्रामुळे भीमाशंकर हे पुणे जिल्ह्यातील एक प्रमुख पर्यटन स्थळ बनले आहे. हेमाडपंती पद्धतीचे हे मंदिर असून सुमारे १२०० ते १४०० वर्षांपूवीचे असावे असा अंदाज आहे.

मंदिरात सुंदर नक्षीकाम आढळते. मंदिरावर दशावताराच्या रेखीव मूर्ती कोरलेल्या आहेत. छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती राजाराम महाराज भीमाशंकराच्या दर्शनास येत होते तसेच (पेशवे ) बाळाजी विश्वनाथ हे देखील येथे दर्शनासाठी आल्याच्या नोंदी आहेत. सभामंडपाबाहेर सुमारे पाच मण वजन असलेली लोखंडी घंटा आहे. चिमाजी अप्पांनी ही घंटा भेट दिल्याचे सांगण्यात येते. नाना फडणवीसांनी शिखरासह या मंदिराचा जिर्णोध्दार केला होता. भीमा नदीचे आहे मूळ उगम स्थान ज्योतिर्लिंगात आहे, परंतु ती तिथून गुप्त होते आणि मंदिरापासून जंगलात साधारणपणे १.५ किमी पूर्वेला पुन्हा प्रकटते असे मानले जाते. ही जागा गुप्त भीमाशंकर म्हणून ओळखली जाते.

भीमाशंकर मंदिराजवळच पश्चिमेला कडा असून तो कोकण कडा म्हणून ओळखला जातो त्याची उंची साधारणपणे ११०० मीटर इतकी आहे. येथून अतिशय निसर्गाचे विहंगम दृश्य दिसते. अतिशय स्वच्छ वातावरणात पश्चिमेकडचा अरबीसमुद्रही दिसू शकतो. अभयारण्यातील सर्वात उंच ठिकाण म्हणजे नागफणी. येथे पाय वाटेने जावे लागते. अभयारण्यातील हे सर्वात उंच ठिकाण आहे .त्याची उंची समुद्रसपाटीपासून १२३० मीटर इतकी आहे. कोकण परिसराचे अतिशयसुंदर दृश्य दिसते. कोकणातून हे शिखर नागाच्या फण्याप्रमाणे दिसते म्हणून नागफणी असे नाव पडले आहे.

कुंभकर्णाचा मुलगा एक राक्षस होता. त्याला ब्रह्मदेवाकडून विजय होण्याचा वर मिळाला होता. तो देवदेवतांचा छळ करत होता अनेक देवदेवतांना त्याने युद्धात पराभूत केले तेव्हा सर्व देवी देवता भगवान शंकराला शरण गेले आणि यावर काहीतरी उपाय काढावा अशी विनंती केली आणि भगवान शंकराने त्याचा पराभव केला आणि जळून भस्म केले .भगवान शंकराने याठिकाणी शिवलिंगाच्या स्वरूपात राहावे म्हणून प्रार्थना करण्यात आली होती ती त्यांनी स्वीकारली आणि ते भीमाशंकर ज्योतिर्लिंगाच्या स्वरूपात मंदिरात विराजमान झाले आहे. जो दररोज सूर्योदयाच्या नंतर या मंदिरात दर्शन घेतो आणि बारा ज्योतिर्लिंगाची नावे म्हणजेच स्तोत्र पठण करतो त्याची सात जन्माची पाप नष्ट होऊन त्याचा मुक्तीचा मार्ग मोकळा होतो असा समज आहे... बारा ज्योतिर्लिंगाचे एक स्तोत्र आहे. या स्तोत्रामध्ये बारा ज्योतिर्लिंगांची नावे, त्यांची स्थाने, आणि स्तोत्र पठण करण्याचे फळ सांगितले आहे.

बारा ज्योतिर्लिंग स्तोत्र हे पुढील प्रमाणे आहे- सौराष्ट्रे सोमनाथंच श्रीशैले मल्लिकार्जुनम्। उज्जयिन्यां महाकालमोङ्कारममलेश्वरम् ॥१॥ परल्यां वैद्यनाथंच डाकिन्यां भीमशंकरम्। सेतुबन्धे तु रामेशं नागेशं दारुकावने ॥२॥ वाराणस्यां तु विश्वेशं त्र्यम्बकं गौतमीतटे। हिमालये तु केदारं घृष्णेशंच शिवालये ॥३॥ एतानि ज्योतिर्लिङ्गानि सायं प्रातः पठेन्नरः। सप्तजन्मकृतं पापं स्मरणेन विनश्यति ॥४॥ हे स्तोत्र सायंकाळी व प्रातःकाळी पठण केल्यास सर्व पापांचा विनाश होतो, असे सांगितले आहे.

dilipdeshpande24@gmail.com

---

## ➢ महत्त्वाचे

### कोठुरे येथे श्री हनुमान अखंड हरिनाम सप्ताह

**नाशिक ।** नागपंचमीनिमित्त कोठुरे गावात श्री हनुमान अखंड हरिनाम सप्ताह मोठ्या भक्तिभावात आणि उत्साहात संपन्न झाला. सप्ताह कालावधीत विविध कीर्तनकारांनी



हरिपाठ, कीर्तन, भजनाच्या माध्यमातून भक्तांना अध्यात्मिक ऊर्जा देतानाच सामाजिक जागृतीचा संदेश दिला. या सप्ताहात समाधान महाराज, योगेश महाराज, अनिल महाराज, ऋषिकेश महाराज, राहुल महाराज, हेमलता ताई पिंगळे, शिवानंद महाराज, कल्याणी ताई निकम, संदीप महाराज यांनी प्रभावी कीर्तन सादर केले सप्ताहानिमित्त "संत भोजन" कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कोठुरे येथील आई-वडिलांच्या स्मरणार्थ विविध कुटुंबांमार्फत हे संत भोजन देण्यात आले. कोरडे, मोगल, चोबे, कडलग कुमावत, उगले, पोटे या परिवारांनी या पवित्र कार्यात सहभाग घेतला. भजनी कार्यक्रमात विणेकरी एकनाथ बाबा मोगल यांच्या नेतृत्वाखाली गायक ज्ञानेश्वर कोपरे, संजय पगार, मृदंगाचार्य, विवेक महाराज, अश्विनीताई कोपरे, दीपाली फडताळे यांनी भक्तिपर वातावरण निर्माण केले. या सप्ताहाचे संयोजन कांबळे, चोबे, डोंगरे, मोगल, सातभाई, मोरे, कडलग या मंडळींनी अत्यंत सुयोग्य पद्धतीने पार पाडले. विशेष म्हणजे, काल्याचे कीर्तन मोगल आणि वडगुले यांनी सादर केले. कार्यक्रमास सौ. सरलाताई बुटे, कारभारी मोगल, रघुनाथ मोगल, भास्कर चव्हाण, दत्तू चौबे, मकरंद मोगल, अनिल दातार, मधुकर उगले, नामदेव उगले, शेखर बर्वे, सतीश मोरे, अमित बर्वे, मनोज मोगल, बाळू पोटे, शिवाजी चांदोरे, चहा बाई मोगल, इंदुमती मोगल, मुक्ता कडलग, ताराबाई मोगल, द्वारकाबाई मोगल, निर्मला सातभाई यांच्यासह कोठुरे परिसरातील असंख्य भाविक आणि भजनी मंडळे मोठ्या संख्येने उपस्थित होती.

### निलेश गायकवाड यांनी जपला दातृत्वाचा वसा

**नाशिकरोड ।** देवळाली कॅम्प येथील महाराष्ट्र बुक डेपोचे संचालक आणि अण्णाज टेम्पल हिल



ग्रुपचे क्रियाशील सदस्य निलेश गायकवाड यांनी पळसे येथील नासाका कार्यस्थळावरील माध्यमिक विद्यालयातील गरजू विद्यार्थ्यांना कंपासपेटी प्रदान करत दातृत्वाचा वसा जपला. नासाकाचे अवसायक प्रदीप आव्हाड आणि नाशिक सर्व सेवाभावी ट्रस्टचे मानद व्यवस्थापक सुधाकर गोडसे यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झालेल्या सोहळ्यात देवळाली कॅम्पच्या अण्णाज टेम्पल हिल ग्रुपचे ज्येष्ठ सदस्य प्रा.संजय आढाव आणि संग्राम करंजकर, मुख्याध्यापक अरुण पगार यांच्या हस्ते ह्या कंपासपेटी प्रदान करण्यात आल्या. प्रमुख पाहुणे प्रा.संजय आढाव यांनी अण्णाज टेम्पल हिल ग्रुपच्या विधायक उपक्रमांचा आढावा घेऊन ग्रुप करत असलेल्या सामाजिक योगदानाची माहिती दिली आणि भविष्यातही विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्यासाठी भरीव मदत करण्याचे आश्वासन दिले. मुख्याध्यापक अरुण पगार यांनी स्वागत केले. रवींद्र मालुंजकर यांनी सूत्रसंचालन करत आभार मानले.

---

# महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ कृषी विज्ञान केंद्रास द्रवरूप सूक्ष्म अन्नद्रव्ये खत उत्पादन परवाना

**नाशिक ।** यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या कृषी विज्ञान केंद्रास सर्व प्रकारच्या शेतपिकांसाठी उपयुक्त अशा द्रवरूप सूक्ष्म अन्नद्रव्ये खताच्या उत्पादनाचा परवाना प्राप्त झाला आहे. महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागाकडून त्यास 'यश मायक्रो ग्रेड-II' असे नाव मंजूर झालेले आहे.



या परवान्यामुळे विद्यापीठाला शेतकऱ्यांसाठी उपयुक्त उत्पादने व सेवा विकसित करण्यास मदत होणार आहे. सदर फवारणी खत उत्पादन प्रायोगिक तत्वावर वापरण्यासाठी लवकरच उपलब्ध होईल. यामुळे विद्यापीठाच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. विद्यापीठात कृषी विज्ञान केंद्राची माती व पाणी परीक्षण प्रयोगशाळा आहे. त्याद्वारे जिल्ह्यातील शेतकऱ्यांसाठी माती आणि पाण्याच्या नमुन्यांची तपासणी करून त्यांना जमीन व पाण्याच्या आरोग्याविषयी नियमित मार्गदर्शन केले जाते. कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली याच प्रयोगशाळेद्वारे शेतकऱ्यांना पीक उत्पादनात वाढ होण्यासाठी मदत करण्याच्या उद्देशाने या द्रवरूप सूक्ष्म अन्नद्रव्ये खतांची निर्मिती करण्याचे निश्चित करण्यात आले. दीड वर्षे याविषयी रीतसर कार्य - प्रक्रिया सुरु होती. त्यासाठी कृषी विज्ञान केंद्राच्या प्रयोगशाळेमधील संयंत्रांमध्ये आवश्यक बदल व सुधारणा करून ती कार्यान्वित करण्यात आली. संबंधित द्रवरूप सूक्ष्म अन्नद्रव्ये खताच्या नमुन्याची विद्यापीठ व शासनाच्या प्रयोगशाळेत रीतसर मानकानुसार चाचणी घेण्यात आली. या दोन्ही चाचण्यात हे द्रवरूप सूक्ष्म अन्नद्रव्ये खत पात्र ठरले. ही प्रक्रिया नुकतीच यशस्वीरित्या पूर्ण झाली आहे. त्यामुळे राज्य शासनाच्या कृषी विभागाने विद्यापीठ कृषी विज्ञान केंद्राला द्रवरूप सूक्ष्म अन्नद्रव्ये खतांच्या उत्पादनासाठी अधिकृत परवाना प्रदान केला आहे. यासाठी विद्यापीठाचे मा. कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे, प्र-कुलगुरू डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन, कुलसचिव दिलीप भरड यांचे विशेष मार्गदर्शन लाभले. कृषी विज्ञान केंद्राचे संचालक डॉ. नितीन ठोके यांच्या पुढाकाराने प्रयोगशाळा कार्यक्रम सहाय्यक (कृषी) मंगेश व्यवहारे यांनी यासाठी विशेष पाठपुरावा केला. राहुरीच्या महात्मा कृषी विद्यापीठाचे सेवानिवृत्त मृदा शास्त्रज्ञ डॉ. अनिल दुरगुडे यांची यासाठी बहुमोल मदत झाली.

### काय आहे 'यश मायक्रो ग्रेड-II'

'यश मायक्रो ग्रेड-II' हे भाजीपाला, फळझाडे, नगदी पिके, तृणधान्य, कडधान्य, गळीतधान्य अशा सर्व प्रकारच्या शेतपिकांसाठी द्रवरूप सूक्ष्म अन्नद्रव्ये खत आहे. त्यात आवश्यक १६ सूक्ष्म घटकांपैकी शासकीय मानकानुसार लोह, मंगल (मँगेनीज), तांबे, बोरॉन, जस्त व मॉलिब्डेनम या रसायनांचा प्रमाणानुसार मर्यादित व आवश्यक तेवढा समावेश आहे. या द्रवरूप खताच्या वापराची परिणामकारकता ७५ टक्क्यांपर्यंत आहे. त्यामुळे पिकांच्या उत्पादनात १० ते १५ टक्के वाढ होवू शकते.

---

## कर्मवीर भाऊराव पाटील प्राथमिक विद्यामंदिर विंचूरमध्ये वर्ग ग्रंथालयाची निर्मिती

**विंचूर ।** विद्यालयातील उपक्रमशील शिक्षक बी एल गायकर यांच्या प्रयत्नांने व मुख्याध्यापिका एन. व्ही.शिरसाठ यांच्या मार्गदर्शनाने वर्ग ग्रंथालयाची निर्मिती करण्यात आली. विद्यार्थ्यांना वाढदिवसानिमित्त चॉकलेट न देता पुस्तके भेट म्हणून द्यावी यासाठी प्रोत्साहन देण्यात आले.

विद्यार्थ्यांनीही प्रतिसाद देत विविध प्रकारची पुस्तके शाळेस भेट म्हणून दिली.

शिवबा चव्हाण याने शिवचरित्रावर आधारित १५ पुस्तके भेट दिली. यश विंचूरकर याने गोष्टीचे १० पुस्तके भेट म्हणून दिले.गायकर यांनी मुलीच्या वाढदिवसानिमित्त चालू घडामोडी, इंग्लिश स्टोरी बुक, डिक्शनरी अशी पुस्तके भेट दिली.या उपक्रमांद्वारे विद्यार्थ्यांना पाहिजे




त्यावेळी पुस्तके वाचनासाठी घेता येतील.वाचन संस्कृती जोपासण्यासोबत विद्यार्थ्यांचा बौद्धिक विकास होण्यासही मदत होईल.

---

## भगवान श्री जिव्हेश्वर जन्मोत्सव गुणगौरव सोहळ्याचे आयोजन

**नाशिक ।** स्वकुळ साळी सेवा समाज नाशिक रोड यांच्यावतीने भगवान श्री जिव्हेश्वर जन्मोत्सव सोहळा व वार्षिक सर्वसाधारण सभा राजलक्ष्मी हॉल मुक्तीधाम मागे, दत्तमंदिर रोड, नाशिक रोड येथे आयोजित केला आहे.

कार्यक्रमाची रूपरेषा सायंकाळी ४ ते ५ श्री जिव्हेश्वर जन्मोध्याय वाचन, सत्यनारायण पूजा तसेच ५ ते ६ वार्षिक सर्वसाधारण सभा व महिलांचे हळदीकुंकू व विद्यार्थ्यांचा गुणगौरव ६ ते ८ या वेळात होईल. वार्षिक सभेत समाजातील दिवंगतांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहने, मागील सभेचे इतिवृत्त वाचन करणे, धर्मदाय कार्यालयातील कामकाजाबाबत माहिती देणे, बोकडदरा जागेबाबत चर्चा करणे या सारखे विविध विषय वार्षिक सभेत घेणार आहे. तसेच विविध गुणगौरव सोहळ्याचे आयोजन करण्यात आलेले आहे. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे निलेश साळी उपअभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग नाशिक महापालिका नाशिक त्याचबरोबर संगीता



किशोर साळी, सहाय्यक राज्यकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य व अतुल मते राज्य संघटक, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष तसेच सी.पी.साळी संस्थापक अध्यक्ष कुशाग्र फाउंडेशन नाशिक स्वकुळ साळी सेवा समाज नाशिक रोडचे अध्यक्ष सुनील तुकाराम ढगे, उपाध्यक्ष रामदास धोंडीराम पिंगटे, सचिव सचिन चांगटे, खजिनदार चंद्रशेखर सरोदे, विष्णुपंत बर्वे, ज्योती दिंडे, प्रकाश खंडारे, रवींद्र गायकवाड ,अनिल धारणकर ,विष्णू आचारी, रवींद्र साळी ,सतीश भानोसे,संगीता पिंगटे, सल्लागार बी.बी. बावधनकर, दिगंबर सरोदे यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडेल. कार्यक्रम नियोजनासाठी शामकांत धावणे, प्रमोद म्हात्रे, महेंद्र लाहोरकर यांचे योगदान आहे त्याचबरोबर महिला कार्यकारणी अध्यक्ष सौ जयश्री गायकवाड, उज्वला साळी ,मयुरी बर्वे, सोनल पिंगटे ,गौरी दिवाण ,दिपाली म्हात्रे ,मनीषा विखे ,अमृता खंडारे, रूपाली ढगे, ज्योती सरोदे, योगिनी शेरे, शुभदा चांगटे, सुवर्णा दिंडे, जयश्री धारणकर, कुमोदिनी ढोरे, शकुंतला भानोसे, उषा दिंडे, अलका जवादे आदी प्रयत्नशील आहेत, अशी माहिती प्रसिद्धीप्रमुख शैलेंद्र साळी यांनी या पत्रकाद्वारे दिली.

---

# जिल्हा रुग्णालयातील मातृदुग्धपेढी जपतेय वात्सल्याचा वसा

**मातेचे दूध नवजात बालकांसाठी अमृतासमान आहे. याविषयी जनजागृती व्हावी म्हणून दरवर्षी १ ते ७ ऑगस्ट या कालावधीत जागतिक स्तनपान सप्ताह साजरा केला जातो. यानिमित्त जिल्हा रुग्णालय, नाशिक येथे मातृ दुग्ध पेढी कार्यरत आहे. त्याविषयीची माहिती देणारा हा लेख...**

### पाचशेपेक्षा अधिक बालकांना लाभ

जागतिक स्तनपान सप्ताहाचा मुख्य उद्देश म्हणजे माता आणि बालकांसाठी स्तनपानाचे महत्व पोहोचविणे, स्तनपानाशी संबंधित समस्या आणि त्यावरील उपायांची माहिती देणे हा आहे. हा सप्ताह माता आणि बाळ या दोघांच्याही उत्तम आरोग्यासाठी स्तनपानाला प्रोत्साहन देतो. या पार्श्वभूमीवर जिल्हा रुग्णालयात कार्यान्वित मातृ दुग्धपेढी नवजात शिशुंसाठी वात्सल्याचा वसा जपत आहे. प्रसुतीनंतर अनेक स्त्रियांना बाळाला स्तनपान करताना त्रास होतो. काही वेळेस शरीरात दुधाची निर्मिती होत नाही. त्याचा परिणाम नवजात बालकावर होतो. मातेच्या दुधापासून वंचित राहणाऱ्या अशा बालकांसाठी जिल्हा रुग्णालयात मातृ दुग्ध पेढी (मिल्क बँक) कार्यरत आहे. या पेढीच्या स्थापनेल्या आता तीन वर्षे पूर्ण झाली आहेत. या कालावधीत पाचशेहून अधिक बालकांना या मिल्क बँकेच्या माध्यमातून मातेचे दूध मिळाले आहे.

### कांगारू केअर उपक्रम

जिल्हा रुग्णालयातील प्रसुती कक्षात जिल्हाभरातून गर्भवती महिला प्रसुतीसाठी दाखल होतात. प्रसुतीनंतर मातांना प्रसुती पश्चात विभागात दाखल करण्यात येते. तेथे त्या नवजात बालकांना स्तनपान करतात. नवजात बालकाला सुरुवातीच्या सहा महिन्यांपर्यंत फक्त मातेचे दूध आवश्यक असते. मातेचे दूध या बालकांसाठी अमृतासमान आहे. याच विभागात कांगारू केअर नावाचा अभिनव उपक्रम राबविला जातो. यामुळे माता आणि बाळाची जवळीक वाढवीत मातृत्वाचे बंध बळकट केले जातात. मात्र, काही मातांना प्रसुती पश्चात स्तनपान करताना त्रास होतो. काही मातांना वैद्यकीय कारणांमुळे, तर काही मातांमध्ये पुरेशा दुधाची निर्मिती होत नाही.

### स्तनदा मातेचे समुपदेशन

नवजात बालकास दिवसभरात साधारणपणे ३०० मिलिलिटर एवढ्या दुधाची आवश्यकता असते. अशा वेळेस काही माता या पेढीस दुग्ध दान करतात. त्याचा लाभ नवजात बालकांना होत आहे. मातेच्या दुधाचे संकलन संपूर्ण शास्त्रीय पद्धतीने केले जाते. त्यासाठी जिल्हा रुग्णालयातील प्रसुती पश्चात विभागातील कांगारू केअर कक्षाच्या माध्यमातून स्तनदा मातांचे दूध दानासाठी समुपदेशन केले जाते. दुग्ध दानानंतर दुग्ध पेढीची कार्य पद्धती आणि लाभ मातेला समजावून सांगितले जातात. दूध दान करणारी माता आधी स्वतःच्या बाळाच्या स्तनपानानंतर दूध दान करू शकते. तसेच दूध दान करणारी माता आणि दूध दिल्या जाणाऱ्या नवजात बाळाची माता अथवा नातेवाईकांची रितसर व कायदेशीर संमती घेतली जाते. या प्रक्रियेत सहभागी कर्मचाऱ्यांना विशेष प्रशिक्षण देण्यात येते. दूध दान करणाऱ्या मातेच्या सर्व प्रकारची प्रारंभिक आरोग्य तपासणी केली जाते. प्रसुतीच्या वेळेस रक्ताची आवश्यकता भासलेली माता सहा महिन्यानंतर दूध दान करण्यास पात्र ठरते.



### ममत्वाची वाढते भावना

दूध संकलनापूर्वी त्याचे निर्जंतुकीकरण केले जाते. त्यानंतर दूध तपासणीसाठी प्रयोगशाळेत पाठविले जाते. साधारणतः तीन दिवसांनी कुठल्याही प्रकारचे सूक्ष्म जंतू नसल्याचे अहवाल प्राप्त झाल्यानंतरच दुधाचे गरजेनुसार वितरण केले जाते. तो पर्यंत त्याची शास्त्रीय पद्धतीने साठवणूक केली जाते. संकलित केलेल्या दुधाचे पाश्चरीकरण केले जाते. म्हणजे दूध विशिष्ट तापमानापर्यंत गरम करून त्यातील हानिकारक सूक्ष्मजंतू नष्ट करण्याची ही प्रक्रिया आहे. यामुळे बाळाला दूध पिण्यासाठी सुरक्षित होते. असे निर्जंतुकीकरण केलेले दूध विशिष्ट तापमानाला बर्फाच्छादित रेफ्रिजेरटरमध्ये साठविले जाते. त्यानंतर त्याचे आवश्यकतेनुसार संबंधित बाळांना वितरण केले जाते. दूध दान देणाऱ्या मातेचीही रुग्णालयातर्फे सर्वतोपरी काळजी घेतली जाते. दुग्ध दान करणाऱ्या महिलेस पौष्टिक लाडू रुग्णालयातर्फे देण्यात येतो. दुग्ध दानामुळे मातेस आत्मिक समाधान लाभते. तिच्यातील ममत्वाची भावना आणखी वृद्धिंगत होते. दुग्ध दानामुळे स्तनाच्या आजारापासून मुक्ती मिळते. स्तनात दूध साठत नाही. नवजात बालकास योग्य वेळी मातेचे दूध मिळाल्याने त्याचेही पोषण होऊन त्याची रोग प्रतिकार क्षमता वाढण्यास मदत होते.

**- संकलन : जिल्हा माहिती कार्यालय**

# नागरी समस्यांच्या निराकरणासाठी आ. फरांदेंचा पुढाकार

## मनपा आयुक्तांशी चर्चा; शिष्टमंडळाकडून निवेदन । प्रभाग क्र. २३ व ३० मधील रस्ते, पाणीपुरवठा, अतिक्रमण विषयक समस्या





**नाशिक ।** प्रभाग क्र. २३ व ३० मधील रस्त्यांच्या दुरवस्थेमुळे नागरिकांना मोठ्या प्रमाणात गैरसोयींना सामोरे जावे लागत आहे. प्रभागातील डीपी रस्ते, अतिक्रमण, पाणीपुरवठा व वाहतूक व्यवस्थेतील गंभीर समस्या याबाबत तातडीने उपाययोजना करण्याची मागणी आमदार देवयानी फरांदे यांच्या पुढाकाराने महापालिकेच्या आयुक्तांकडे करण्यात आली.

हॉटेल छानजवळील रस्ता १९८८ पासून अद्याप पूर्ण झाला नसल्यामुळे १०० फूट डीपी रस्ता अद्याप वापरात नाही. तसेच इंदिरानगर बोगदा ते अशोका हॉटेलपर्यंतचा रस्ता हा १०० फूट असूनही अद्याप अपुरा आहे. या रस्त्यांवर वाहतुकीची मोठी समस्या निर्माण झाली असून लोकांना दररोज त्रास सहन करावा लागत आहे. विनय नगर ते दिपाली नगर हा 18 मीटर रोड एम एन जी एल कंपनीने डॅमेज केला असून, सदर रस्ता दुरुस्त झालेला नाही औरंगाबादकर सोसायटी १८ मीटर रस्ता वीस ते पंचवीस वर्षापासून डांबरीकरण झालेला नाही. स्वातंत्र्यवीर सावरकर नगर ते पेठे नगर रस्ता १८ मीटर ताब्यात असताना केवळ तीन मीटर वापरात आहे पखाल रोडचे विस्तारीकरण करणे हे काम बरेच वर्षापासून प्रलंबित आहे. तसेच, प्रभागातील विविध ठिकाणी अतिक्रमण झाले असून, त्यामुळे रस्त्यांचा विस्तार रोखला गेला आहे. विशेषतः इंद्रानगर जॉगिंग ट्रॅकजवळ, गणेश नगर, अशोका हॉटेलजवळ, वडाळा गाव चौफुली परिसर अशा अनेक भागांमध्ये रस्त्यांवर अतिक्रमण झाले असून, ते हटवण्याची मागणी करण्यात आली आहे. इंदिरानगर भागात मोठ्या प्रमाणावर गोठे, बेकायदेशीर लॉन्स यांचे अतिक्रमण झालेले आहे परंतु महानगरपालिकेचे सदर बाबीकडे दुर्लक्ष होत आहे. सिंहस्थसाठी मंजूर करण्यात आलेल्या रस्त्यात अनेक महत्त्वाच्या रस्त्यांचा समावेश करण्यात आलेला नाही. या रस्त्यांचे विस्तारीकरण प्रलंबित आहे. याशिवाय पाणीपुरवठा, रस्ते दुरुस्ती, अतिक्रमण हटवणे, वाहतूक कोंडी यांसारख्या गंभीर समस्यांमुळे नागरिक त्रस्त झाले आहेत. पाणीपुरवठ्याच्या समस्यांबाबत वारंवार तक्रारी करून देखील कारवाई करण्यात येत नाही. संपूर्ण इंदिरानगर परिसरात कमी दाबाने व अपरिप्त पाणीपुरवठा सुरू आहे. मनपाने या सर्व समस्यांवर तातडीने कार्यवाही करून प्रभागातील रस्ते दुरुस्ती, अतिक्रमण हटवणे आणि पाणीपुरवठा सुधारावा, अशी जोरदार मागणी माजी नगरसेवकांकडून करण्यात आली. अधिकाऱ्यांनी जागेवर बसून मलमपट्टी करण्याऐवजी विविध प्रभागांमध्ये दौरा करून कामकाज करणे गरजेचे असल्याचे आ. फरांदे यांनी स्पष्ट केले. यावेळी माजी महापौर सतीश कुलकर्णी, माजी नगरसेवक चंद्रकांत खोडे, सतीश सोनवणे, रूपाली निकुळे, ॲड. शाम बडोदे, दीपाली कुलकर्णी, सुप्रिया खोडे, शाहीन मिर्झा, अजिंक्य साने, संध्या कुलकर्णी, वैभव कुलकर्णी, सचिन कुलकर्णी, यशवंत निकुळे, संकेत खोडे, मुजमिल मिर्झा आदींसह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या हितासाठी ठोस पावले उचलण्याची गरज : खा. वाजे



**नाशिक ।** या वर्षी समाधानकारक पावसामुळे कांद्याचं उत्पादन अपेक्षेपेक्षा अधिक होणार आहे. ऑगस्टपासून विशेषतः दक्षिण भारतातून मोठ्या प्रमाणात कांद्याची आवक होण्याची शक्यता आहे. परिणामी देशांतर्गत बाजारावर ताण येऊन दर घसरण्याचा धोका आहे. ही परिस्थिती शेतकऱ्यांच्या आर्थिक सुरक्षेच्या दृष्टीने गंभीर असून, योग्य वेळी निर्णय घेणे आवश्यक आहे. म्हणूनच खासदार भास्कर भगरे व खासदार शोभाताई बच्छाव यांच्या समवेत नाशिकचे खासदार राजाभाऊ वाजे यांनी केंद्रीय वाणिज्यमंत्री पीयूष गोयल आणि केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांची भेट घेतली.

त्यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, कांदा निर्यातीवरील शुल्क ५% पर्यंत मर्यादित करावे, निर्यातदारांना ७% पर्यंत मालवाहतूक अनुदान द्यावे. यामुळे देशांतर्गत अतिरिक्त पुरवठ्याचा ताण हलका होईल आणि शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनाचा न्याय्य दर मिळेल, अशी अपेक्षा खा. वाजे यांनी व्यक्त केली. सरकारने वेळेत पावले उचलल्यास शेतकऱ्यांचा हमीभाव अबाधित राहून उत्पन्नावर घाव बसणार नाही, हाच या मागणीमागचा मुख्य उद्देश असल्याचे खासदार राजाभाऊ वाजे यांनी सांगितले.

# वृद्धेच्या कानातील गाठ काढण्यात मविप्र रुग्णालयातील डॉक्टरांना यश

## गुंतागुंतीची शस्त्रक्रिया केली यशस्वी




**नाशिक ।** वर्षभरापासून उजव्या कानातील वेदनांनी त्रस्त असलेल्या ७९ वर्षीय वृद्धेवर आडगांव येथील मविप्र संचलित डॉ. वसंतराव पवार रुग्णालयातील डॉक्टरांनी यशस्वी शस्त्रक्रिया करून तिच्या कानाच्या वेदना शमविण्याचे काम केले आहे.

मविप्र रुग्णालयाच्या कान-नाक-घसा तज्ज्ञ विभागात ही अत्यंत अवघड आणि गुंतागुंतीची शस्त्रक्रिया यशस्वी करण्यात डॉक्टरांच्या पथकाला यश आले, अशी माहिती वैद्यकीय अधीक्षक डॉ. वसंत कवडे यांनी दिली. इंदिरानगर येथील रहिवासी असलेल्या प्रभाकर ठाकरे यांच्या मातोश्री सुमन ठाकरे या गेल्या वर्षभरापासून उजव्या कानातील प्रचंड वेदनांनी त्रस्त होत्या. सतत कान बंद जाणवणे, श्रवणशक्ती कमी होणे आणि कानात वेदना होणे हा त्रास त्यांना जाणवत होता. विविध स्थानिक रुग्णालयांत उपचार करूनही आराम न मिळाल्याने त्यांना आडगाव येथील मविप्र रुग्णालयात दाखल करण्याचा सल्ला देण्यात आला होता. मविप्र रुग्णालयात यशस्वी उपचार होतील व वेदना दूर होतील, असा आत्मविश्वास देण्यात आल्याने सुमन ठाकरे यांना मविप्र रुग्णालयाच्या कान-नाक-घसा विभागात दाखल करण्यात आले. डॉक्टरांना तपासणीअंती रुग्णाच्या उजव्या बाह्य श्रवण नलिकेत गाठ असल्याचे निदर्शनास आले. त्यानंतर सीटी स्कॅन व बायोप्सी करून निदान करण्यात आले. ही गाठ 'वेल डिफरेंशिएटेड स्क्वॅमस सेल कार्सिनोमा' असल्याचे चाचणीत निष्पन्न झाले. अखेरीस उच्चस्तरीय उपचार व यशस्वी शस्त्रक्रियेद्वारे ही कर्करोगग्रस्त गाठ काढण्यात डॉक्टरांच्या पथकाला यश आले. ही गुंतागुंतीची शस्त्रक्रिया डॉ. महेश निकम, डॉ. श्रिया कुलकर्णी, डॉ. दिव्या बंगेरा व पथकाने यशस्वीपणे पार पाडली. या उपचारासाठी अत्यल्प खर्च झाला असून, खासगी रुग्णालयांमधील भरमसाठ खर्चाच्या तुलनेत रुग्णालयाने सामाजिक बांधिलकी जपत उपचार दिले. सुमन ठाकरे यांच्या कुटुंबीयांनी कान-नाक-घसा विभागाच्या सर्व डॉक्टर्स व कर्मचाऱ्यांचे आभार मानले आहेत. मराठा विद्या प्रसारक समाजाचे सरचिटणीस ॲड. नितीन ठाकरे, सर्व पदाधिकारी संचालक आणि शिक्षणाधिकारी डॉ. ज्ञानेश्वर लोखंडे, अधिष्ठाता डॉ. सुधीर भामरे, वैद्यकीय अधीक्षक डॉ. वसंत कवडे आणि भूलशास्त्र विभागाचे यासाठी मोलाचे सहकार्य लाभले आहे.

## ➤ महत्त्वाचे

### कर्नाटकातील दोन अल्पवयीन मुलींना पळवून नेणाऱ्यास मनमाड पोलिसांनी पकडले

**मनमाड ।** कर्नाटक राज्यातील कलबुर्गी येथील दोन अल्पवयीन मुलींना पळवून घेऊन जाणाऱ्या युवकाला लोहमार्ग पोलिसांनी ताब्यात घेतल्याने एकच खळबळ उडाली आहे. तपासा दरम्यान याप्रकरणी कलबुर्गी येथील पोलीस स्थानकात अपहरणाचा गुन्हा दाखल असल्याची माहिती लोहमार्ग पोलिसांना मिळाली. सदरील दोन अल्पवयीन मुली व त्यांच्यासोबत असणारा युवक यांना मनमाड लोहमार्ग पोलिसांनी कलबुर्गी



स्थानकाच्या पोलीस कर्मचारी आणि मुलीच्या पालकांना सुपूर्द केले आहे. याबाबत अधिक माहिती अशी की, मनमाड रेल्वे स्थानकात गस्त घालणाऱ्या पोलीस कर्मचाऱ्यांना गाडी क्रं २२६८७ मैसूर - वाराणसी एक्सप्रेस मध्ये दोन अल्पवयीन मुलींना २५ वर्षीय युवक गाडी चढत असताना संशय आला. तात्काळ गस्त घालणाऱ्या पोलीस कर्मचाऱ्यांनी सदरील २५ वर्षीय युवकाला व अल्पवयीन मुलींना ताब्यात घेऊन मनमाड लोहमार्ग पोलीस स्थानकात आणले. पोलीस निरीक्षक गोरखनाथ गांगुर्डे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस कर्मचाऱ्यांनी विचारपूस केली असता १३ व १५ वर्षीय अल्पवयीन मुली हे कर्नाटक राज्यातील कलबुर्गी येथे राहणारा असून त्यांना घेऊन जाणारा संशयित युवक रमेश ( पूर्ण नाव माहित नाही ), वय-२५, रा. उत्तर प्रदेश असे सांगितले. दरम्यान कलबुर्गी येथे अपहरणाचा गुन्हा दाखल असल्याचे समजतात लोहमार्ग पोलिसांनी तपासाची चक्र फिरवीत कलबुर्गी येथे संपर्क साधला असता अपहरणाचा गुन्हा दाखल असल्याची माहिती कलबुर्गी पोलिसांनी दिली. त्यानंतर कलबुर्गी पोलीस स्थानकाचे अधिकारी मोहम्मद गोसावे व कर्मचारी इसरायील अली तसेच या दोन्ही मुलींचे पालक मनमाड येथे आल्यानंतर लोहमार्ग पोलिसांनी दोन्ही मुली व संशयित युवक यांना त्यांच्याकडे सुपूर्द करण्यात आले, अशी नोंद लोहमार्ग पोलीस स्थानकात करण्यात आली आहे.

# महापालिका निवडणुकीत ७०० मतदारांसाठी राहणार एक बूथ

## शहरात १९४४ मतदान केंद्र; १३ लाख मतदार । मनपा निवडणुकीची तयारी

**नाशिक ।** आगामी होऊ घातलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचे स्पष्ट संकेत मिळाल्यानंतर प्रशासन तयारीला लागले आहे. त्याचाच एक भाग म्हणून नाशिक महापालिका प्रशासनानेही तयारी सुरु केली आहे. तसा सविस्तर अहवाल जिल्हाधिकाऱ्यांना सादर करण्यात आला आहे. सन २०२४ मध्ये झालेल्या विधानसभा मतदारांची संख्या गृहीत धरून ७०० मतदारांमागे एक मतदान केंद्र तयार केले जाणार आहे. त्यानुसार एकूण १ हजार ९४४ मतदान केंद्र राहणार असल्याचे सूत्रांनी सांगितले.

मनपा निवडणुकीसाठी मनपा प्रशासनाने १३ लाख ८२१ मतदारांची संख्या गृहीत धरली आहे. राज्य निवडणूक आयोगाने राज्यातील ३२ जिल्हा परिषद, ३३६ पंचायत समिती, २४८ नगर परिषदा, ४२ नगर पंचायत आणि २९ महापालिकांच्या सार्वत्रिक निवडणुका आगामी होऊ घातल्या आहेत. त्यानुसार नाशिक महापालिकेच्या निवडणूक होणार असून, त्याची तयारी सुरू झाली आहे. आगामी होऊ घातलेल्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर ५ ऑगस्ट रोजी राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांनी नाशिक दौरा करीत नाशिक विभागीय आढावा घेतला. या आढावा बैठकीत आयुक्तांनी नाशिक विभागातील निवडणुकांच्या पूर्वतयारीचा आढावा घेतला. नाशिक मनपा निवडणुका नाशिक पूर्व, नाशिक मध्य, नाशिक पश्चिम आणि देवळाली विधानसभा मतदारसंघातली मतदार संख्येनुसार होणार आहेत.

# ग्रामस्तरावरील अधिकारी कर्मचाऱ्यांची लोकाभिमुख प्रशासनासाठी भूमिका महत्वाची : छगन भुजबळ

## कुसूर, धामोडे, नगरसूल येथे तलाठी कार्यालयाचे उदघाटन, लोकार्पण



**नाशिक ।** ग्रामस्तरावर तलाठी, मंडलाधिकारी, ग्रामपंचायत कार्यालयाच्या माध्यमातून ग्रामस्थांच्या अडचणी ग्रामस्तरावर प्राधान्याने सोडविणे आवश्यक आहे. अधिकारी व कर्मचाऱ्यांनी लोकाभिमुख प्रशासनासाठी लोकसेवकाची भूमिका निभवावी, असे प्रतिपादन नागरी पुरवठामंत्री छगन भुजबळ यांनी केले.

कुसूर, धामोडे येथील तलाठी कार्यालयाचे व नगरसूल ता. येवला येथील तलाठी, मंडलाधिकारी कार्यालयाच्या उदघाटन व लोकार्पण सोहळा कार्यक्रमप्रसंगी भुजबळ बोलत होते. यावेळी उपविभागीय अधिकारी बाबासाहेब गाढवे, तहसीलदार आबा महाजन, धामोडेचे मंडलाधिकारी गणेश गाडेकर, गट विकास अधिकारी नम्रता जगताप सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपविभागीय अधिकारी सुमेरसिंग पाकळ आदी उपस्थित होते. ना. भुजबळ म्हणाले की, ग्रामस्तरावरील मंडलाधिकारी, तलाठी, ग्रामसेवक, आरोग्यसेवकांची भूमिका ही लोकसेवकाची आहे. अधिकारी, कर्मचारी यांनी ग्रामस्थांच्या अडी- अडचणी सोडवून, प्रशासन अधिक गतिमान करण्यावर लक्ष केंद्रित करावे. तलाठी कार्यालयाच्या इमारतीचे सुसज्ज बांधकाम झाल्यामुळे दस्तऐवज व्यवस्थित ठेवण्यास मदत होईल. यामुळे प्रशासकीय कामकाज अधिक गतीने होईल. तसेच यावेळी मंत्री छगन भुजबळ म्हणाले की, सौर कृषी पंप योजनेच्या माध्यमातून दिवसा वीज मिळण्यास मदत झाली आहे. मांजरपाडा हा पथदर्शी प्रकल्प साकारण्यात आलेला आहे. या प्रकल्पाचे पाणी येवल्याच्या शेवटच्या टोकापर्यंत पोहचविण्यासाठी २६३ कोटी रुपये खर्च करून कालव्याचे काँक्रीटीकरण करण्यात आले आहे. प्रकल्पाच्या अधिकच्या पाण्यासाठी पार गोदावरी प्रकल्प राबविण्यात येत आहे. याचा डीपीआर तयार करण्यात येत आहे. वर्षभरात हे काम पूर्ण होऊन कामाला सुरुवात होईल. यामाध्यमातून १० टीएमसी पाणी उपलब्ध होणार आहे. हे पाणी या कालव्याच्या माध्यमातून नाशिकसह मराठवाड्याला पोहचविण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. मतदारसंघातील पाणी प्रश्नही प्राधान्याने मार्गी लावले जातील, असेही त्यांनी सांगितले. यावेळी सरपंच सुरेखा गायकवाड, कांताबाई भड, अनिता पैठणकर, उपसरपंच मंगल कमोदकर, लता गायकवाड यांच्यासह ग्रामस्थ, पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**३३ लाख रुपयांचा खर्च**

कुसूर, धामोडे तलाठी कार्यालयासाठी प्रत्येकी ३३ लाख रुपये, नगरसूल मंडलाधिकारी कार्यालयासाठी ३७ लाख रुपयांचा खर्च आल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

# भगवान श्री जिव्हेश्वर जन्मोत्सव साजरा





**सिडको ।** जिव्हेश्वर सेवा मंडळ व श्री जिव्हेश्वर सेवा महिला मंडळाच्या वतीने श्री जिव्हेश्वर जन्मोत्सव साजरा करण्यात आला. यानिमित्त पावन गणेश मंदिर गणेश चौक नाशिक येथे ३ ते ५ ऑगस्ट २०२५ या कालावधीत सायंकाळी ह भ प एकनाथ महाराज सातारकर यांचे प्रवचन झाले. लक्ष्मीधवन मंगल कार्यालय येथून शोभायात्रा काढण्यात आली. पोथी वाचन करण्यात आले.

भगवान श्री जिव्हेश्वर भक्ती गीत कार्यक्रमही झाला. भगवान श्री जिव्हेश्वर पालखी सोहळा लक्ष्मी धवन मंगल कार्यालय येथून शोभायात्रा सुरुवात झाली. शोभायात्रा दत्त चौक, मुक्तांगण शाळा, हनुमान चौक, गणेश चौकमार्गे काढण्यात आली. शोभायात्रेत डॉ. हर्षद आढाव, निलेश धारणकर, योगेश साळी, किशोर वाघ, चंद्रकांत फाळके, गणेश मुरलीधर तांबे, दिलीप मारवाडी, राजेंद्र देवळे, जगन्नाथ एलगट, सचिन मारवाडी, अनिल कळके, कृष्णा धरम मदन धारणकर राजेंद्र मेंद्रे , श्रावण बर्वे, नितीन धमके ,कृष्णा सरोदे, गणेश निचळ, हेमंत लहाने, संजय मेंद्रे, विजय धसे. महिला अध्यक्ष स्वाती सरोदे, योगिता मुरलीधर तांबे, जयश्री धारणकर, अश्विनी घोडके, मीनाक्षी जगताप, स्वप्नील घोडके, तारा देवळे, पूनम माटे, भारती एलगट, अलका डरंगे, मोहिनी केकाने, हर्षदा बर्वे, कावेरी झेंड, योगिता धमके, यमाताई दिवटे आदींसह समाज बांधवांचा मोठा सहभाग होता. कार्यक्रमात इयत्ता दहावी बारावी विद्यार्थ्यांचा तसेच विविध गुण संपन्न असलेल्या समाज बांधवांचा गौरव करण्यात आला.

भगवान श्री जिव्हेश्वर जन्म सोहळा निमित्त महिलांनी विशेष वेशभूषा म्हणजेच चॉकलेटी रंगाची साडी, गळ्यात मोत्याचा सेट हातात हिरव्या रंगाच्या बांगड्या वेणीला गजरा, कपाळावर चंद्रकोर टिकली अशा वेशभूषेत महिलांनी मिरवणुकीत लक्षवेधक ठरले.

कार्यक्रमाचे शेवटी समाज बांधवांकरिता लकी ड्रॉ व महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन स्वप्ना घोडके यांनी केले तर आभार राजेंद्र देवडे यांनी मानले. याप्रसंगी प्रसिद्धीप्रमुख हेमंत काळमेख व शैलेंद्र साळी यांनी दिली.

सर्वोच्च न्यायालयाला सध्या विश्वासार्हतेचे आणीबाणीनंतरचे सर्वात वाईट संकट भेडसावत आहे. देशभरातील न्यायालयात जे काही निकाल कानावर येऊन पडतात ते धक्कादायक आहेत. काही अपवाद वगळता न्यायालयाच्या कार्यकारणभावाचा दर्जा, निकालांमधील सातत्याचा अभाव, काही प्रकरणी न्यायालयाने त्याच्या घटनात्मक भूमिकेपासून घेतलेली फारकत तर, काही प्रकरणांत दाखवलेला अतिउत्साह यामुळे यापूर्वीच न्यायालयाच्या अधिकारांवर विपरीत परिणाम झाला आहे. त्यातच महाराष्ट्रातील भाजपच्या माजी प्रवक्त्याची चक्क न्यायाधीश म्हणून उच्च न्यायालयात नेमणूक झाल्याने राज्यात न्यायालयीन प्रक्रियेबाबत संशयाचे वातावरण निर्माण झाले आहे. सार्वजनिक व्यासपीठावरून सत्ताधारी पक्षाची बाजू मांडणाऱ्या व्यक्तीची न्यायाधीश म्हणून नेमणूक होणे हा लोकशाही वरील सर्वात मोठा आघात आहे. परंतु हा आघात भाजपच्या माजी प्रवक्त्या आरती साठे यांच्या नियुक्तीवरून झाला आहे. त्यामुळे न्यायव्यवस्थेच्या निपःक्षपातीपणावर दुरगामी परिणाम झाल्याशिवाय राहील काय? केवळ पात्रतेमुळे राजकीय व्यक्तींना न्यायाधीश बनवणे म्हणजे न्यायपालिकेचा जणू राजकीय आखाडा बनविणे झाले आहे. यापूर्वीच भारतीय जनता पक्षाच्या उमेदवार म्हणून मुंबईत एडवोकेट उज्वल निकम यांनी निवडणूक लढविली व ते पराभूत झाले. परंतु पराभूत झाल्याबरोबर सरकारी वकील म्हणून त्यांची नियुक्ती करण्यात आली. त्याचवेळी न्यायव्यवस्थेबद्दल चर्चा सुरू झाली होती. आता तर त्यांना राज्यसभेचे खासदार बनविले, याशिवाय सरकारी वकील म्हणूनही तेच काम पाहतात. या देशाच्या न्यायव्यवस्थेबद्दल यापूर्वी खुलेआम चर्चा कधीच होत नसायची. न्यायालयाबद्दल प्रचंड आदर असायचा. पण आता जनतेतही न्यायव्यवस्थेबद्दल खुलेआम चर्चा सुरू होत आहे. ही बाब सार्वजनिकरित्या चर्चेला येणे योग्य नाही. सत्तेवर कुणाचा अंकुश निर्माण होऊन सत्तेचं केंद्रीकरण होऊ नये तसेच 'चेक अँड बॅलन्स' राहावा यासाठी संविधानात 'सेपरेशन ऑफ पॉवर'चं तत्व अवलंबलं आहे. राजकीय प्रवक्त्याची न्यायाधीशपदी नियुक्ती म्हणजे सेपरेशन ऑफ पॉवर'च्या तत्वाला आणि पर्यायाने संविधानाला हरताळ फासण्याचा हा प्रयत्न नाही का? जेंव्हा उच्च न्यायालयातील न्यायाधीश पदावरील व्यक्ती राजकीय पार्श्वभूमी आणि सत्ताधारी पक्षातील पदाचा उपभोग घेतलेली असेल तेंव्हा न्यायदानाची प्रक्रिया राजकीय आकस बाळगून होणार नाही, याची खात्री कोण देणार? एका राजकीय व्यक्तीच्या नियुक्तीने पुर्ण न्यायदानाच्या प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह निर्माण होणार नाही का?



# न्याय व्यवस्थेवरील हल्ले कसे थोपविणार?

थर्ड अम्पायर



जयंत महाजन
jayantmahajansir@gmail.com
मोबा. ९४२०६९१४२०

आरती साठे या व्यक्तीबाबत नियुक्तीच्या पात्रतेबाबत कुठलाही आक्षेप नाही, परंतु संबंधित व्यक्तीची नियुक्ती करताना न्यायदान हे सामान्य नागरिकांसाठी कोणत्याही अभिनिवेशाशिवाय असते या सामान्य माणसांच्या भावनेलाच आघात बसत आहे. परिणामी संबंधित राजकीय व्यक्तीची न्यायाधीश पदावरील नियुक्तीबाबत पुनर्विचार करावाच लागणार आहे. सरन्यायाधीशांनीच याबाबत मार्गदर्शन करायला हवं.

सरकारी दरबारात सरकारची व्यक्ती म्हणून न्याय देणारी भूमिका घेणाऱ्यांना कशी बक्षीसी दिली जाते हे संपूर्ण देशाने पाहिले. महाराष्ट्रातील उदाहरण देखील सर्वांच्या डोळ्यासमोर आहे. आरएसएसने उज्ज्वल निकम यांना लोकसभेचे तिकिट देऊन त्यांच्या उपकाराची परतफेड तर केली, पण त्यांना लोकसभेत न जाता आल्याने राज्यसभेचा रस्ता खुला करून दिला.

आता तर भाजपच्या माजी प्रवक्त्या आरती साठे यांची मुंबई उच्च न्यायालयात न्यायमूर्ती पदी नियुक्तीला कॉलेजियमने मंजुरी दिली. मात्र त्यांच्या या नियुक्तीवरून विरोधकांनी आक्षेप घेतला आहे व त्यात तथ्यही आहे. भाजपचे तत्कालीन प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी फेब्रुवारी २०२३ मध्ये आरती साठे यांची भाजपच्या प्रवक्ते पदावर नियुक्ती केली होती. या नियुक्तीच्या अठरा महिन्यानंतर त्यांच्या नावाला कॉलेजियमकडून न्यायमूर्ती पदासाठी मंजुरी मिळाल्याने विरोधक प्रचंड भडकले आहेत.

तटस्थ वृत्तीने या केस कडे पाहिल्यावर साठे यांना न्यायाधीश पदावर बसण्यासाठी कॉलेजियमने परवानगी द्यायला नको होती. आता याबाबत सरन्यायाधीशांकडे फेरविचार करण्यासाठी विरोधी पक्षांकडून विनंती करण्यात येणार आहे. राजकीय पार्श्वभूमीमुळे साठे यांच्या नियुक्तीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. संबंधित व्यक्तीच्या पात्रतेवर विरोधकांचा आक्षेप नाही, पण त्यांची राजकीय पार्श्वभूमी न्यायदानाच्या प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह निर्माण करू शकेल.

सामान्य माणसाचा न्यायव्यवस्थेवरील विश्वास कायम राखण्यासाठी अशा प्रकारच्या नियुक्ती होणे योग्य नाही. सध्या न्यायालयाने स्वतःसाठी एक गंभीर संस्थात्मक संकट निर्माण केले आहे. त्यामुळे न्यायालय जो अधिकार अगदी हिरीरीने गाजवू इच्छिते त्याला आणखी तडे जाणार आहेत. त्यातून न्यायालयीन स्वातंत्र्याचा संकोच करण्याला अधिमान्यता मिळण्यास योग्य ती परिस्थिती निर्माण होईल.

या प्रकरणी ज्या गलिच्छ घडामोडी झाल्या त्यांची उजळणी करण्याची ही वेळ नव्हे. मात्र यातून न्यायपालिकेने स्वतःला संभाव्य धोक्यांप्रति कशा प्रकारे आरक्षित करून घेतले आहे याचा विचार केला पाहीजे. न्यायालयाने दिलेला प्रत्येक न्याय हा संशयातीत असला पाहिजे. न्यायपालिकेच्या स्वातंत्र्यावरच गदा येता कामा नये. यासाठी बरीच सावधगिरी बाळगण्याची गरज आहे

. एखाद्या न्यायाधीशाचे संशयितांमध्ये नुसते नाव घेतले जाणे हे देखील न्यायपालिकेचे स्वातंत्र्य पायदळी तुडवण्यासारखे असू शकते, यावर विचार केला पाहिजे. न्यायपालिकेसाठी असलेली अशी सूक्ष्म आव्हाने अगदीच काही शक्यतेच्या कक्षेबाहेर नाहीत. मात्र सध्या सुधारणांसाठी होत असलेल्या कल्लोळातून न्यायपालिकेला उत्तरदायी बनवण्याच्या नावाखाली तिचे स्वातंत्र्य पायदळी तुडवले जाण्याचीच शक्यता अधिक दिसते आहे. असा धोका असल्यानेच न्यायपालिकेचे वर्तन प्रामाणिक असले पाहिजे.

घटनात्मक मूल्यांच्या वतीने घडवलेल्या अस्सल कार्यकारणाभावातूनच न्यायालयाचा अधिकार आकारास येत असतो. बौद्धिक नेतृत्व प्रदान करण्यास असमर्थ ठरलेल्या सरन्यायाधीशांची आपल्याकडे मालिकाच आहे. सध्या अस्तित्वात असलेल्या पद्धती झुगारून देत घटनापीठाची स्थापना करून सरन्यायाधीशांच्याच एका व्यवसायबंधूने त्यांचा संस्थात्मक पाणउतारा केल्याचे देशाने पाहीले आहे.

हितसंबंधांचा संघर्ष समजू न शकणारे न्यायाधीश आणि समाजासमोर आपलेच प्रतिमासंवर्धन करू पाहणारे न्यायाधीश यांच्यामध्ये न्यायपालिकेला आपले अस्तित्व टिकवणे अवघड दिसते. न्यायाधीशांची नेमणूक किंवा हितसंबंधांच्या संघर्षांची हाताळणी अशा बाबतीत न्यायालय गोंधळलेले आहे.

न्यायाधीशांमधील संवाद इतका कमी झाला आहे की, वरिष्ठ न्यायाधीशांना नेतृत्व करणे आणि सवार्ची एकत्र मोट बांधणे जिकिरीचे बनले आहे. ज्या पद्धतीने घटनापीठांची बांधणी केली जात आहे, त्यातून न्यायाधीशांमध्ये एकमेकांबद्दल असलेला अविश्वास अत्याधिक असल्याचे जाणवते.

वैयक्तिक न्यायाधीशांना जाणवणाऱ्या सद्गुणांच्या अवनतीमुळे न्यायपालिकेच्या एकत्रित लौकिकाला बाधा पोहचू लागली आहे. सध्याच्या अशांत काळात न्यायपालिका ही घटनात्मक दृष्टीने मार्गदर्शक तारा बनण्याऐवजी न्यायालये भारतीय संस्थांना लागलेल्या अत्यंत हीन किडीचे आणि भ्रष्टाचाराची लक्षणे बनली आहेत. आरती साठे हे एक प्रतिनिधिक उदाहरण समजायला हरकत नाही!

### आरती साठेंच्या नियुक्तीवर आक्षेप का?

राज्याच्या राजकारणात दोन वर्षांपूर्वी भाजपच्या प्रवक्त्या राहिलेल्या आरती साठे यांची मुंबई उच्च न्यायालयात न्यायाधीश पदावर नियुक्ती वादाच्या भोवऱ्यात सापडली आहे. सर्वोच्च न्यायालयातील कॉलेजिमयने २८ जुलै रोजी मंजूर केलेल्या प्रस्तावानुसार मुंबई उच्च न्यायालयात तीन नवीन न्यायाधीशांची नियुक्ती करण्यात आली. यामध्ये आरती अरुण साठे, अजीत भगवानराव कडेथांकर आणि सुशील मनोहर घोडेश्वर यांची नेमणूक करण्यात आली आहे. भाजपच्या माजी प्रवक्त्या आरती साठे यांच्या नेमणुकीनंतर वादाला तोंड फुटलं आहे. सत्ताधाऱ्यांची बाजू मांडणाऱ्या व्यक्तीची न्यायाधीश म्हणून नेमणूक होणं चुकीचं असल्याचं मत आमदार रोहित पवारांनी मांडत त्यांच्या नियुक्तीवर आक्षेप घेतला. उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्तीपदी नियुक्ती झाल्याबद्दल कायदेशीरदृष्ट्या ही नियुक्ती बरोबर आहे. कायदेशीर ही नियुक्ती योग्य असली तरी नैतिकदृष्ट्या चुकीची आहे. सरन्यायाधीशांच्या बरोबरची कॉलेजिअम सिस्टीम ही न्यायाधीशांची नियुक्ती करत असते. अशा पद्धतीने भारतीय जनता पार्टीच्या प्रवक्त्याची नियुक्ती चुकीची आहे. त्यामुळे सरन्यायाधीशांसह कॉलेजिअम सिस्टीम याला जबाबदार आहे. भारतीय जनता पार्टीच्यावतीने जो आधीचा दाखला देऊन प्रतिवाद केला गेला तो चुकीचा आहे. कारण तेव्हा कॉलेजिअम सिस्टीम नव्हती. आता आरती साठे यांची नियुक्ती झालेली आहे.

## मुलांना मिठी मारण्याची मॅन मम्स सर्व्हिस काय आहे?



आगळंवेगळं

आजकाल चीनमध्ये, मुली तणाव आणि भावनिक कमकुवतपणा दूर करण्यासाठी भाड्याने घेतलेल्या मोठ्या मुलांना मिठी मारतात. ही मुले त्यांना मिठी मारून आईसारखी भावना देतात.

आजकाल चीनमध्ये मॅन मम्स नावाचा एक नवीन ट्रेंड सुरू आहे. हा एक गट आहे जो तणावग्रस्त आणि भावनिकदृष्ट्या कमकुवत मुलींना ५ मिनिटांसाठी मिठी मारण्याची सेवा देतो. त्या बदल्यात मुली ६०० रुपये देत आहेत. या गटात जिममध्ये जाणारे आणि भावनिकदृष्ट्या प्रौढ मुले आहेत ज्यांच्याकडे आईची कोमलता आणि संयम आहे.

अलिकडेच, एका नैराश्याग्रस्त मुलीने ऑनलाइन पोस्ट केले की तिला तिच्या प्रबंधाच्या दबावाला तोंड देण्यासाठी तिच्या नवऱ्याच्या आईला मिठी मारायची आहे. तिने लिहिले, माध्यमिक शाळेत असताना मला एकदा मिठी मारण्यात आली होती आणि मला सुरक्षित वाटले.

**ही सेवा कशी काम करते?**

ही सेवा मिळविण्यासाठी, चीनमधील मुली सोशल मीडियावर 'मॅन मॉम्स' साठी पोस्ट करतात. त्यानंतर, मॅन मॉम्स ग्रुपशी संबंधित मुले त्यांच्याशी संपर्क साधतात. मुली या मुलांच्या प्रोफाइलवरून मॅन मॉम्स निवडतात. त्यांची फी २० ते ५० युआन (सुमारे २३० ते ५८०) पर्यंत असते. एका 'मॅन मम्स' ने सांगितले की मिठीसाठी शुल्क आकारल्याने भावनिक अंतर राखले जाते. तथापि, आता अनेक तज्ज्ञ या सेवेबद्दल सुरक्षिततेची चिंता व्यक्त करत आहेत. ■ ■ ■

## रक्षाबंधन : ब्रँडेड गोडी पेक्षा पारंपरिक गोडवा महत्वाचा..

वाचक लिहितात

सगळ्या नात्यांमध्ये सर्वात सुंदर असं नातं म्हणजे भाऊ-बहिणीचं नातं! बहिण-भावांमधील प्रेमाचे नाते अधिक घट्ट व्हावे याकरिता रक्षाबंधन हा सण आपण साजरा करतो. परंपरेनुसार विविध प्रांतांमध्ये पारंपरिक पद्धतीने घरी गोड पदार्थ बनवले जातात. महाराष्ट्रात ओल्या नारळापासून विविध पारंपरिक गोड पदार्थ बनवण्याची प्रथा आहे.

मात्र, हल्ली असं दिसून येतं की रक्षाबंधन जवळ येताच डेरी मिल्कसारख्या विदेशी चॉकलेट ब्रँडच्या जाहिराती मोठ्या प्रमाणावर दाखवल्या जातात. ह्लनात्यातील गोडवा डेरी मिल्क चॉकलेटने वाढवूयाह्ल, ह्लडेरी मिल्कसोबत रक्षाबंधन साजरा करूयाह्ल असे संदेश वारंवार दाखवले जातात.

पण एक प्रश्न विचारण्यासारखा आहे, आपले सण साजरे करण्यासाठी विदेशी चॉकलेटची आवश्यकता कधीपासून भासू लागली? पारंपरिक भारतीय गोड पदार्थांची इतकी रेलचेल असताना खरंच चॉकलेटची गरज आहे का? आणि केवळ आपल्या सणांच्या काळात अशा जाहिराती दाखवल्या जातात, जेणेकरून लहान मुलांना त्याची भुरळ पडेल.

अशा परिस्थितीत, एक सुज्ञ पालक म्हणून आपले कर्तव्य आहे की आपले सण हे आपल्या परंपरेनुसार, आपल्या पद्धतीने साजरे करावेत, याचे महत्त्व लहान मुलांना समजावून सांगणे आवश्यक आहे. यासाठी त्यांच्या मनात सणांमागील धार्मिक, सामाजिक आणि सांस्कृतिक मूल्यांचं बीज रोवायला हवं.

जेणेकरून ते जाहिरातींच्या प्रलोभनात न अडकता आपल्या सणांचे खरं स्वरूप समजून घेतील आणि परंपरेनुसार साजरे करण्यासाठी उद्युक्त होतील. यातूनच धर्माचरणाचे महत्त्व त्यांच्या मनावर बिंबेल आणि एक आदर्श सुसंस्कृत पिढी निर्माण होईल.

■ **सौ. प्रिया बागडदेव, छिंदवाडा**

## राहुल गांधी यांनी लोकभावना सांभाळून बोलावे!

राहुल गांधी हे देशातील सर्वात जुन्या राष्ट्रीय पक्षाचे प्रमुख नेते आहेत. संसदेतील विरोधी पक्ष नेतेपदाचे दायित्वही त्यांच्याकडेच आहे. त्यामुळे संसदेत बोलताना किंवा सार्वजनिकरित्या आपले मत मांडताना त्यांनी सामाजिक भान ठेवून तसेच जबाबदारीने मत मांडायला हवेः मात्र बऱ्याचदा या गोष्टीकडे ते गांभीर्याने पाहत नसल्याचे दिसून येते. त्यांनी लोकभावनांचा आदर करून जबाबदारीने वक्तव्ये करावीत याबाबत न्यायालयानेही त्यांना वेळोवेळी फटकारले असताना त्यांच्यात अपेक्षित पालट झालेला दिसून येत नाही. आतंकवाद, संरक्षण यांसारख्या संवेदनशील विषयांमध्येही त्यांची वक्तव्ये सामान्य जनतेच्या भावना दुखावणारी असतात. अशा विषयावर विरोधी पक्षाने आपले मत मांडताना राष्ट्रनिष्ठा, देशाची सुरक्षाविषयक धोरणे आणि सैनिकांचा त्याग यांविषयी योग्य तो आदर आणि संवेदना बाळगायला हव्यात. मात्र राहुल गांधी यांच्या बोलण्यात मात्र तसें जाणवत नाही. राष्ट्राप्रति जनतेच्या भावना नेहमीच आदराच्या असतात त्यामुळे राष्ट्राप्रति आदर आणि सन्मान बाळगाणाऱ्या, देशाचे सर्वच दृष्टीने संरक्षण करू शकणा?्या, शत्रूराष्ट्रात जरब निर्माण करणाऱ्या पक्षाच्या हाती जनता देशाची सत्ता सुपूर्द करते. राहुल गांधी यांची राजकीय सुडाने प्रेरित वक्तव्ये ऐकताना त्यामध्ये राष्ट्रभावना कुठेच दिसून येत नाही. मतदान करताना जनता या सर्व गोष्टीही लक्षात घेते याचे भान राहुल गांधी यांनी ठेवायला हवे.

■ **लीना मकरंद गाडगीळ, पनवेल.**

# विनोद सम्राट शाहीर दादा कोंडके

आज ८ ऑगस्ट, आपल्या इरसाल आणि गावरान भाषेतील विनोदाने महाराष्ट्राला खळखळून हसवणारे विनोद सम्राट शाहीर दादा कोंडके यांची जयंती.

जवळपास तीन दशकांहून अधिक काळ मराठी चित्रपट सृष्टीवर एकहाती अधिराज्य गाजवून मराठी सिनेमाला सुवर्णकाळ दाखवणाऱ्या विनोद सम्राट दादा कोंडके यांचा जन्म ८ ऑगस्ट १९३२ रोजी मुंबईतील नायगाव येथे झाला. त्यांचा जन्म झाला तो दिवस गोकुळ अष्टमीच्या होता, आपल्या पोटी बाळकृष्ण जन्माला आला म्हणून आई वडिलांनी त्यांचे नाव कृष्णा ठेवले.

पण लहानपणापासूनच सर्व जन त्यांना दादा म्हणत पुढे त्यांचे नाव रूढ झाले. त्यांच्या मोठ्या बंधूचे निधन झाल्याने त्यांच्यावर घराची जबाबदारी पडली त्यामुळे दादा दरमहा साठ रुपये पगारावर सेवादलाच्या बँड पथकात काम करू लागले.

लहानपणापासून दादांना कलेची आवड होती. सेवादलाच्या बँड पथकात त्यांच्या कला आणखी बहरून आल्या. फावल्या वेळात प्रसिद्ध गाण्यांचे विडंबन करणे, गाण्यांना चाली लावणे, विचित्र गाणी रचणे असे उद्योग दादा करू लागले. निळू फुले, राम नगरकर यासारखे जेष्ठ कलाकारही त्या काळात सेवादलात होते. तिथेच दादांची या महान कलाकारांशी मैत्री झाली आणि ही मैत्री पुढे आयुष्यभर टिकून राहिली.

दादा सेवादलाच्या बँड पथकात काम करत असल्याने त्या काळात त्यांना बँड वाले दादा म्हणूनच लोक ओळखत असे. पुढे दादांनी स्वतःचा फड काढला. गावोगावी जाऊन दादा स्वतःची कला सादर करू लागले.

वसंत सबनिसांच्या विच्छा माझी पुरी करा या वगनाट्याने त्यांच्या जीवनाला कलाटणी मिळाली. विच्छा माझी पुरी करा या वगनाट्याने दीडशे प्रयोग पूर्ण केले. त्या काळी हा विक्रम होता. या वगनाट्यामुळे दादा भलतेच लोकप्रिय झाले. गावागावांतील रसिक प्रेक्षक दादांना ओळखू लागले.

याच वगनाट्यातील त्यांचे काम पाहून महान दिग्दर्शक भालजी पेंढारकर यांनी त्यांना थेट चित्रपटात काम करण्याची संधी दिली. भालजी पेंढारकर यांनी त्यांना त्यांच्या तांबडी माती या चित्रपटात मुख्य भूमिका दिली. दादांनी या भूमिकेचे सोने केले.

हा चित्रपट तिकीटबारीवर हिट झाला. या चित्रपटातील गाणीही लोकप्रिय झाली. या चित्रपटानंतर दादांनी मागे वळून पाहिले नाही. मराठी चित्रपट सृष्टीत दादा कोंडके हे सर्वत्र नाव घुमू लागले.

१९७१ साली दादा कोंडके यांनी दिग्दर्शित केलेला सोंगाड्या हा चित्रपट प्रदर्शित झाला मात्र मुंबईतील चित्रपटगृह चालकांनी आपल्या चित्रपटगृहात सोंगाड्या न लावता तीन देविया हा हिंदी चित्रपट लावला. आपल्या पहिल्याच चित्रपटाला चित्रपटगृह मिळत नसल्याचे पाहून दादा उद्विग्न झाले आणि त्यांनी थेट बाळासाहेब ठाकरेंची भेट घेतली, मग काय बाळासाहेबांचा आदेश आणि शिवसैनिकांचा चित्रपटगृहात राडा.

शिवसैनिकांनी चित्रपटगृहात घातलेल्या राड्याने आणि बाळासाहेबांच्या आदेशाने सोंगाड्या चित्रपटगृहात प्रदर्शित झाला. नुसताच प्रदर्शित झाला नाही तर सुपर डूपर हिट झाला. सोंगाड्या पाहायला प्रेक्षकांच्या रांगा लागल्या. सोंगाड्या हा त्या काळातील सर्वाधिक हिट मराठी चित्रपट ठरला. सोंगाड्यामुळे मरगळलेल्या मराठी चित्रपट सृष्टीला ऊर्जितावस्था मिळाली.

तमाशापटाला कंटाळलेल्या मराठी चित्रपट रसिकांना सोंगाड्यात दादांनी आपल्या विनोदाने मनमुराद हसवले. दादांच्या विनोदाला मराठी रसिकांनी मनमुराद दाद दिली. सोंगाड्याच्या अभूतपूर्व यशानंतर दादा कोंडके यांनी आणखी एका नव्या चित्रपटाची घोषणा केली या चित्रपटाचे नाव होते एकटा जीव सदाशिव.

सोंगाड्यामुळे दादांची लोकप्रियता तुफान



वाढली होती.

या लोकप्रियतेचा धसका हिंदी चित्रपट सृष्टीनेही घेतला होता. दादांनी एकटा जीव सदाशिव या चित्रपटाची घोषणा केल्यावर राज कपूर यांनी त्यांच्या मुलासाठी म्हणजे ऋषी कपूर साठी काढलेला बॉबी या चित्रपटाच्या प्रदर्शनाची तारीख पुढे ढकलली.

सोंगाड्या पाठोपाठ एकटा जीव सदाशिव हा चित्रपटही सुपर हिट झाला. त्यानंतर दादांनी पांडू हवालदार या चित्रपटाची निर्मिती केली. या चित्रपटात दादांनी अशोक सराफ यांना संधी दिली. हा चित्रपटही यशस्वी ठरला मग काय त्यानंतर दादांच्या यशस्वी चित्रपटांची मालिकाच सुरू झाली.

तुमचं आमचं जमल, राम राम गंगाराम, बोट लावील तिथं गुदगुल्या, ह्योच नवरा पाहिजे, आली अंगावर, मुका घ्या मुका, पळवा पळवी, येऊ का घरात, सासरचे धोतर असे दादांचे सलग चित्रपट यशस्वी झाले.

सलग नऊ रौप्य महोत्सवी चित्रपट देण्याचा विक्रम दादांनी केला. त्यांच्या या विक्रमाची नोंद गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड मध्ये झाली.

त्यांच्या यशस्वी चित्रपटात त्यांच्या इरसाल विनोदाचा जितका वाटा होता तितकाच त्या चित्रपटातील श्रवणीय गाण्यांचा देखील होता. दादा कोंडके यांच्या चित्रपटातील सर्व गाणी गाजली. आजही दादांच्या चित्रपटातील गाणी तितकीच लोकप्रिय आहेत.

दादांचे चित्रपट जितके लोकप्रिय झाले तितकेच ते वादग्रस्तही ठरले. त्यांच्या सर्वच चित्रपटांना सेन्सॉर बोर्डने आडकाठी आणली. मात्र दादांनी सेन्सॉर बोर्डाच्या या दंडेली पुढे कधीही नमते घेतले नाही. उलट सेन्सॉर बोर्डशी त्यांनी कायम दोन हात केले. ज्या शिवसेनेमुळे त्यांचे चित्रपट चित्रपटगृहात प्रदर्शित होऊ शकले त्या शिवसेनेशी त्यांनी कधीही प्रतारणा केली नाही. आयुष्यभर त्यांनी शिवसेनेशी बांधिलकी राखली.

१४ मार्च १९९८ रोजी हृदय विकाराच्या झटक्याने त्यांचे निधन झाले. दादांच्या निधनाने मराठी मनोरंजन विश्वावर दुःखाचा डोंगर कोसळला. प्रेक्षकांना खळखळून हसवणा?या विनोदाच्या या सम्राटाने अशी अकाली एक्झीट घेतल्याने प्रेक्षकांना मोठा धक्का बसला. त्यांच्या निधनाने मराठी मनोरंजन विश्वाला सुवर्णकाळ दाखवणारा विनोदाचा सम्राट काळाच्या पडद्याआड गेला.

मराठी चित्रपट सृष्टीत त्यांच्यासारखा विनोद सम्राट पूर्वी झाला नाही आणि पुढेही होणार नाही. विनोद सम्राट दादा कोंडके यांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!



श्याम ठाणेदार
दौंड. जिल्हा पुणे.
९९२२५४६२९५



## ब्रोकोली : या लोकांसाठी ठरू शकते हानिकारक

आरोग्याची काळजी घेत असताना योग्य आहार घेणे देखील महत्वाचे आहे. अशातच योग्य आहार घेताना अनेकजण ब्रोकोलीचे सेवन करत असतात. कारण ब्रोकोलीत असलेले पोषक तत्व, जीवनसत्त्वे आणि खनिजे आपल्या सर्वांच्या आरोग्यासाठी फायदेशीर आहे.

कर्करोगाशी लढण्यासाठी, वजन कमी करण्यासाठी आणि शरीराला आतून बळकट करण्यासाठी ब्रोकोलीला सुपरफूड मानले जाते. परंतु तुम्ही कधी विचार केला आहे का की ज्या भाजीला तुम्ही इतके फायदेशीर मानता ती काही लोकांच्या आरोग्यासाठी हानिकारक देखील असू शकते.

**थायरॉईडच्या समस्येने ग्रस्त असलेले लोक**

जर तुम्हाला थायरॉईडची समस्या असेल तर ब्रोकोली तुमच्यासाठी समस्या निर्माण करू शकते. ब्रोकोलीमध्ये गॉइट्रोजन नावाचा घटक असतो जो थायरॉईड संप्रेरकाचे उत्पादन थांबवू शकतो. जर तुम्हाला हायपोथायरॉईडीझमचा त्रास असेल तर ब्रोकोलीचे जास्त सेवन केल्याने तुमची समस्या आणखी गंभीर होऊ शकते. त्यामुळे थायरॉईडच्या रुग्णांनी ब्रोकोली खाणे टाळावे किंवा डॉक्टरांचा सल्ला घ्यावा.

**गॅस आणि पोटफुगीची समस्या**

ब्रोकोलीमध्ये भरपूर प्रमाणात फायबर असते, जे पचनासाठी खूप चांगले असते, परंतु ज्या लोकांची पचनसंस्था कमकुवत असते किंवा ज्यांना अनेकदा गॅस आणि पोटफुगीची तक्रार असते त्यांच्यासाठी ब्रोकोलीचे सेवन हानिकारक ठरू शकते. ब्रोकोलीमध्ये असलेले फायबर आणि विशेष प्रकारचे कार्बोहायड्रेट्स पोटात गॅस निर्माण करू शकतात, ज्यामुळे तुम्हाला अस्वस्थता वाटू शकते.

**रक्त पातळ करणारी औषधे घेणारे रुग्ण**

ब्रोकोलीमध्ये व्हिटॅमिन के भरपूर प्रमाणात असते. व्हिटॅमिन के रक्त गोठण्यास मदत करते. जर तुम्ही रक्त पातळ करणारी औषधे घेत असाल तर ब्रोकोली खाल्ल्याने या औषधांचा परिणाम कमी होऊ शकतो. यामुळे रक्त गोठण्याचा धोका वाढू शकतो. अशा परिस्थितीत या रुग्णांनी ब्रोकोली खाण्यापूर्वी डॉक्टरांचा सल्ला घ्यावा.

**किडनी स्टोनचे रुग्ण**

किडनी स्टोनच्या रुग्णांनीही ब्रोकोलीचे सेवन कमी करावे. ब्रोकोलीमध्ये पोटॅशियम असते, ज्यामुळे काही प्रकारचे किडनी स्टोन तयार होऊ शकतात. याशिवाय ब्रोकोलीमध्ये ऑक्सलेट देखील असते, जे शरीरात कॅल्शियमशी एकत्रित होते आणि स्टोन तयार होण्यास मदत करते. जर तुम्हाला किडनीशी संबंधित काही समस्या असतील तर तुमच्या आहारात ब्रोकोलीचा समावेश करण्यापूर्वी डॉक्टरांचा सल्ला घ्या. ■ ■

अशोकायन

प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)



## सोशल प्रेशर

**लोक काय म्हणतील चा**
**येई मानसिक ताण तणाव**
**मनाला पटत नसलं तरी**
**काही गोष्टी करतो ना राव..**

**मन मारून जगलं की**
**मन होते अस्वस्थ**
**यातुनच निर्माण होते**
**नकारात्मकतेचं प्रस्त..**

**व्यक्ती तितक्या प्रकृती**
**त्यामुळे उठेल टिकेची झोड**
**तुझ्या अंतर्मनाला जे पटतं**
**ते भाऊ तू कर सडेतोड..**

# धरती आबा योजनेच्या माध्यमातून आदिवासी समाजाच्या विकासाला चालना - मंत्री प्रा.डॉ.अशोक उईके

पालघर, दि. ७ : प्रतिनिधी

'प्रधानमंत्री जनजातीय न्याय महाअभियान आणि धरती आबा जनजातीय ग्राम उत्कर्षअभियान या योजने' सह विविध कल्याणकारी योजनांची प्रभावी अंमलबजावणी करत आदिवासी समाजाच्या सर्वांगीण विकासाला दिशा देण्यात येत आहे. याच पार्श्वभूमीवर पालघर जिल्ह्यात आज प्रशासन, वस्तीगृहातल्या विद्यार्थिनी व लाभार्थ्यांशी आदिवासी विकास मंत्री प्रा.डॉ.अशोक उईके यांनी थेट संवाद साधला. जिल्हा नियोजन सभागृह जिल्हाधिकारी कार्यालय येथे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी आमदार राजेंद्र गावित, आमदार हरिश्चंद्र भोये, आमदार विनोद निकोले, कोकण विभागीय आयुक्त विजय सूर्यवंशी. (दूरदृश्य प्रणाली द्वारे ) जिल्हाधिकारी डॉ. इंदु राणी जाखड, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मनोज रानडे, अप्पर आयुक्त, आदिवासी विकास, ठाणे गोपीचंद कदम, अपर जिल्हाधिकारी भाऊसाहेब फटांगरे, निवासी उपजिल्हाधिकारी सुभाष भागडे, प्रकल्प अधिकारी तथा सहायक जिल्हाधिकारी विशाल खत्री, जव्हार सहाय्यक प्रकल्प अधिकारी दीपक टिके आदी वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते

या वेळी बोलताना आदिवासी विकास मंत्री प्रा. डॉ.अशोक उईके यांनी सांगितले की, "आदिवासी समाजासाठी 1972 पासून स्वतंत्र विभागाची स्थापना झाली. समाजकल्याण व आदिवासी विकास विभाग वेगळे करण्यात आले. त्यानंतर स्वतंत्र बजेट आणि योजना देण्यात आल्या. अजूनही शासकीय आश्रमशाळांच्या गुणवत्तेबाबत सकारात्मक सुधारणा करण्यात येणार आहेत. शासकीय आश्रमशाळा हे केंद्रबिंदू मानून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण, व्यक्तिमत्त्व विकास आणि स्पर्धात्मक क्षमतेचा विकास हे आमचे मुख्य उद्दिष्ट आणि संकल्प असल्याचे प्रतिपादन प्रा. डॉ.अशोक उईके यांनी केले.



'क्रांतिवीर राघोजी भांगरे शिष्यवृत्ती योजने' अंतर्गत गुणवंत विद्यार्थ्यांचा घरोघरी जाऊन सन्मान करण्यात येणार असून . "जेव्हा समाजात विद्यार्थी आणि त्यांचे पालक गौरवले जातात, तेव्हा त्यांच्या मनात नवचैतन्य आणि प्रेरणा निर्माण होते. त्यामुळे अशा योजनेचा प्रभावी प्रचार-प्रसार करणे गरजेचे असल्याचे प्रतिपादन श्री. उईके," यांनी सांगितले .

कुटुंबांच्या शेतीसंबंधी गरजा, पाणी, सिंचन, बियाणे, खत, साधने , रस्ते, शिक्षण, आरोग्य, रोजगार यासह पायाभूत सुविधा निर्माण केल्या जाणार आहेत.यासाठी हि योजना थेट मदत करणारी योजना आहे. या योजनेचा लाभ अनुसूचित जमातींच्या सर्व घटनांना मिळणार आहे

जिल्हाधिकारी डॉ. इंदु राणी जाखड यांचे काम व कार्यपद्धतीचे विशेष कौतुक आदिवासी विकास मंत्री प्रा.डॉ.अशोक उईके यांनी केले, "२०१९ मध्ये डॉ.इंदु राणी जाखड गडचिरोली मध्ये प्रकल्प अधिकारी होत्या तिथेही त्यांनी अनेक उपक्रम प्रभावीपणे राबवले होते. आता त्या पालघर जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी असल्यामुळे शासकीय योजना पासून एकही कुटुंब वंचित राहणार नाही असा विश्वासही आदिवासी विकास मंत्री प्रा.डॉ.अशोक उईके यांनी व्यक्त केला.

पालघर जिल्ह्याच्या आदिवासी समाजातील विकासासाठी शासन, प्रशासन आणि समाज यांच्यातील सुसंवाद साधने आणि योजनांची प्रभावी अंमलबजावणी करून जिल्ह्यातील प्रत्येक घटकाला जिल्हाधिकारी डॉ. इंदु राणी जाखड शासनाच्या योजनेचा लाभ देतील .पालघर जिल्ह्यातील ६५४ गावांतील 1 लाख 81 हजार 552 कुटुंबीयांपर्यंत धरती आबासह विविध लोक उपयोगी योजना पोहोचवण्याचे उद्दिष्ट पालघर जिल्हा प्रशासनाने निश्चित केले आहे.असेही प्रा. डॉ. उईके यांनी सांगितले. पालघर येथील शासकीय मुलींच्या वस्तीगृहातील विद्यार्थिनीशी आदिवासी विकास मंत्री प्रा. डॉ.अशोक उईके यांनी संवाद साधला.

पालघर शहरातील आदिवासी विकास विभागाअंतर्गत येणाऱ्या शासकीय मुलीच्या वस्तीगृहाची पाहणी करून विद्यार्थिनीच्या अडीअडचणी जाणून घेतल्या. यावेळी मंत्री प्रा .डॉ. अशोक उईके यांनी विद्यार्थ्यांना देण्यात येणारे अन्न तसेच राहण्याची व्यवस्था योग्य प्रकारे आहे याची खात्री केली. धरती आबासह विविध योजनेचा आढावा आदिवासी विकास मंत्री प्रा. डॉ.अशोक उईके यांनी घेतला . यावेळी विभागातील सर्व जिल्हाधिकारी तसेच जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी उपस्थित होते. यावेळी गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार तसेच लाभार्थ्यांना धनादेशाची वाटप आणि 9 ऑटो रिक्षाचे वितरण आदिवासी विकास मंत्री प्रा. डॉ. अशोक उईके यांच्या हस्ते करण्यात आले.

# बार्टीमार्फत युपीएससी, एमपीएससी पूर्व प्रशिक्षणासाठी नोंदणी सुरू

मुंबई, दि. ७ : प्रतिनिधी

सर्वंकष धोरणाअंतर्गत बार्टीमार्फत यूपीएससी, एमपीएससी पूर्व प्रशिक्षणासाठी नोंदणी सुरू करण्यात आली आहे. या प्रशिक्षणासाठी पात्र प्रशिक्षणार्थ्यांची निवड सामायिक प्रवेश परीक्षा आणि गुणांकन पद्धतीद्वारे करण्यात येणार आहे. शैक्षणिक पात्रता, आरक्षण व सीईटीमधील गुणांच्या आधारे अंतिम निवड ही स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण कार्यक्रमाच्या संनियंत्रण व अंमलबजावणी समितीमार्फत केली जाणार असल्याची माहिती बार्टी कार्यालयाने दिली आहे.

बार्टी, टीआरटीआय, सारथी, महाज्योती व आर्टी या संस्थांमार्फत त्यांच्या लाभार्थी गटाच्या आर्थिक तसेच सामाजिक विकासासाठी विविध प्रकल्प व योजना राबवल्या जातात. या संस्थांच्या लाभार्थी गटातील युवक आणि युवतींसाठी विविध स्पर्धा परीक्षा व त्याच्या पूर्व प्रशिक्षण कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. या प्रशिक्षण योजनांची अंमलबजावणी करण्यासाठी शासनामार्फत एक सर्वंकष धोरण निश्चित करण्यात आले आहे. या धोरणानुसार, या पाचही संस्थांमार्फत राज्यातील पात्र व इच्छुक उमेदवारासाठी दिल्ली येथे युपीएससी नागरी सेवा परीक्षा पूर्व प्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य युपीएससी नागरी सेवा परीक्षा पूर्व प्रशिक्षण, महाराष्ट्र राज्यसेवा परीक्षा पूर्व प्रशिक्षण, महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवा परीक्षा पूर्व प्रशिक्षण, महाराष्ट्र न्यायिक सेवा परीक्षा पूर्व प्रशिक्षण कार्यक्रमांसाठी जाहिरात प्रसिध्द करण्यात आली आहे.

बार्टी मार्फत अनुसूचित जातीतील विद्यार्थ्यांना शासकीय नौकरी मिळावी आणि त्याचा आर्थिक विकास साधावा यासाठी नामांकित खासगी व्यावसायिक प्रशिक्षण संस्थामार्फत हे प्रशिक्षण देण्यात येणार आहे. या प्रशिक्षणासाठी बार्टी मार्फत ऑनलाईन अर्ज मागविण्यात येत आहेत.योजनेचा सविस्तर तपशील, शासन निर्णय, आवश्यक कागदपत्रे इत्यादी माहिती बार्टीच्या http://barti.maharashtra gov.in अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध आहे. अर्ज फक्त संकेतस्थळावर दिलेल्या लिंकवरून ऑनलाईन स्वरूपातच स्वीकारले जातील.

# गणेशोत्सवापूर्वी मुंबई-गोवा महामार्ग खड्डेमुक्त करण्याचा मानस - मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले

## पळस्पे ते कशेडी बोगदा रस्त्याची केली पाहणी

रायगड, दि. ७ : प्रतिनिधी

गणेशोत्सवासाठी कोकणात जाणाऱ्या चाकरमान्यांना रस्त्यांवरील खड्ड्यांचा जो त्रास होतोय, तो त्रास होवू नये, यासाठी शासनाकडून सर्व प्रकारच्या उपाययोजना करण्यात येत आहेत. गणेशोत्सवापूर्वी मुंबई-गोवा महामार्ग खड्डेमुक्त करण्याचा आमचा मानस असल्याचे प्रतिपादन सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी आज येथे केले.

सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी आज मुंबई गोवा महामार्गावरील सुरू असलेल्या रस्त्याच्या कामांची पाहणी केली, त्यावेळी ते बोलत होते. मुंबई गोवा महामार्गावरील कामाची प्रत्यक्ष पाहणी करण्यासाठी राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्र राजे भोसले रायगड आणि रत्नागिरी जिल्हा दौऱ्यावर आहेत. पनवेल



येथील पळस्पे फाटा येथून या पाहणी दौऱ्यास सुरुवात झाली.

या पाहणी दौऱ्यावेळी त्यांच्या समवेत आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, आम.रविंद्र पाटील, जिल्हाधिकारी किशन जावळे, मुख्य कार्यकारी नेहा भोसले, जिल्हा पोलीस अधीक्षक आचल दलाल, मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग एम.एन.राजभोज, अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ कोकण भवन सुषमा गायकवाड, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणचे प्रकल्प संचालक यशवंत घोटकर आदि उपस्थित होते.

महाड येथील शासकीय विश्रामगृहात आयोजित आढावा बैठकीत ते म्हणाले की, मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गाची कामे प्राधान्याने पूर्ण करावीत, प्रवास करताना नागरिकांना वाहतूक कोंडीचा त्रास होणार नाही याची खबरदारी घ्यावी अशा सूचना त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या. मुंबई-गोवा महामार्गाचा पाहणी दौरा सुरु असून नागरिकांना आवश्यक सुविधांमध्ये सुधारणा करण्यावर राज्य शासनाकडून भर देण्यात येत असून महामार्गाचे काम दर्जेदार झाले पाहिजे आणि लवकर पूर्ण झाले पाहिजे यासाठी निश्चितच प्रयत्न केला जात आहे.

रस्त्याचे काम लवकरात लवकर पूर्ण होण्यासाठी तसेच खड्ड्यांवर कायमस्वरूपी उपाययोजना करण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करण्यास सुरुवात केली आहे. या माध्यमातून मुंबई-गोवा महामार्ग खड्डेमुक्त करण्याचा तसेच उर्वरित काम लवकरात लवकर पूर्ण करण्याचा आमचा प्रयत्न आहे. इंदापूर व माणगाव बायपास पुलाच्या निविदा प्रक्रिया पूर्ण झाली असून या कामासाठी नवीन ठेकदारांची नेमणूक करण्यात आली असून हे काम पूर्ण होण्याकरिता किमान एक वर्षाचा कालावधी लागू शकतो असेही त्यांनी यावेळी सांगितले.

# अजित पवार बीडमध्ये – शेतकरी नेते नजरकैदेत! प्रशासनावर छावाची घणाघाती टीका

बीड, दि. ७ : प्रतिनिधी

राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार बीड दौऱ्यावर असताना शेतकरी नेते व 'छावा' संघटनेचे कार्यकर्ते नजरकैदेत ठेवण्यात आल्याचा आरोप होऊन वातावरण चांगलंच तापलं आहे. छावा संघटनेचे प्रदेशाध्यक्ष विजयकुमार घाडगे पाटील यांनी या कारवाईवर जोरदार टीका केली असून, "शेतकऱ्यांचा आवाज दाबण्याचा हा कट" असा आरोप त्यांनी केला आहे.

घाडगे म्हणाले, "शेतकरी आंदोलनातील नेते आणि आमचे कार्यकर्ते नजरकैदेत का? सरकारला विरोधाची भीती वाटतेय का? शेतकऱ्यांचे प्रश्न – कर्जमाफी, पीकविमा, हमीभाव – हे आमचे मूलभूत हक्क आहेत. नेत्यांना भेटून आमचा आवाज पोहोचवण्याचा अधिकारही हिरावला जातोय." घाडगे पुढे म्हणाले, "शेतकऱ्यांच्या मुलांना नजरकैदेत ठेवून नव्हे, त्यांचा हक्काचा आवाज ऐकून कर्जमाफी द्या – तेव्हा ते तुमचं स्वागत करतील!" यावेळी अनेक छावा कार्यकर्त्यांनीही ही घटना म्हणजे दडपशाही आहे असे सांगून तीव्र नाराजी व्यक्त केली.

दुसरीकडे, अजित पवार यांनी नियोजित वेळेपेक्षा अर्धा ते एक तास आधीच बीडमधील दौऱ्याला सुरुवात केल्याने प्रशासनाची चांगलीच धांदल उडाली.

आज सकाळी 6.15 वाजताच ते कनकालेश्वर मंदिर विकास आराखड्याच्या पाहणीसाठी पोहचले. त्यानंतर महसूल विभाग व जिल्हाधिकारी कार्यालयाच्या इमारतींच्या कामांची पाहणी केली. 10 वाजता बैठक होती, पण पवार 8.25 वाजता पोहचले आणि बैठक सुरू केली.

लातूर दौऱ्यात गैरहजर राहिलेले मंत्री धनंजय मुंडे मात्र आज सकाळी ठरलेल्या वेळेआधीच उपस्थित राहिल्याने राजकीय चर्चांना उधाण आले. परळी मतदारसंघ आणि जिल्ह्यातील विविध विकासकामांबाबत महत्त्वाच्या बैठकांचा आज अजेंडा आहे.

या पार्श्वभूमीवर शेतकरी संघटना आणि कार्यकर्त्यांनी प्रश्न उपस्थित केला आहे – "अजित पवारांच्या दौऱ्याला विरोध करणाऱ्यांवर प्रशासन दबाव टाकतंय का?" बीड जिल्ह्यातील ही घटना केवळ प्रशासनिक नाही, तर राजकीयदृष्ट्या खळबळजनक ठरत आहे.

# पोस्टाची रजिस्टर्ड पोस्ट सेवा होणार इतिहासजमा

मुंबई, दि. ७ : प्रतिनिधी

भारतीय टपाल खात्याने 1 सप्टेंबर 2025 पासून रजिस्टर्ड पोस्ट सेवा बंद करण्याचा निर्णय घेतला आहे. हा निर्णय टपाल विभागाच्या आधुनिकीकरण योजनेचा एक भाग असून याचा उद्देश काम अधिक जलद चालवणे असा असल्याचे टपाल विभागाने स्पष्ट केले आहे. रजिस्टर्ड पोस्ट सेवा आता स्पीड पोस्टमध्ये विलीन केली जाईल. टपाल विभागाच्या या निर्णयामुळे सर्वात जुनी रजिस्टर्ड पोस्टसेवा इतिहासजमा होणार आहे.

टपाल विभागाच्या सचिव आणि महासंचालकांनी सर्व सरकारी कार्यालये, न्यायालये, शाळा-महाविद्यालये आणि मोठ्या प्रमाणात टपाल सेवा वापरणाऱ्यांना 1 सप्टेंबरपर्यंत पूर्णपणे स्पीड पोस्टवर वळण्याचे निर्देश दिले आहेत. त्यांच्या मते स्पीड पोस्टमुळे डिलिव्हरी जलद होईल, ट्रॅकिंग चांगले होईल आणि कामकाजात अधिक पारदर्शकता येईल. रजिस्टर्ड पोस्ट सेवा 1854 मध्ये सुरू झाली. त्यानंतर स्पीड पोस्ट 1986 मध्ये सुरू झाले. मात्र रजिस्टर्ड पोस्टपेक्षा ते लोकांमध्ये आधीच लोकप्रिय आहे.

रजिस्टर्ड पोस्ट बंद केल्याने अनेक लोक भावनिक झाले आहेत, विशेषतः वृद्ध आणि गावांमध्ये राहणारे लोक. ही सेवा ब्रिटिश काळापासून सुरू होती आणि बँका, विद्यापीठे, न्यायालये आणि सरकारी कार्यालयांसाठी विश्वासार्ह होती. त्याची खासियत अशी की डिलिव्हरीचा पुरावा न्यायालयातही वैध होता. आता ते बंद केल्याने केवळ तांत्रिक बदल होणार नाहीत तर एका ऐतिहासिक टपाल सेवेचाही अंत होईल. वापर झाला कमी गेल्या काही वर्षांत रजिस्टर्ड पोस्टचा वापर सातत्याने कमी होत आहे. सरकारी आकडेवारीनुसार, 2011-12 मध्ये 244.4 दशलक्ष नोंदणीकृत टपाल पाठवण्यात आले होते, तर 2019-20 मध्ये ही संख्या 184.6 दशलक्ष झाली.

## आज का अंदाज

शुक्रवार ८ ऑगस्ट २०२५

पत्थर फोड एकच

| कल्याण बाजार | | | | मुंबई बाजार | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २ | ३ | ६ | ९ | २ | ५ | ६ | ७ |
| ३४५ | ४९० | ३३० | ११७ | ६७९ | २४९ | ७९० | ४५८ |
| १५६ | ५८० | ७९० | ५६८ | ११० | ३५७ | ४६६ | ३६८ |
| २२७ | ६७० | ११४ | ३८८ | २२८ | ११३ | ११४ | २७८ |
| २४ | ३४ | ६१ | ९१ | २१ | ५१ | ६८ | ७८ |
| २० | ३० | ६७ | ९७ | २३ | ५३ | ६० | ७० |
| २८ | ३८ | ६५ | ९५ | २९ | ५९ | ६४ | ७४ |

८ ऑगस्ट : सर्व बाजारांसाठी

| | | | |
|---|---|---|---|
| १९ | ४९ | ७२ | ८२ |
| १० | ४० | ७३ | ८३ |
| १६ | ४६ | ७५ | ८५ |
| १२८ | १५८ | १८८ | २६० |
| २९० | ३४७ | ५६६ | ४५९ |
| ५७९ | ६९९ | २७८ | ३६९ |

कल्याण व मुंबई करिता तसेच सर्व बाजारासाठी जबरदस्त पास होणारे चान्सेस मिळतील.

प्रो. बालाजी कुमार ९८२२४८६०३४

## झी टीव्हीच्या सरू मालिकेत मोहक मटकर ऊर्फ सरूचा मंत्रमुग्ध करणारे राजस्थानी कठपुतळी नृत्य



मुंबई, ७ ऑगस्ट : झी टीव्हीवरील सरू ही मालिका सध्या उच्च दर्जाच्या नाट्यमय घडामोडींमुळे प्रेक्षकांच्या विशेष पसंतीस उतरली आहे. अनिका (अनुष्का मर्चंडे) ही वेद (शगुन पांडे) याच्याशी साखरपुडा करण्यासाठी सतत योजना रचत आहे. या सगळ्या गोंधळात सरू (मोहक मटकर) ही साखरपुडा थांबवण्यासाठी आपले सर्वस्व पणाला लावत आहे. तिच्या डोळ्यांतून व्यक्त होणारी भावनात्मक ताकद, नाजूक अभिनय आणि तेजस्वी उपस्थिती यामुळे मोहक मटकरने प्रेक्षकांच्या मनावर एक विशेष ठसा उमटवला आहे.

एका आगामी थरारक प्रसंगात मोहक मटकर पारंपरिक राजस्थानी कठपुतळी नृत्य सादर करताना प्रेक्षकांना मंत्रमुग्ध करणार आहे. या सांस्कृतिक सादरीकरणात प्राण फुंकण्यासाठी मोहकने राजस्थानी कठपुतळी नृत्याच्या बारकाव्यांमध्ये स्वतःला पूर्णपणे झोकून दिले. स्वतः एक प्रशिक्षित शास्त्रीय नृत्यांगना असल्याने तिने या नृत्यशैलीतील नाजूक हावभाव आणि लयबद्ध हालचाली आत्मसात करण्यासाठी तासन्तास मेहनत घेतली. शिवाय, पारंपरिक राजस्थानी पोशाखासाठी ती वेशभूषा टीमसोबत जवळून काम करत होती.

या प्रसंगाबद्दल बोलताना मोहक मटकर म्हणाली, सरूची भूमिका साकारणे ही एक अद्भुत अनुभूती आहे, आणि हे नृत्यदृश्य माझ्यासाठी खास आहे कारण यामुळे प्रेक्षकांना सरूचा एक वेगळा पैलू पाहायला मिळतो. नृत्य हा नेहमीच माझा जिव्हाळ्याचा विषय राहिला आहे, आणि मी एक प्रशिक्षित शास्त्रीय नृत्यांगना असल्यामुळे एक वेगळी नृत्यशैली शिकण्याची संधी मिळणे मला खूप आवडले.

## राशीभविष्य

**मेष :** आज सावधगिरीने व्यवसाय करा. कोणत्याही प्रकारची जोखीम घेऊ नका. तुम्हाला शुभ सण इत्यादींबद्दल माहिती मिळेल. गोंधळ आणि चिंताची स्थिती राहील.

**वृषभ :** आज काम पूर्ण होण्यात अडथळे येतील. पण काही प्रयत्न केल्यानंतर परिस्थिती अनुकूल होऊ लागेल. यामुळे तुमचा आत्मविश्वास वाढेल. पूर्वी प्रलंबित असलेले काही काम पूर्ण होण्याची शक्यता आहे.

**मिथुन :** आज तुम्हाला परीक्षा आणि स्पर्धेत यश मिळेल. तुमच्या मुलांची जबाबदारी पार पडेल. कामाच्या ठिकाणी तुमच्या कुशल व्यवस्थापनाचे कौतुक होईल. व्यावसायिक मित्रांकडून पाठिंबा मिळेल.

**कर्क :** कामाच्या ठिकाणी समस्या कमी होतील. सहकाजयांसोबत सहकार्याचे वर्तन वाढवण्याचा प्रयत्न करा. नियोजित कामात यश मिळण्याची शक्यता आहे. समाजात तुमचे स्थान निर्माण करण्यात यशस्वी व्हाल.

**सिंह :** आज तुम्हाला अशा कामात यश मिळेल ज्याची तुम्ही खूप दिवसांपासून वाट पाहत होता. कामाच्या क्षेत्रातील समस्या शांततेने सोडवाव्या लागतील. कार्यक्षेत्राबाबत नवीन कार्य योजना बनवल्या जातील.

**कन्या :** खाजगी व्यवसायाशी संबंधित लोकांना व्यवसायात चढ-उतारांचा सामना करावा लागेल. उपजीविकेच्या क्षेत्रात, लोकांनी त्यांच्या कार्यक्षेत्राबद्दल अधिक सावधगिरी बाळगली पाहिजे.

**तुळ :** नोकरीत उच्च अधिकाजयाशी तुमची जवळीक वाढेल. न्यायालयीन प्रकरणांमध्ये तुम्हाला मोठे आणि महत्त्वाचे यश मिळेल. आज कामाच्या ठिकाणी अनावश्यक धावपळ होईल. तुमचा राग नियंत्रित करा.


**वृश्चिक :** आज तुम्हाला कामाच्या ठिकाणी संघर्ष करावा लागेल आणि कठोर परिश्रम करावे लागतील. लहान सहलीला जाण्याची शक्यता जास्त असेल. समन्वय साधण्याची आवश्यकता असेल.

**धनु :** आज तुम्ही राजकारणात वर्चस्व गाजवाल. तुम्हाला एखादा जुना मित्र भेटेल. कोणतेही महत्त्वाचे काम पूर्ण सतर्कता आणि सावधगिरीने करा. अन्यथा काम बिघडू शकते. मित्र व्यवसायात मदत करतील. मकर : तुम्हाला नोकरीत बढती मिळेल आणि तुमच्या इच्छेनुसार काम करण्याची संधी मिळेल. तुमच्या कौटुंबिक जीवनातील तणाव संपेल. तुम्ही मित्रांसोबत पर्यटनाचा आनंद घ्याल.

**कुंभ :** आजचा दिवस तुमच्यासाठी मिश्रित परिणामांचा असेल. तुमचे वर्तन सुधारण्याचा प्रयत्न करा. समाजात तुमची ओळख निर्माण करण्याचा प्रयत्न करा. तुमची महत्त्वाची कामे इतरांवर सोपवू नका.

**मीन :** एखादा विश्वासू व्यक्ती व्यवसायात तुमची फसवणूक करू शकतो. तुम्हाला एखाद्या प्रिय व्यक्तीपासून दूर जावे लागू शकते. नकोसा प्रवास करावा लागेल. आज कुटुंबात एक शुभ घटना घडेल.

## शब्दकोडे क्रमांक २१८६




**आडवे शब्द :-**
१) मत देणारा
४) बाजारबुणगे
८) मदत
९) सततचे नामस्मरण
१०) लाल डोळ्याचा शुभ्र पांढरा प्राणी
११) वृद्धत्वाने पीडलेला
१२) बढाया मारणारा
१३) मालक
१४) लाकडी जिना
१६) मेहनत, त्रास, कष्ट
१८) होडी
१९) रेशमी कापडाचा एक प्रकार
२१) धुळीचा कण
२२) देश
२४) लक्ष्मी
२६) दुर्गंधी येऊ लागलेला
२८) मृताची क्रिया
३०) जेव्हा
३२) रोकड
३३) विहिरीतून पाणी काढण्याचे जोड साधन
३६) इंद्र
३८) दडविणे
४१) *** पालन, संगोपन
४२) रक्षण करणारा
४४) किंमत, प्रत्येक
४५) कहाणी
४७) जमीन सिमेंटने गुळगुळीत करणे
४८) वल्लरी
५०) महिना
५२) आजूबाजूस
५४) पुष्कळ
५५) मुलगी
५७) सबब, निमित्त
५९) सासरच्या विरुद्ध
६२ ) वाचणारा
६४) औषध
६६) आश्रय, टेका
६७) फूल, पुष्प
६८) रेशमी धोतर
६९) दुसऱ्याच्या मनातील विचार जाणणारा
७१) परका, अपरिचित
७३) त्वचेचे सालपट (बो भा)
७४) पुरुष
७५) नेहमी, सदोदित
७७) सप्तस्वरातील पहिला स्वर
७८) मुख, तोंड
७९) एक पक्षी
८०) उत्सव

**उभे शब्द :-**
१) टप्पे घेत घेत केलेला प्रवास
२) बारा वर्षाचा काळ
३) अतिशयोक्ती करणे (म्ह.)
४) वाळवी
५) त्या प्रमाणे
६) रात्र
७) राजाची कारकीर्द
८) गुजराथमधील एक धरण
१२) भांडण, चर्चा
१३) नवरा
१५) चांदी
१७) जागविणारा आवाज
१८) आवाज, छंद
२०) एक अधिक एक चतुर्थांश
२३) धोबी
२५) आई (ग्रा)
२७) लक्ष, एक आंकडा
२९) मोठा भूभाग
३१) वणवा
३४) आकाशातून पडणारे हिमकण (अ. व.)
३५) कमीतकमी
३७) द्वेष
३९) अधिकाराचे स्थान, गीत
४०) दुधाचे दही बनविणारा पदार्थ
४३) माफी मागणारा
४५) शिखराचे टोक
४६) खोटी कारणे
४९) वडील
५१) ठेकेदार
५३) संतोष, आनंद
५६) नूतन
५८) पाठवणी
६०) परराष्ट्राच्या बातम्या गुप्तपणे काढणारा
६१) नक्की, खात्रीने
६३) कदर करणारा
६५) हिंमत, धैर्य
६७) परमेश्वर
७०) मोठी टोपली
७१) कबूतर
७२) बैलाच्या नाकात घालण्याचा दोर
७४) सुसर
७६) सेवक, गुलाम

(उत्तर उद्याच्या अंकात)

### मागील शब्दकोड्याचे उत्तर



# संत संगतीने तत्काळ ईश्वर प्राप्ती : जगदगुरु स्वामी शांतिगिरीजी महाराज

## त्र्यंबकेश्वर आश्रमात भक्तांची मांदियाळी; नागपंचमी जपानुष्ठान सोहळ्याची सांगता!





**नाशिक ।** "संत संगती वेगळी जाण, तात्काळ पावावया माझे स्थान, आणिक नाही साधन, सत्य जाण उद्धवा" या श्री सार्थ एकनाथी भागवत ग्रंथातील ओवीचा अर्थ समजून घ्या. आणि संत संगतीचे महत्व ओळखा. संत संगतीनेच तत्काळ ईश्वराची प्राप्ती होऊ शकते. याशिवाय अन्य दुसरे साधन नाही, असे भागवत ग्रंथात सांगितले आहे. बाबाजींनी सुरू केलेल्या परंपरा समजासाठी सर्वांगाने लाभदायक आहेत. सदगुरु आज्ञेचे पालन करा. रोज नित्य नियम विधी वाचा. वार्षिक जपानुष्ठान करा, श्रमदान, गोसेवा, कृषी-ऋषी सेवा करा, भारतीय संस्कृतीचे आचरण करा, असे प्रतिपादन जगदगुरु जनार्दन स्वामी मौनगिरीजी महाराज धर्मपीठाचे पीठाधीश्वर जगदगुरु स्वामी शांतिगिरीजी महाराज यांनी केले.

अध्यात्मिक उन्नती ते राष्ट्रकल्याण अशी वाटचाल करणाऱ्या जय बाबाजी भक्त परिवाराच्या वतीने श्रीक्षेत्र त्र्यंबकेश्वर येथे श्रावण महिना व नागपंचमी निमित्त गेल्या आठवडाभरापासून जपानुष्ठान सोहळा सुरू होता. या सोहळ्यात रोज पहाटे ब्रह्म मुहूर्तावर नित्यनियम विधी, ध्यान, प्राणायाम, भागवत वाचन, प्रवचन, सत्संग, हस्तलिखित नामजप साधना, अखंड नंदादीप, श्रमदान यांसह भरगच्च कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. या सोहळ्याची सांगता हजारो भाविकांच्या उपस्थितीत भक्तिपूर्ण वातावरणात झाली. सांगता सोहळ्याच्या प्रारंभी त्र्यंबकेश्वर परिसरातून लक्षवेधी पालखी मिरवणूक संपन्न झाली. कुशावर्त येथे स्नान व सदगुरु पाद्यपूजन सोहळा संपन्न झाला. यानंतर सत्संग सोहळ्या प्रसंगी उपस्थितांना धर्मउपदेश करतांना स्वामी शांतिगिरीजी महाराज बोलत होते. ते पुढे म्हणाले की नित्य नियम करणाऱ्या साधकांच्या जवळ देवाचा निवास आहे. त्यामुळे जगदगुरु बाबाजींनी वरदान स्वरूप दिलेल्या विधीचे भाविकांनी नित्य नियमाने भक्तिपूर्ण वाचन



करावे. प्रत्येकाने आपल्या अधिकारा नुसार कर्माचे आचरण करावे. मर्यादा सोडू नका. आपल्या मर्यादित राहायला शिका. मर्यादा सोडली तर दुखः आहे. कर्म तैसे फळ. जीवनातील अंधकार दूर करायचा असेल तर सदगुरूंना शरण येऊन त्यांच्या आज्ञेचे पालन करा. सदगुरू नामात मोठे सामर्थ्य आहे .ज्यांच्या मुखात सदगुरूंचे नामस्मरण असेल त्यांना प्रत्यक्ष काळही काही करू शकणार नाही. मात्र आवडीने भावाने नाम घ्यावे. सतत कामात आणि नामस्मरणात रहा, व्यसनापासून दूर रहा, बाबाजींनी सुरू केलेल्या सर्व परंपरा सर्वांगाने लाभदायक आहेत. वार्षिक जपानुष्ठान करा, श्रमदान करा, रोज नित्यनियम विधी वाचा, कुठेली कर्म करतांना चांगले करा, सदगुरू कार्यात व्यस्त रहा, असेही शांतिगिरीजी महाराज यांनी सांगितले. भक्त परिवाराच्या वतीने आगामी काळात आयोजित विविध धर्म सोहळ्याची माहिती यावेळी प्रवक्ते विवेकानंद महाराज यांनी दिली. ओझर आश्रमात येत्या ९ ऑगस्ट रोजी ३६०० भाऊ आणि ३६०० बहिणींच्या उपस्थितीत लक्षवेधी रक्षा बंधन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या सोहळ्याचा लाभ घ्या असेही यावेळी त्यांनी सांगितले. याप्रसंगी जगदगुरू स्वामी शांतीगिरीजी महाराजांच्या दर्शनासाठी भविकांनी मोठी गर्दी केली. महाआरती, महाप्रसाद वाटप करून या लक्षवेधी धर्म सोहळ्याची सांगता संपन्न झाली.

---

## महत्त्वाचे

### रोहित ज्वेलर्सचे संचालक ज्ञानेश्वर माळवे यांना अटक

**आडगाव ।** पंचवटीतील पेठरोड आर.टी.ओ परिसरातील अश्वमेघ नगर येथील 'रोहित ज्वेलर्स' या दुकानाचे संचालक ज्ञानेश्वर सुधाकर माळवे यांना पंचवटी पोलीस ठाण्याच्या पथकाने फसवणूक प्रकरणी अटक केली. नागरिकांची लाखो रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी त्यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलिसांनी तांत्रिक माहितीच्या आधारे ज्ञानेश्वर माळवे यांचा ठावठिकाणा शोधून काढत त्यांना अटक केली. ज्ञानेश्वर माळवे यांनी अनेक ग्राहकांकडून दागिने गहाण ठेवून पैसे दिले होते. नागरिकांनी मुद्दल आणि व्याजासह पैसे परत करूनही माळवे यांनी त्यांना दागिने परत केले नाहीत. "दोन-तीन दिवसांनी या", "दागिने बँकेच्या सेफमध्ये आहेत" असे सांगून त्यांनी वेळ मारून नेली. त्यानंतर दुकान बंद करून कुठेही न सांगता पळ काढला होता. ५ ऑगस्ट रोजी रात्री ११ वाजता नागरिकांनी एकत्र येत पंचवटी पोलीस ठाण्यात ज्ञानेश्वर माळवे यांच्या विरोधात फसवणुकीचा गुन्हा दाखल केला. त्यानंतर पोलिसांनी ज्ञानेश्वर माळवे यास अटक केली. या प्रकरणाचा तपास पोलीस उपनिरीक्षक सचिन चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे. अश्वमेघ नगर, कर्णनगर, विठाई नगर येथील अनेक नागरिक माळवे यांच्याकडे दागिने गहाण ठेवून व्यवहार करत होते. यापैकी काही नागरिकांनी पूर्वीही पोलिसांत निवेदन दिले होते. प्रहार जनशक्ती पक्षाचे जिल्हाध्यक्ष अनिल भडांगे यांनी नागरिकांना तात्काळ मदत केली. त्यांनी सांगितले की, "गहाण व्यवहार करताना पावती घेणे अत्यंत गरजेचे असून, नागरिकांनी अशा प्रकारच्या व्यवहारात सतर्क राहावे." तसेच या प्रकरणात ज्यांची फसवणूक झाली आहे, त्यांनी तत्काळ पंचवटी पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा.

### पेठ ग्रामीण रुग्णालयात दिव्यांग विद्यार्थांची आरोग्य तपासणी

**पेठ ।** राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रमा अंतर्गत पेठ ग्रामीण रुग्णालयात येथील समग्र शिक्षा समावेशित शिक्षण उपक्रमातील दिव्यांग विद्यार्थांची आरोग्य तपासणी शिबिर घेण्यात आले. सदरील शिबिरात ३६ विद्यार्थांची आरोग्य तपासणी करण्यात आली यातील ७ विद्यार्थांना पुढील तपासण्या करिता नाशिक जिल्हा रूग्णालयात पाठविण्यात आले. या शिबिर ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ.समाधान पाटील यांचे मार्गदर्शनात करण्यात आले. यावेळी डॉ.काकड,डॉ.योगिता पगार डॉ. सविता गायकवाड डॉ.भुसारे,डॉ.भोये आदीसह ललित वाघेरे, नवनाथ चौधरी कर्मचारी वर्ग उपस्थित होते शिबिरास शिक्षण विभागातील शिक्षकांचे सहकार्य लाभले.

### सीएमसीएस महाविद्यालयात 'कंपनी सेक्रेटरी' कार्यशाळा

**नाशिक ।** महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी मविप्र समाजाचे कॉमर्स, मॅनेजमेंट आणि




कॉम्प्युटर सायन्स (सीएमसीएस) महाविद्यालयात 'करिअर अवेअरनेस प्रोग्राम' अंतर्गत 'कंपनी सेक्रेटरी' विषयावर कार्यशाळा घेण्यात आली. या कार्यशाळेत बी.कॉम, एम.कॉम, बीबीए आणि बीसीए शाखांमधील 150 पेक्षा अधिक विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवला. याप्रसंगी इन्स्टिट्यूट ऑफ कंपनी सेक्रेटरीज ऑफ इंडिया रिजनल कौन्सिल नाशिक चॅप्टरचे माजी अध्यक्षा रममा दीक्षित, प्रभारी राजश्री लांबे यांनी विद्यार्थ्यांना भारत सरकारच्या कॉर्पोरेट अफेयर्स मंत्रालयाअंतर्गत (ICSI) असलेल्या व्यावसायिक संधी आणि जबाबदारी, कंपनी सेक्रेटरी कोर्सची रचना, प्रवेशप्रक्रिया, परीक्षा पद्धती, अभ्यासक्रम, कॉर्पोरेट गव्हर्नन्सचे कायदेशीर अनुपालन आणि धोरणात्मक व्यवस्थापन, भविष्यात आपण कोणकोणत्या क्षेत्रात करियर करू शकतो आणि कोणत्या संधी उपलब्ध आहेत, यासंबंधीचे सखोल मार्गदर्शन कले. विद्यार्थ्यांनी विचारलेले प्रश्न आणि शंकाचेही निरसन कार्यशाळेत करण्यात आले. कार्यशाळेसाठी संस्थेचे शिक्षणाधिकारी डॉ.अजित मोरे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मधुकर शेलार यांचे मार्गदर्शन लाभले.

### अ. भा. मराठी साहित्य परिषदेच्या उत्तर महाराष्ट्र युवा प्रदेशाध्यक्षपदी योगेश रोकडे

**नाशिक ।** साहित्य क्षेत्रातील अग्रणी



असलेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य परिषदेच्या उत्तर महाराष्ट्र युवा प्रदेशाध्यक्ष पदी सुप्रसिद्ध साहित्यिक तसेच दैनिक लोकमंथन नाशिक आवृत्तीचे निवासी संपादक योगेश रोकडे यांची निवड करण्यात आली आहे. त्यांच्या निवडीचे पत्र अखिल भारतीय मराठी साहित्य परिषदेचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. शरद गोरे यांनी देऊन हि अधिकृत घोषणा केली आहे. रोकडे हे गेली १३ वर्षे साहित्य क्षेत्रात कार्यरत असून साहित्यातील आर्टिकल च्या माध्यमातून विविध विषयात लिखाण करत आहेत. या पूर्वी विविध पुरस्कारांने त्यांचा सन्मान झाला आहे. साहित्य संमेलनात मान्यवर म्हणून त्यांनी सहभाग नोंदवला आहे. साहित्य केंद्रस्थानी आणण्यासाठी मी प्रयत्न करणार असल्याची भावना यावेळी योगेश रोकडे यांनी व्यक्त केली.

---

## शासनाने व्याजमाफी देण्याची थकबाकीदार शेतकऱ्यांची मागणी

**नाशिक ।** नाशिक जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या सक्तीच्या कर्ज वसुली थांबवावी. तसेच नवीन ओटीएस योजनेची अंमलबजावणी करू नये, अशी मागणी शेतकरी संघटनांनी जिल्हा उपनिबंधक यांच्याकडे केली.



व्याजदर थकबाकीदार शेतकऱ्यांना हे मान्य नाही म्हणून संपूर्ण थकबाकीदार शेतकऱ्यांचे व्याज माफ करून मुद्दलाचे 10 हप्ते करून द्यावे. येणाऱ्या कर्जमाफीमध्ये जर या शेतकऱ्यांनी म्हणजे ज्या शेतकऱ्यांनी कर्जाचा भरणा केला असेल त्या शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ देण्यात यावा, अशी मागणी ७९७ दिवसापासून जिल्हा रुग्णालयासमोर सुरू असलेल्या शेतकरी आंदोलन शेतकरी समन्वय समितीचे अध्यक्ष भगवान बोराडे, ९३८ आदिवासी सहकारी संस्थेचे राज्याचे अध्यक्ष कैलास बोरसे, बाळासाहेब बोरस्ते, रमेश बोरस्ते, दिलीप पाटील यांच्यासह आंदोलक शेतकऱ्यांनी आज नाशिक जिल्हा बँकेचे प्रशासक संतोष बिडवे, विभागीय सहनिबंधक निकम, तसेच जिल्हा उपनिबंधक फयाज मुलानी, जिल्हाधिकारी जलद शर्मा यांना लेखी निवेदनाद्वारे निवेदन देण्यात आले. याबाबत सविस्तर वृत्त असे की, एक जून 2023 पासून नाशिक जिल्हाधिकारी कार्यालयासमोर नाशिक जिल्ह्यातील ५६ हजार थकबाकीदार शेतकऱ्यांच्यावतीने धरणे आंदोलन उपोषण सुरू आहे. या आंदोलन शेतकरी संघटनांनी वारंवार तत्कालीन सरकारमधील मंत्र्यांन निवेदन दिले होते. विद्यमान सरकारलाही निवेदन दिले आहे. संबंधितांना निवेदन देऊन अनेक वेळा बैठक होऊन याबाबत काही मार्ग निघाला नाही. म्हणून मधला मार्ग कर्जमाफी होईल तेव्हा होईल मात्र थकबाकीदार शेतकऱ्यांचे संपूर्ण व्याज माफ करावे व मुद्दलाचे दहा हप्ते करून द्यावेत, अशा आशयाची मागणी राज्य बँकेचे प्रशासक विद्याधर अनास्कर यांना नाशिक येथे जिल्हा मध्यवर्ती बँकेमध्ये झालेल्या बैठकीत करण्यात आली होती.

## बीवायके महाविद्यालयात वाणिज्य दिनानिमित्त दोन दिवसीय पोस्टर प्रदर्शन

**नाशिक ।** येथील बीवायके कनिष्ठ महाविद्यालयात वाणिज्य दिना निमित्त दोन दिवसीय पोस्टर प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. दोन दिवसीय प्रदर्शन महाविद्यालयाच्या ढेकणे हॉलमध्ये आयोजित करण्यात आले होते. या प्रदर्शनामध्ये कनिष्ठ महाविद्यालयाच्या तीस विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. विद्यार्थांनी उद्योजकता संबधित ई कॉमर्स, ई बँकिग यावर पोस्टर तयार केले होते.

महाविद्यालयाच्या उपप्राचार्या डॉ. सुवर्णा कदम यांनी फीत कापून प्रदर्शनाचे उद्घाटन केले. त्यांनी परीक्षक म्हणून देखिल काम पाहिले. प्रदर्शनाच्या दुसऱ्या दिवशी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. लीना भट व उपप्राचार्या डॉ. काणे यांनी प्रदर्शनास सदिच्छा भेट देऊन विद्यार्थ्यांचे कौतुक केले व त्यांना मार्गदर्शन केले. वरिष्ठ महाविद्यालयातील प्राध्यापकांनीही प्रदर्शनास सदिच्छा भेट देऊन आपले कौतुकास्पद अभिप्राय नोंदविले.




या दोन दिवसीय प्रदर्शनात महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. प्रविण मुळे तसेच पर्यवेक्षक प्रा. प्रकाश निकम, प्रा. डॉ. स्नेहा रत्नपारखी, प्रा. शितल जाधव तसेच वाणिज्य शाखेच्या सर्व शिक्षकांनी अतिशय मेहनत घेतली व कार्यक्रम यशस्वी केला, तसेच विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. प्रदर्शनात सहभाग घेतलेल्या विजेत्या विद्यार्थ्यांना पारितोषिक व प्रशस्ती पत्रके देऊन त्यांचा सत्कार करण्यात येईल, अशी माहिती उपप्राचार्य व पर्यवेक्षकांनी दिली.

## विद्यार्थ्यांचा रंगला शपथविधी

### मविप्र आदर्श इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये विद्यार्थी मंत्रिमंडळाची स्थापना



**वणी ।** मविप्र संचलीत आदर्श इंग्लिश मिडीयम स्कूलमध्ये सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षासाठी विद्यार्थी मंत्रिमंडळाची निवड करण्यात आली. यावेळी पार पडलेल्या बॅच सेरेमनी मध्ये विद्यार्थ्यांना जबाबदाऱ्या सोपवण्यात आल्या.

मंत्रिमंडळ प्रमुख म्हणून हेड बॉय – प्रताप गरजे, हेड गर्ल – स्वरा घुले, व्हाईस हेड बॉय – रुद्र चितोडे, व्हाईस हेड गर्ल राधिका वैद्य, हर्षल महाले, तनय माळी, सर्वेश कराटे, आर्यन काळोगे, रोहित ठाकरे, कल्याणी पागे, प्राप्ती पुरकर, धनश्री पाटील ,गायत्री मोरे ,शुभांगी क्षीरसागर , यशोदा खरोटे यांना सन्मानित करण्यात आले. बॅच सेरेमनी वेळी गीत मंचाने इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी एक प्रेरणादायी गीत सादर केले. निवड झालेल्या विद्यार्थी मंत्र्यांनी आपल्या भाषणातून आपली शाळेविषयी जबाबदारी व कर्तव्य यांविषयीची आस्था, आपल्या जबाबदाऱ्या प्रामाणिकपणे पार पाडू याविषयीचे आश्वासन दिले. याप्रसंगी वणीच्या सहायक पोलीस निरीक्षक गायत्री जाधव यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले, म.वि.प्र. सभासद सुनील थोरात, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष अमोल देशमुख, सदस्य चंद्रवदन देशमुख, पालक शिक्षक सदस्य दुर्गेश चितोडे, माधव गायकवाड, पल्लवी जैन, अनिता बागुल, वनिता बहिरम, के आर टी कॉलेज प्राचार्य डॉ. एस. एन. शिंदे व शाळेच्या मुख्याध्यापिका एस. डी. काळे आदी. उपस्थित होते. प्रथमेश चौधरी व दुर्वा भवर यांनी सूत्रसंचालन केले तर तेजश्री निर्मळ हिने आभार मानले. कार्यक्रमाची सांगता वंदे मातरमने करण्यात आली.

---

## शेखरआप्पा निकुंभ म्हणजे मैत्रीचे निखळ प्रतीक : गणेश कांबळे

**नाशिक ।** मैत्री हे एक असं नातं आहे जे प्रत्येकाच्या जीवनात महत्त्वाचं स्थान ठेवतं. जीवनाच्या प्रत्येक टप्प्यावर मैत्रीचं नातं आपल्याला आनंद, सहकार्य आणि आधार देतं. या नात्याची खासियत म्हणजे ते कोणत्याही स्वार्थाशिवाय आणि अपेक्षाशिवाय असतं. भाजपचे नेते शेखरआप्पा निकुंभ यांनी नाशिकमध्ये मैत्रीचा मोठा समूह निर्माण केला आहे. त्यामुळे राजकीय क्षेत्रातही त्यांनी स्वत:चा अविट ठसा उमटविला आहे, असे मत भाजपच्या अनुसूचित जाती मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष गणेश कांबळे यांनी व्यक्त केले.

भाजपचे नेते शेखरआप्पा निकुंभ यांच्या वाढदिवसानिमित्त झालेल्या समारंभात ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जॉगर्स क्लबचे अध्यक्ष दीपक भोसले होते. प्रमुख पाहुणे म्हणून नायब तहसीलदार सुधीर सातपुते, नवनाथ पेट्रोलियमचे संचालक अण्णासाहेब बोडके, बांधकाम व्यावसायिक जॉनी शिंदे, नाशिक क्रिकेट क्लबचे पदाधिकारी समीर रकटे, माजी नगरसेवक सतीशबापू सोनवणे, लक्ष्मणअण्णा धोत्रे आदी उपस्थित होते. श्री कांबळे म्हणाले की, शेखरआप्पा आपल्या मनाला, विचारांना आणि भावनांना समजून घेणारे व्यक्तिमत्व आहे. जीवनात आपल्याला अशा व्यक्तींची गरज असते, ज्यांच्याशी आपण आपल्या भावना आणि विचार शेअर करू शकू. अशी माणसं देवासारखी असतात.

यावेळी राजू पटेल, रमेशकाका गायकवाड, जयवंतराव देशमुख, पी. डी. जाधव, प्रविणशेठ निकुंभ, सुभाष कडलग आदी उपस्थित होते. भाजपचे नेते प्रशांत कोतकर यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. फिटनेस ट्रेनर जगदीश पोतदार यांनी



आभार मानले.

**बाबा शहा यांचे खुमासदार भाषण**

यावेळी उद्योगपती बाबा शहा म्हणाले की, मैत्रीचं साजरीकरण, एकमेकांप्रति कृतज्ञता व्यक्त करणं आणि मैत्रीचं नातं अधिक मजबूत करणं ह्या उद्देशानेच हा वाढदिवस साजरा होत आहे. कृतज्ञता व्यक्त करणं हे आपलं कर्तव्य आहे. त्यांची मदत, प्रेम, आणि सोबत यांचं महत्व पटवून देणं आवश्यक आहे. मैत्रीचे अनेक प्रकार असू शकतात. प्रत्येक प्रकारचं नातं वेगळं असतं आणि त्यात वेगवेगळ्या भावना आणि अनुभव असतात. मैत्रीची अनेक उत्तम उदाहरणे आपण वाचली आहेत, ऐकली आहेत. जसे श्रीकृष्ण आणि सुदामा तसेच मैत्रीचे वेगवेगळे प्रकार असतात जसे लंगोटी यार, हृदय मित्र, प्रेम मित्र, इंटरनेट मित्र, कॉमेडी मित्र, मैत्री ही फक्त मनुष्यांमध्ये असते असे नाही तर प्राण्यांमध्येदेखील असते. तसेच झाडाशी मैत्री, फुलांशी मैत्री, निसर्ग मैत्री असते, अशी कितीतरी उदाहरणे मैत्रीची देता येतील. मैत्रीत केवळ दिखावा असता कामा नये. कारण अलीकडच्या काळात मैत्री व्यक्त करण्याची अनेक साधने उपलब्ध झालेली आहे. जो मित्र कठीण प्रसंगात तुम्हाला आर्थिक मदत करतो, तोच तुमचा खरा मित्र असतो, असेही बाबा शहा यांनी शेवटी सांगितले.

# अस्मिता

## रुचकर कोफ्ता करी

रसगंधा

मैत्रिणींनो, मटारपासून छान छान पदार्थ बनवता येतात. आज लज्जतदार कोफ्ते बनवून बघा.



**साहित्य :** मटारचे दाणे एक कप, दोन उकडलेले बटाटे, चमचाभर बेसन, किसलेलं आलं एक चमचा, दोन हिरव्या मिरच्या, मीठ इत्यादी.

ग्रेवीसाठी : तीन टोमॅटो, दोन हिरव्या मिरच्या, आलं, दोन चमचे तेल किंवा तूप, अर्धा चमचा जीरं, हळद, धनेपूड, गरम मसाला, दोन चमचे साय, चमचाभर तिखट, मीठ आणि कोथिंबिर

**कृती :** मटार उकडून रवाळ वाटा. बटाटे कुस्करून घ्या. कोफ्त्यासाठीचं साहित्य एकत्र करून गोळे करा. ते सोनेरी रंगाचे होईपर्यंत तळा. ग्रेवीसाठी हिरवी मिरची, टोमॅटो, आलं एकत्र वाटून घ्या. कढईत तेल किंवा तूप घालून हळद आणि धनेपूड घालून परता. वाटलेला टोमॅटो तेल सुटेपर्यंत परता. मसाल्यात साय घालून दोन मिनिटं शिजवून घ्या. मीठ, तिखट, गरम मसाला घाला. शिजवल्यावर थोडं पाणी घाला. पाणी उकळल्यावर यात कोफ्ते घाला. दोन मिनिटं शिजवून वरून कोथिंबिर घाला. मटार कोफ्ता करी तयार आहे.

## असे जपा केसांचे आरोग्य

सौंदर्यसाधना



पावसाळ्यात फक्त त्वचाच कोरडी पडते असं नाही तर केसही खराब होतात. वारंवार पावसात भिजल्यामुळे केस निस्तेज दिसतात. या दिवसात कोंडा होण्याची शक्यता अनेकपटींनी वाढते. त्यामुळे पावसाळ्यात आठवड्यातून दोन वेळा तरी केस धुवायला हवेत. या काळात केसांचं सौंदर्य टिकवून ठेवण्यासाठी काय करता येईल याविषयी...

* खोबरेल किंवा बदामाचं तेल गरम करून केसांना नीट मसाज करा. आठवड्यातून एकदा तरी हा उपाय करा.
* या दिवसात केस ट्रिम करून घेणं गरजेचं आहे. वातावरणामुळे केस निस्तेज दिसू लागतात. त्यातच फाटे फुटल्यामुळे केस खूपच खराब दिसतात. त्यामुळे वरचेवर ट्रिम करून घेणं गरजेचं आहे. यामुळे केसांची वाढही चांगली होईल.
* शँपू लावल्यानंतर कंडिशनर वापरायला विसरू नका. कंडिशनरमुळे केस मुलायम होतील.
* या दिवसात रोज केस धुवू नका. दररोज शँपू वापरल्यामुळे केसांमधलं नैसर्गिक तेल नष्ट होतं. ते कोरडे दिसू लागतात. त्यामुळे आठवड्यातून दोन वेळा केस धुवा.
* पावसाळी हवेपासून केसांचा बचाव करा. यासाठी बाहेर जाताना केस स्कार्फने झाकून घ्या. केस फार घट्ट बांधू नका. सैलसर अंबाडा घाला किंवा केस क्लचरने बांधा.

## परतणार मूळ स्थानाकडे


मानिनी

भारतीय-अमेरिकन अर्थशास्त्रज्ञ असणाऱ्या गीता गोपीनाथ आंतरराष्ट्रीय नाणेनिधीमध्ये प्रथम उपव्यवस्थापकीय संचालक म्हणून कार्यरत होत्या. जगातील मुख्य अर्थशास्त्रज्ञांच्या यादीमध्ये त्यांचा समावेश होतो. मात्र अलिकडेच त्यांनी आयएमएफमधून राजीनामा दिला आहे. गीता गोपीनाथ यांनी स्वत: ही घोषणा केली आणि आपण पुन्हा एकदा हार्वर्ड विद्यापीठाच्या फॅकल्टीमध्ये सामील होणार असल्याचे स्पष्ट केले. सोशल मीडिया प्लॅटफॉर्म 'एक्स' वर पोस्ट करत त्यांनी लिहिले की, आंतरराष्ट्रीय नाणेनिधीमध्ये सात वर्षे घालवल्यानंतर मी माझ्या शैक्षणिक मुळांकडे परतण्याचा निर्णय घेतला आहे.

गीता गोपीनाथ एक सप्टेंबरपासून हार्वर्डच्या अर्थशास्त्र विभागात 'प्रोफेसर ऑफ इकॉनॉमिक्स' म्हणून सामील होतील. गीता म्हणतात की, आता मी शैक्षणिक क्षेत्रात परत येण्याची आणि आंतरराष्ट्रीय वित्त आणि मॅक्रोइकॉनॉमिक्समध्ये संशोधन पुढे नेण्यास तसेच अर्थशास्त्रज्ञांच्या नवीन पिढीला प्रशिक्षण देण्यास उत्सुक आहे. गीता गोपीनाथ यांनी जानेवारी २०१९ मध्ये आयएमएफमध्ये मुख्य अर्थतज्ज्ञ म्हणून पदभार स्वीकारला आणि जानेवारी २०२२ मध्ये त्यांना प्रथम उपव्यवस्थापकीय संचालक म्हणून नियुक्त केले. आयएमएफमध्ये त्यांनी जागतिक संकट ठरलेली कोविड महामारी, युद्ध, महागाई आणि व्यापारातील बदल यासारख्या अनेक कठीण काळामध्ये संघटनेच्या धोरणांचे दृढ नेतृत्व केले.

आयएमएफमध्ये सामील होण्यापूर्वी त्यांनी २००५ ते २०२२ पर्यंत हार्वर्ड विद्यापीठातील अर्थशास्त्र विभागात प्राध्यापक म्हणून काम केले होते. तसेच २००१ ते २००५ दरम्यान त्या शिकागो विद्यापीठाच्या बूथ स्कूल ऑफ बिझनेसमध्ये सहाय्यक प्राध्यापक म्हणूनही कार्यरत होत्या. काम केले.

आयएमएफच्या व्यवस्थापकीय संचालक क्रिस्टलिना जॉर्जिएवा यांनी गीता गोपीनाथ यांचे वर्णन एक उत्कृष्ट सहकारी, बौद्धिक नेता आणि समर्पित व्यवस्थापक असे केले आहे. गीताने केवळ विश्लेषणात्मक कठोरता दाखवली नाही तर आयएमएफमध्ये अत्यंत आव्हानात्मक काळात व्यावहारिक धोरणात्मक सल्लादेखील दिला, असे तज्ज्ञांचे म्हणणे आहे. त्यांच्या अचूक सल्ल्यामुळे कोविड, युद्ध, महागाई समस्या आणि जागतिक



व्यापार व्यवस्थेतील मोठे बदल असतानाही अर्थघडी विस्कटली नसल्याचे मत या क्षेत्रातील तज्ज्ञ व्यक्त करतात.

गीता गोपीनाथ यांनी दिल्ली स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स आणि प्रिन्सटन विद्यापीठातून शिक्षण घेतले आहे. सहाय्यक प्राध्यापक म्हणून त्यांनी आपल्या कारकिर्दीची सुरुवात केली होती. आता त्या पुन्हा एकदा हार्वर्ड विद्यापीठात प्राध्यापक म्हणून रुजू होत आहेत. त्यांच्या पुढील कारकिर्दीला शुभेच्छा

## घाबरणे योग्य नाही

काय करू?

मी २७ वर्षांची महिला असून नुकतंच लग्न झालं आहे. माझं एका मुलावर प्रेम होतं. पण गेल्या वर्षी आमच्यात खूप वाद झाला आणि आम्ही ब्रेक अप केलं. यानंतर मी आईवडिलांनी पसंत केलेल्या मुलाशी लग्न केलं. मात्र आता माजी प्रियकर मला ब्लॅकमेल करू लागला आहे. पतीला आमच्या नात्याबद्दल सगळं काही सांगण्याची धमकी तो देतो.



आम्ही एकेमकांच्या खूप जवळ आलो होतो. माझ्या आधीच्या नात्याची पतीला कल्पना आहे. पण आमच्या जवळीकीची त्याला अजिबात कल्पना नाही. याच कारणामुळे मी खूप घाबरले आहे. मी काय करू?

– पतीला तुझ्या आधीच्या नात्याबद्दल माहीत आहे. त्यामुळे तुला घाबरण्याचं काहीच कारण नाही. पती-पत्नीच्या नात्यात विश्वास महत्त्वाचा असतो. त्यामुळे पतीला विश्वासात घे. हा मुलगा तुला ब्लॅकमेल करत असल्याचं त्यांना सांग. तुझ्या माजी प्रियकराशी संपर्क साधून पतीला सगळ्या गोष्टींची कल्पना असल्याचं स्पष्टपणे सांग. यानंतर कोणत्याही परिस्थितीला सामोरं जाण्याची तयारी ठेव. माजी प्रियकराशी अजिबात संपर्क करू नकोस. गरज वाटल्यास समुपदेशकांचीही मदत घे. अजिबात घाबरू नकोस. सद्य परिस्थितीला तोंड दे.

## नेकपीस निवडताना...

स्टाईल स्टेटमेंट

ब्लाउज असो वा इव्हिनिंग गाऊन, किंवा मग सलवार कमीझ, तुमचा लूक अधिक खुलवण्यासाठी मॅचिंग आणि योग्य ॲक्सेसरीज गरजेच्या असतात. प्रत्येक पेहरावाची नेकलाईन वेगळ्या प्रकारची असते. त्यामुळे नेकलाईनला साजेशा ॲक्सेसरीज आणि त्यातही नेकलेस असणं गरजेचं असतं. कोणत्या नेकलाईनवर कोणता नेकलेस शोभून दिसेल? जाणून घेऊ.

* डीप राउंड, स्क्वेअर किंवा बोट नेकच्या कपड्यांवर चोकर शोभून दिसतो. यामुळे कॉलर बोन अधिक उठावदार दिसतात आणि तुम्ही उंच दिसू लागता. चोकर घालणार असाल तर छोट्या आकाराचे लांबते कानातले घाला. छोटे झुमकेही चालून जातील.
* राउंड नेक असणाऱ्या कपड्यांमध्ये तुमचे कॉलर बोन लपतात. त्यामुळे हाय राउंड नेक ब्लाउजवर नेकलेस घालण्याची गरज नाही. ब्रोकेडवाल्या ब्लाउजवर नेकलेस घालू नका. त्याऐवजी झुमके किंवा छानसं हेवी कानातलं कॅरी करा.
* डीप व्ही नेकवर छोट्या आकाराचा पण गळाभर नेकलेस छान दिसेल. पेंडंटवाले नेकलेही शोभून दिसतील.
* गेल्या काही वर्षांपासून कॉलर नेक ट्रेंडमध्ये आहे. कॉलर नेक कुर्ते विविध प्रसंगी घालता येतील.



कॉलर नेकवाले ब्लाउजही छान दिसतात. पण अशा पद्धतीच्या गळ्यावर काय घालायचं असा प्रश्न पडतो. तुमचा ब्लाउज ब्रोकेड मटेरियलचा असेल तर त्यावर नेकलेसची गरज नसते. पण प्लेन कॉलर नेक टॉप किंवा ब्लाउजवर लांब नेकलेस घालता येईल.


## मातांनो, काळजी घ्या

संगोपन

अलिकडेच जयपूर, बिकानेर आणि राजस्थानमध्ये २६ ते ४२ वर्षे वयोगटातील १०५ मातांच्या दुधाचे नमुने चाचणीसाठी घेण्यात आले होते. ही चाचणी मान्यताप्राप्त प्रयोगशाळेत करण्यात आली. तेव्हा सर्व नमुन्यांमध्ये आईच्या दुधात बाळांच्या आरोग्यासाठी धोकादायक ठरणारे अनेक हानिकारक पदार्थ आढळले.

खरे पाहता आईचे दूध हे बाळासाठी पोषणाचा सर्वोत्तम स्रोत आहे. त्यात पाणी, प्रथिने, कार्बोहायड्रेट्स, चरबी आणि आवश्यक एंजाइम असल्यामुळे बाळाला निरोगी ठेवण्यास मदत करतात. परंतु खाण्याच्या चुकीच्या सवयी आणि पर्यावरणीय प्रदूषणामुळे आईच्या दुधात विषारी घटक आढळत असून ते बाळांना आजारी बनवू शकतात, असे तज्ज्ञांकडून सांगण्यात येत आहेत.

तपासात आईच्या दुधात डिटर्जंट, युरिया, मेलामाइन, फॉर्मेलिन, सल्फेट आणि कीटकनाशके सारखे पदार्थ आढळले आहेत. बनावट प्रथिनांचे प्रमाण वाढवण्यासाठी दुधात डिटर्जंट आणि युरियासारखे घटक मिसळले जातात, जे बाळासाठी हानिकारक ठरतात. मेलामाइन हे दूध पावडर आणि दुग्धजन्य पदार्थांमध्ये आढळणारे एक रसायन आहे. त्यामुळे किडनी आणि पोटाचे आजार होऊ शकतात. मासे आणि भाज्या दीर्घकाळ ताजे ठेवण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या फॉर्मेलिनचा आईच्या शरीरात प्रवेश होतो आणि दूध दूषित होते.



एकूणच खाण्याच्या चुकीच्या सवयी, प्रदूषित पाणी, कीटकनाशकांचा अतिवापर आणि प्रदूषित वातावरणामुळे अनेक विषारी पदार्थ तान्ह्या बाळांच्या शरीरात पोहोचत आहेत. अशा हानिकारक घटकांमुळे पोटाचे संसर्ग, अतिसार, उलट्या, किडनीचे आजार आणि बाळांमध्ये रोगप्रतिकारक शक्तीचा अभाव होऊ शकतो. हे लक्षात घेता मातांनी काळजी घेणे गरजेचे आहे. बाहेरून तळलेले किंवा अस्वास्थ्यकर अन्न खाणे पूर्णपणे बंद करावे. घर स्वच्छ ठेवावे, स्वच्छ पाणी वापरावे.

## स्वयंपाक, स्वत:ला ओळखण्याचा मार्ग

डाएट अँड न्यूट्रिशन

मैत्रिणींनो; स्वयंपाक करणं, तऱ्हेतऱ्हेचे पदार्थ बनवणं ही एक कला आहे. काहींना स्वयंपाकाचा कंटाळा येतो किंवा रोजचा स्वयंपाक हे खूप अवघड काम वाटतं. पण प्रत्यक्षात स्वयंपाक करणं ही एक थेरपी आहे. यामुळे तुमचा ताण कमी होऊ शकतो. याला कलिनरी आर्ट थेरपी असं म्हणतात. चला तर मग, या थेरेपीची माहिती घेऊ.

* राग आल्यावर किंवा खूप तणावात असताना आवडीचं खाण्याची इच्छा होते. अशा वेळी महिला एखादा पदार्थ बनवून खातात. यालाच कलिनरी आर्ट थेरपी असं म्हटलं जातं.
* स्वयंपाक केल्यामुळे तणाव कमी होतो. स्वयंपाक करताना चित्त एकाग्र होतं. महिलांचं लक्ष एकाच ठिकाणी केंद्रित झालेलं असतं. त्यामुळे मेंदूलाही चालना मिळते. मन एकाग्र व्हायला मदत होते.



* स्वयंपाक करताना विविध प्रकारचे मसाले वापरले जातात. मसाल्यांचा गंध तणाव कमी करण्यात महत्त्वाची भूमिका बजावतो. आपल्या आवडत्या पदार्थांचा गंध आल्यावर रागही कमी होतो.
* स्वयंपाक करता करता महिलांना स्वत:मधल्या कलागुणांची जाणीव होते. इतकंच नाही तर या दरम्यान महिला वेगवेगळे प्रयोग करतात. याच कारणामुळे नैराश्य तसंच इतर मानसिक आजारांची तीव्रता कमी होऊ शकते.

त्यामुळे आवड असेल तर बिनधास्त स्वयंपाक करा. स्वत:ही खा आणि कुटुंबियांनाही खाऊ घाला.

स्कीन केअर

### खुलवा चेहऱ्याचं सौंदर्य



चेहरा उजळवण्यासाठी घरीच साधा सोपा उपाय करता येईल. यासाठी चमचाभर तांदळाचं पीठ घ्या. प्रत्येकी एक चमचा दही आणि टोमॅटोचा रस घ्या. सर्व घटक एकत्र करा. हे मिश्रण चेहऱ्यावर लावा. पाच मिनिटं मसाज करा. हा पॅक १५ ते २० मिनिटं चेहऱ्यावर लावा. कोमट पाण्याने चेहरा धुवा. हा उपाय आठवड्यातून दोन वेळा केल्यामुळे चेहरा उजळेल.

स्मार्ट टिप्स


### दगडाने कमी करा लव



अंगावरची लव काढून टाकण्यासाठी वेगवेगळे उपाय केले जातात. वॅक्सिंगचा पर्याय निवडला जातो. काही महिला हेअर रिमूव्हिंग क्रीमचा वापर करतात. मात्र एका दगडाचा वापर करून नैसर्गिक पद्धतीने ही लव काढून टाकता येते. या दगडाला प्युमिस स्टोन असं म्हटलं जातं. प्युमिस स्टोनचा वापर करण्यासाठी हात किंवा पाय काही वेळ गरम पाण्यात बुडवून ठेवा. आता एका कंटेनरमध्ये गरम पाणी घ्या. त्यात थोडं खोबरेल तेल घाला. आता हा दगड या पाण्यात बुडवून ठेवा. यामुळे दगडाचा कठीणपणा कमी होईल. आता लव असणाऱ्या भागावर हा दगड हलक्या हातांनी फिरवा. लव गेल्याची खात्री करून घ्या.

नवा ट्रेंड

### शेडेड मेक अप करायचाय?



मेक अपचे वेगवेगळे ट्रेंड नेहमीच लोकप्रिय होत असतात. सध्या शेडेड मेक अपचा ट्रेंड लोकप्रिय होत आहे. यामुळे मेक अप केल्यानंतर चेहऱ्यावरचे रंग बदललेले दिसतात. सोशल मीडियावर फोटो पोस्ट करण्यासाठी अशा पद्धतीचा मेक अप केला जात आहे. त्यातच रात्रीच्या पार्टीसाठी असा मेक अप करण्याला प्राधान्य दिलं जात आहे. त्यामुळे तुम्हीही शेडेड मेक अपचा हा ट्रेंड फॉलो करू शकता.



# शेअर बाजारात थोडीशी तेजी

## सेंसेक्स आणि निफ्टीमध्ये वाढ

मुंबई, दि. ७ प्रतिनिधी

गुरुवारी शेअर मार्केटमध्ये शेवटच्या क्षणी खरेदी दिसून आली, ज्यामुळे शेअर मार्केटने दोन दिवसांपासून सुरू असलेली घसरण थांबवली. सेंसेक्स आणि निफ्टी ५० मध्ये थोडीशी वाढ नोंदवण्यात आली.

गुरुवारी सकाळी सेंसेक्सने ८०,२६२ या पातळीवर सुरुवात केली आणि दिवसअखेरीस ०.०९८ टक्क्यांच्या तेजीने ८०,६२३ या पातळीवर बंद झाला. त्याचप्रमाणे, निफ्टी ५० ने सकाळी २४,४६४ या पातळीवर ओपनिंग दिली आणि दिवसअखेर ०.०८९ टक्क्यांच्या तेजीने २४,५९६ या पातळीवर क्लोजिंग दिली.

एका बाजूला बीएसई मिडकॅप निर्देशांकात ०.३० टक्क्यांची तेजी दिसून आली, तर दुसऱ्या बाजूला बीएसई स्मॉलकॅप निर्देशांकात ०.१७ टक्क्यांची घसरण झाली.



निफ्टी ५० मधील टॉप गेनर्सबद्दल बोलायचे झाले, तर सर्वात वर हीरो मोटोकॉर्पचा समावेश होता, ज्यात ४.१६ टक्क्यांची तेजी नोंदली गेली. त्यानंतर टेक महिंद्रामध्ये १.५८ टक्क्यांची तेजी, जेएसडब्ल्यू स्टीलमध्ये १.१६ टक्क्यांची तेजी, विप्रोमध्ये ०.९९ टक्क्यांची तेजी आणि इटरनलमध्ये ०.९८ टक्क्यांची तेजी झाली.

**सेन्सेक्स 80,623**

**निफ्टी 24,596**

निफ्टी ५० मधील टॉप लूजर्सकडे लक्ष दिल्यास सर्वाधिक तोटा अदानी एंटरप्रायझेसला झाला, ज्यात २.२ टक्क्यांची घसरण झाली. त्यानंतर अदानी पोर्ट्समध्ये १.५९ टक्क्यांची घसरण, ट्रेंटमध्ये ०.९९ टक्क्यांची घसरण, टाटा मोटर्समध्ये ०.९८ टक्क्यांची घसरण आणि ग्रासिम इंडस्ट्रीजमध्ये ०.८ टक्क्यांची घसरण नोंदवली गेली.

सर्वाधिक विक्री निफ्टी इंडिया डिफेन्समध्ये दिसून आली, ज्यात ०.४६ टक्क्यांची घसरण झाली. त्यानंतर निफ्टी इन्फ्रामध्ये ०.२५ टक्क्यांची घसरण आणि निफ्टी इंडिया टुरिझममध्ये ०.२४ टक्क्यांची घसरण झाली.

सर्वाधिक वाढ निफ्टी मीडिया निर्देशांकात झाली, जो ०.९९ टक्क्यांनी वाढला. त्यानंतर निफ्टी आयटीमध्ये ०.८७ टक्क्यांची वाढ, निफ्टी फार्मामध्ये ०.७५ टक्क्यांची वाढ, निफ्टी कॅपिटलमध्ये ०.७२ टक्क्यांची वाढ आणि निफ्टी पीएसयू बँकमध्ये ०.२९ टक्क्यांची वाढ नोंदवण्यात आली.

# दंड करणार असाल तर आरटीओ ऑफिसला कुलूप लावेन, आमदार संतोष बांगर आक्रमक

हिंगोली, दि. ७ प्रतिनिधी

शिवसेना शिंदे गटाचे आमदार संतोष बांगर हे नेहमीच विविध वक्तव्यामुळं चर्चेत असतात. अशातच आज देखील संतोष बांगर यांनी फोनवर एका आरटीओ अधिकाऱ्याची लाज काढल्याचे पाहाला मिळाले. शाळकरी ऑटोला दंड लावल्याने आमदार बांगर आक्रमक झाल्याचे पाहायला मिळाले. बांगर यांनी अधिकाऱ्याला झापल्याचा व्हिडीओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे.

विद्यार्थ्यांना शाळेत घेऊन येणाऱ्या ऑटोला आरटीओ अधिकाऱ्याने मोठ्या प्रमाणात दंड ठोठावला होता. यानंतर हे ऑटोचालक आमदार संतोष बांगर यांच्याकडे गेले. त्यांनीसंबंधित आरटीओ अधिकाऱ्याची दंड मागितल्याने बांगर यांच्याकडे तक्रार केली. त्यानंतर आक्रमक झालेल्या आमदार बांगर यांनी आरटीओ अधिकाऱ्याला फोन करत चक्क त्या अधिकाऱ्याची लाज काढली आहे. अशा पद्धतीने दंड ठोकणार असाल तर मी आरटीओ ऑफिस ऑफिसला कुलूप लावून टाकेल असा सज्जड दम आमदार संतोष बांगर यांनी दिला आहे. दरम्यान, अशा पद्धतने आमदार आरटीओ अधिकाऱ्याला झपाताणाचा व्हिडिओ समाज माध्यमावर व्हायरल होत आहे.

शिवसेनेत एकनाथ शिंदे यांनी बंड पुकारल्यानंतर प्रकाशझोतात आलेले संतोष बांगर यापूर्वी अनेकवेळा आपली वादग्रस्त विधानं आणि आपल्या भूमिकांमुळे चर्चेत राहीले आहेत. शिंदे गटात सर्वांत शेवटी दाखल झालेले आमदार म्हणजे संतोष बांगर. पण त्यापूर्वी पक्षात बंड झाल्यानंतर आणि एकामोगामाग एक आमदार शिंदे गटात सामील होत असताना संतोष बांगर यांनी जाहीर कार्यक्रमात आपण उद्धव ठाकरे यांची साथ कधीही सोडणार नाही, अशी घोषणा केली होती. मात्र, त्यानंतर काही दिवसातच ते शिवसेना शिंदे गटात दाखल झाले होते. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सत्तास्थापनेचा दावा केल्यानंतर सरकारच्या विश्वासमतासाठी विशेष अधिवेशन बोलवण्यात आलं होतं. त्यावेळी अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी संतोष बांगर उद्धव ठाकरे यांच्या बाजूने होते. परंतु दुसऱ्या दिवशी एका रात्रीत संतोष बांगर यांनी ठाकरेंची साथ सोडली आणि ते शिंदे गटात सामील झाले.

## परदेशी गुंतवणूकदारांनी जुलैमध्ये विकले ३२ हजार कोटींचे शेअर्स

मुंबई, दि. प्रतिनिधी

परदेशी संस्थात्मक गुंतवणूकदारांनी (FIIs) जुलै महिन्यात भारतीय शेअर बाजारातून मोठ्या प्रमाणात पैसे काढले. ही विक्री सिंगापूर, अमेरिका, नेदरलँड्स आणि जपानमधील परदेशी गुंतवणूकदारांनी केली. या चार देशांनी मिळून जुलैमध्ये भारतीय शेअर बाजारातून २२,३५० कोटींपेक्षा जास्त पैसे काढले आहेत. सर्वात मोठा विक्रेता सिंगापूर होता. सिंगापूरच्या गुंतवणूकदारांनी शेअर बाजारातून ११,६७० कोटी रुपये आणि डेट मार्केटमधून ७,६०० कोटी रुपये काढले.

# राजवीरच्या निमित्ताने सुहास खामकरचे हिंदी सिनेसृष्टीत पदार्पण

सिनेरंग

गेल्या अनेक दिवसांपासून चर्चेत असलेल्या सुप्रसिद्ध बॉडीबिल्डर सुहास खामकर यांची प्रमुख भूमिका असलेला "राजवीर" हा आगामी हिंदी चित्रपट आज संपूर्ण भारतात प्रदर्शित होण्यास सज्ज झाला आहे. बलदंड व्यक्तिमत्त्व असलेल्या सुहास खामकरच्या रुपानं हिंदी चित्रपटसृष्टीला नवा नायक या चित्रपटाच्या माध्यमातून मिळणार आहे.

अर्थ स्टुडिओ यांनी सारा मोशन पिक्चर्स आणि रुचिका तोलानी प्रॉडक्शन्स, समृद्धी मोशन पिक्चर्स यांच्या सहकार्याने "राजवीर" चित्रपटाची प्रस्तुती केली आहे. साकार प्रकाश राऊत, ध्वनि साकार राऊत, गौरव परदासनी, सूर्यकांत बाजी चित्रपटाचे निर्माते, तर रुचिका तोलानी सूचक सहनिर्मात्या आहेत. साकार राऊत, स्वप्नील देशमुख यांनी चित्रपटाचं दिग्दर्शन केलं आहे. चित्रपटाची कथा, पटकथा, संवादलेखन साकार राऊत, जेकॉब आणि पॉल कुरियन, माज खान यांनी केलं आहे. भूषण वेदपाठक यांनी छायांकन, अभिनंदन गायकवाड, होपून सैकिया यांनी संगीत दिग्दर्शन केले आहे. चित्रपटात सुहास खामकरसह झाकीर हुसैन, गौरव परदासनी, प्राशी अवस्थी, धीरज सानप यांच्या प्रमुख भूमिका आहेत."राजवीर" या चित्रपटात एका आयपीएस अधिकाऱ्याची गोष्ट दाखवण्यात आली आहे. अत्यंत तडफदार व्यक्तिमत्त्व असलेल्या सुहासनं राजवीर ही भूमिका साकारली आहे. चित्रपटाच्या ट्रेलरमध्ये सुहास खामकर अर्थातच "राजवीर"चा दमदार अभिनय दिसतो आहे. चित्रपटाचा ट्रेलर आणि सुहास खामकरचं तडफदार व्यक्तिमत्त्व पाहूनच चित्रपटाविषयी आता चांगलीच उत्सुकता निर्माण झाली आहे




## लोकरंजन




## 'दशावतार'मध्ये दर्जेदार कलाकारांची फौज!

मराठी चित्रपटसृष्टीत भव्यतेचं नवं पर्व घेऊन येणाऱ्या 'दशावतार' या आगामी चित्रपटाचा जबरदस्त टीझर नुकताच प्रदर्शित झाला असून, प्रेक्षकांच्या उत्सुकतेला चांगलंच उधाण आलं आहे. प्रतिभावान अभिनेते दिलीप प्रभावळकर यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधत टिझर प्रदर्शित करण्यात आला आहे. झी स्टुडिओज प्रस्तुत, ओशन फिल्म कंपनी आणि ओशन आर्ट हाऊस निर्मित या चित्रपटात मराठीतील दिग्गज आणि अत्यंत ताकदीचे कलाकार एकत्र आले असून दिलीप प्रभावळकर, महेश मांजरेकर, भरत जाधव, विजय केंकरे, सुनील तावडे, रवी काळे, सिद्धार्थ मेनन, प्रियदर्शिनी इंदलकर आणि अभिनय बेर्डे अशा दर्जेदार कलाकारांची मांदियाळी या चित्रपटाच्या टिजरमध्ये दिसून आली आहे.

'दशावतार' हा चित्रपट केवळ एक सस्पेन्स थ्रिलर नसून, भावनांचा, रूढी परंपरांचा, पारंपरिक लोककलेचा आणि आधुनिक आव्हानांचा खेळ असावा असं या टिझरमधून लक्षात येत आहे. टीझरमध्ये दाखवलेली दृश्ये गूढता, भव्यता आणि थरार निर्माण करणारी आहेत. प्रत्येक पात्राची झलक दाखवणारा हा टिझर प्रेक्षकांना खिळवून ठेवणारा आणि चित्रपटाची उत्सुकता अधिक ताणणारा आहे. कोकणातील भव्य निसर्ग दृश्ये, दशावतारी कलेशी संबंधित दृश्य आणि घनदाट अरण्य पाहून हा नेहमीपेक्षा वेगळा अनुभव देणारा चित्रपट असेल याची खात्री पटते आहे. चित्रपटाचे लेखक व दिग्दर्शक सुबोध खानोलकर आहेत. येत्या १२ सप्टेंबरला 'दशावतार' हा चित्रपट प्रदर्शित होणार आहे.

## स्टार प्लसवर 'स्टार परिवार बहन का ड्रामा, भाई का स्वॅग' सह रक्षाबंधन

टेलीरंग

टीव्हीच्या पडद्यावर सांस्कृतिक क्षण उलगाडणाऱ्या, स्टार प्लस या वाहिनीने भारतीय सण भव्यतेने आणि भावनेचा स्पर्श देऊन साजरे करण्याची आपली परंपरा चालू ठेवली आहे. यंदा रक्षाबंधनाच्या निमित्ताने ही वाहिनी 'स्टार परिवार बहन का ड्रामा, भाई का स्वॅग' नावाने एक मनोरंजक चमकदार प्रहसन सादर करणार आहे, ज्यामध्ये नाट्य, डान्स आणि भावंडांच्या प्रेमाची भावना ओतप्रोत असेल.अलीकडेच प्रदर्शित झालेल्या या प्रोमोमध्ये स्टार कलाकारांनी नटलेल्या या प्रहसनाची झलक बघायला मिळत आहे. या रजनीची होस्ट आहे अनुपमा.

यात 'ये रिश्ता क्या कहलाता है' मालिकेतील अरमान आणि 'अनुपमा' मधील प्रेम यांच्यात एक अनपेक्षित आणि जोरदार टक्कर होणार आहे.




हे दोन्ही कलाकार आपल्या दमदार परफॉर्मन्सने मंच दणाणून सोडतील आणि झनकचा भाऊ बनण्याचा सन्मान मिळवण्यासाठी कटिबद्ध दिसतील.

रक्षाबंधनाच्या वातावरणात भाऊ असण्याची जी गौरवपूर्ण भावना असते, त्याच्या अनुरोधाने या दृश्याचे सर्जन कलात्मकतेने करण्यात आले आहे. नाट्यमयता आणि जोरदार कोरिओग्राफीसह हे दोघे स्पर्धक या परफॉर्मन्समध्ये आपली खास शैली आणि आपले अनोखे व्यक्तिमत्व घेऊन येतील. हा ॲक्ट पाहताना एक प्रश्न प्रेक्षकांच्या मनात उद्भवेल की, झनकचा भाऊ म्हणून सरतेशेवटी कुणाची निवड होणार? गंमतीशीर कथानकातील खेळकर चढाओढ आणि अनपेक्षित कलाटण्या प्रेक्षकांची उत्कंठा वाढवतील.पहात रहा, 'स्टार परिवार बहन का ड्रामा, भाई का स्वॅग' ९ ऑगस्टला रात्री ७ वाजता, केवळ स्टार प्लसवर.

संकलन –संयोजन
**सुबोध रणशेवरे**
संपर्क -९८३३१४६३५६
ईमेल -subodh.ranshevre @rediffmail.com

# 15 ऑगस्टच्या पार्श्वभूमीवर दहशतवादी हल्ल्याचा धोका

नवी दिल्ली, दि. ७ वृत्तसंस्था

भारताच्या स्वातंत्र्य दिनाच्या पार्श्वभूमीवर दिल्लीत सुरक्षा यंत्रणांनी मोठा इशारा जारी केला आहे. खलिस्तानी दहशतवादी संघटना 'शीख फॉर जस्टिस' १५ ऑगस्ट रोजी दिल्लीत मोठा दहशतवादी हल्ला घडवून आणण्याच्या तयारीत असल्याची माहिती मिळाली आहे. यामुळे दिल्लीत हाय अलर्ट जारी करण्यात आला असून, सर्व सुरक्षा यंत्रणांना सतर्क राहण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, सीमेपलीकडून दिल्लीला लक्ष्य करण्यासाठी अत्याधुनिक शस्त्रास्त्रांचा साठा आणला जात आहे. यामध्ये एके ४७ , आरडीएक्स आणि हँडग्रेनेड यांसारख्या घातक शस्त्रांचा समावेश आहे. सुरक्षा यंत्रणांना मिळालेल्या माहितीनुसार, शीख फॉर जस्टिसचा प्रमुख गुरपतवंत सिंग पन्नू याच्या सूचनेनुसार हे स्लीपर सेल दिल्लीतील वातावरण बिघडवण्याचा प्रयत्न करत आहेत.

मिळालेल्या गुप्त माहितीनुसार, १५ ऑगस्टच्या निमित्ताने हे स्लीपर सेल लाल किल्ला आणि संवेदनशील भागातील मेट्रो स्थानकांवर खलिस्तान समर्थक घोषणा लिहून दहशत निर्माण करण्याचा कट रचत आहेत. यामुळे सुरक्षेच्या दृष्टीने दिल्लीतील संवेदनशील ठिकाणी विशेष खबरदारी घेण्यात येत आहे.

या धोक्याच्या पार्श्वभूमीवर, दिल्ली पोलिसांनी त्यांच्या सर्व जिल्ह्यांना, तसेच गुन्हे शाखेच्या विशेष कक्षाला सतर्क ठेवले आहे. शीख फॉर जस्टिसच्या कारवायांवर बारकाईने लक्ष ठेवण्याची जबाबदारी स्पेशल सेलकडे देण्यात आली आहे. संभाव्य हल्ल्याचा कट हाणून पाडण्यासाठी सुरक्षा यंत्रणा पूर्णपणे सज्ज असून, प्रत्येक हालचालीवर बारकाईने नजर ठेवली जात आहे.

# भारतानेही अमेरिकी मालावरील टॅरिफ १७ टक्क्यांवरून ५० टक्के करावे ; शशी थरूरांचा सल्ला

नवी दिल्ली, दि. ७ प्रतिनिधी

रशियाकडून तेल खरेदी करत असल्याबद्दल दंड म्हणून अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी बुधवारी भारतावर २५ टक्के अतिरिक्त आयातशुल्क लादले आहे. यावर राजकीय वर्तुळातून प्रतिक्रिया येण्यास सुरूवात झाली आहे. काँग्रेसचे नेते आणि खासदार शशी थरूर यांनी गुरूवारी अमेरिकेने भारतावर २५ टक्के अतिरिक्त आयातशुल्क लावण्यावरून टीका केली आहे. तसेच त्यांनी अमेरिकेला जशास तसे उत्तर दिले जावे आणि भारताने देखील अमेरिकेवर ५० टक्के व्यापार शुल्क लादावे असे म्हटले आहे.

"आपण देखील अमेरिकन मालावर ५० टक्के आयातशुल्क लादले पाहिजे," असे शशी थरूर म्हणाले. पुढे बोलताना थरूर म्हणाले की, "मला वाटते की, अमेरिकन वस्तूंवर सरासरी भारताकडून लावला जाणारा कर १७ टक्के आहे, म्हणून जर ते ५० टक्के कर लादत असतील तर प्रत्युत्तर म्हणून आपण तरी १७ वर का थांबावे?



आपणही तो ५० (टक्के) पर्यंत वाढवले पाहिजे."

अमेरिकेने लादलेल्या ५० टक्के टॅरिफच्या संभाव्य परिणामाबद्दल बोलताना थरूर म्हणाले की, "याचा परिणाम होईल कारण आपला व्यापार ९० अब्ज डॉलर्सचा आहे. जर वस्तू ५० टक्क्यांनी महाग झाल्या तर लोक त्या विकत घेण्याआधी विचार करतील. जर व्हियचनाम, इंडोनेशिया, पाकिस्तान, बांगलादेश, चीन हे आपले स्पर्धक कमी किमतीत माल विकतील... तर त्याचा परिणाम होईल."

थरूर यांनी भारतावर ५० टक्के शुल्क लादण्याच्या निर्णयावर देखील प्रश्न उपस्थित केला. ते म्हणाले, की यामागे अमेरिकेचा काहितरी 'छुपा संदेश' आहे."रशियाकडून तेल आणि पेट्रोलियम पदार्थ विकत घेतल्याचे कारणामुळे २५ टक्के अतिरिक्त शुल्क वाढवण्यात आले आहे, दुसरीकडे चीन हा जवळपास दुप्पट खरेदी करत आहे... आणि त्यांना ९० दिवस देण्यात आले आहेत, तर भारताला फक्त तीन आठवडे देण्यात आले आहेत. यामुध्ये वॉशिंटनचा काहीतरी छुपा संदेश असल्याचे दिसून येते. सरकारने काळजीपूर्वक परिस्थिती लक्षात घेऊन उत्तर दिले पाहिजे."

भारत रशियाकडून तेल खरेदी करून एका अर्थी युक्रेनविरोधात पुकारलेल्या युद्धाला मदत करतो, असा आरोप करत २४ तासांत भारतावर भरमसाठ आयातशुल्क लादण्याची धमकी ट्रम्प यांनी मंगळवारी दिली होती. ही धमकी खरी करून दाखवत त्यांनी बुधवारी अतिरिक्त कराच्या आदेशावर स्वाक्षरी केली.

# मी हवे तर पालकमंत्रीपद सोडतो- अजितदादा बीडकरांवर संतापले

बीड, दि. ७ प्रतिनिधी

उपमुख्यमंत्री अजित पवारांनी गुरुवारी बीड शहरातील चंपावती क्रीडा मंडळ, कंकालेश्वर मंदिर आणि जिल्हा रुणालय येथे सुरू असलेल्या व प्रस्तावित विकासकामांची पाहणी केली. यावेळी त्यांनी शहरात सुरु असलेल्या कामांचा आढावा घेत, संबंधित अधिकाऱ्यांकडून सविस्तर माहिती जाणून घेतली. दरम्यान यावेळी अजित पवार काहीसे संतापलेलेही दिसले. त्यांनी संताप व्यक्त करताना मी हवं तर पालकमंत्रीपद सोडतो असा इशारा दिला. तसंच माझ्याकडे जादूची कांडी नाही, तुम्ही सहकार्य करा असं आवाहनही केलं.

अजित पवार जिल्हा क्रीडा संकुलावर पोहोचल्यानंतर तिथे उपस्थित असलेले काही खेळाडू आणि ज्येष्ठ नागरिकांनी विविध सूचना आणि समस्या मांडल्या. यावेळी अजित पवार यांनी याआधी तुम्ही ज्या लोकप्रतिनिधींना निवडून दिलं, त्यांनी काहीच केलं नाही. आता मला कोणाचे काही काढायचे नाही. परंतु मी करायला लागलो, तर मलाच ढुसण्या मारायला लागले. माझ्याकडे काही जादूची कांडी नाही. तुम्ही सहकार्य करा. मी पण सहकार्य करतो. नाहीतर मी परत जातो. मग कुणाला पालकमंत्री करायचं असेल, त्यांना पालकमंत्री करा, अशा शब्दांत संताप व्यक्त केला.

अजित पवारांनी एक्सवर पोस्ट करत सांगितलं आहे की, "आज बीड शहरातील चंपावती क्रीडा मंडळ, कंकालेश्वर मंदिर आणि जिल्हा रुग्णालय येथे सुरू असलेल्या व प्रस्तावित विकासकामांची पाहणी केली. शहरात सुरु असलेल्या कामांचा आढावा घेत, संबंधित अधिकाऱ्यांकडून सविस्तर माहिती जाणून घेतली. प्रत्येक प्रकल्पात



आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून, कामांची गुणवत्ता, टिकावूपणा आणि वेळेचं नियोजन यावर भर द्यावा, असे स्पष्ट निर्देश दिले".

"कंकालेश्वर मंदिर येथे पाहणी करताना संबंधित अधिकाऱ्यांकडून कामाची माहिती घेतली. हे देवस्थान बीड शहरासह जिल्ह्यातील भाविकांचं श्रद्धास्थान आहे. यानिमित्तानं कंकालेश्वर मंदिरात जाऊन महादेवाचे मनोभावे दर्शन घेतले. कंकालेश्वर देवस्थान परिसरात नव्यानं सुरू करण्यात येणाऱ्या विकास कामांमध्ये पारंपरिक व आधुनिकतेचा संगम साधत बीडकरांना कायम स्मरणात राहील. तसंच बीडच्या वैभवात भर घालणारी, दर्जेदार कामं करावी. विकासकामं करताना ती कामं गुणवत्तापूर्ण, टिकाऊ आणि वेळेत पूर्ण होतील, याकडे लक्ष द्यावं. भाविकांना सर्व सोयीसुविधा मिळतील अशा सर्व बाबींचा आराखड्यामध्ये समावेश करावा, अशा सूचना दिल्या," असंही त्यांनी सांगितलं आहे.

"जिल्हा क्रीडा संकुलाच्या कामाची माहिती घेतली. क्रीडा संकुलाच्या कामामुळे बीडकर नागरिकांना सुसज्ज क्रीडा संकुल उपलब्ध होणार आहे. यासाठी नागरिकांनी सहकार्य करावं, क्रीडा संकुलालगत असलेला संपूर्ण परिसर स्वच्छ करावा, या परिसरात कुठेही कचरा दिसणार नाही याबाबत नगरपालिका प्रशासनानं दक्षता घ्यावी, असे निर्देश दिले," अशी माहिती त्यांनी दिली.

## सीआरपीएफ जवानांचे वाहन २०० फूट खोल दरीत कोसळले, तिघांचा मृत्यू; १५ जखमी



उधमपूर, दि. ७ वृत्तसंस्था

जम्मू - काश्मीरच्या उधमपूरमध्ये मोठी दुर्घटना घडली आहे. केंद्रीय राखीव पोलीस दलाच्या (सीआरपीएफ) जवानांना घेऊन जाणारं एक वाहन खोल दरीत कोसळलं आहे. या दुर्घटनेत तीन जवानांचा मृत्यू झाला असून १५ हून अधिक जवान जखमी झाले आहेत. जखमी जवानांना रुग्णालयात दाखल करण्यात आलं असून त्यांच्यावर उपचार चालू आहेत. दरम्यान, स्थानिक लोक व पोलिसांनी बचावकार्य सुरू केलं आहे.

केंद्रीय राखीव पोलीस दलाच्या १८७ व्या बटालियनची बस उधमपूर जिल्ह्यातील कदवा येथील बसंत गढाचा घाट चढत असताना २०० फूट खोल दरीत कोसळली. या अपघातात तीन जवानांचा मृत्यू झाला असून १५ हून अधिक जवान जखमी झाले आहेत.

सर्व जखमी जवानांना एअरलिफ्ट करून उधमपूरमधील भारतीय लष्कराच्या रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. दरम्यान, या दुर्घटनेचं कारण अद्याप समोर आलेलं नाही.

## स्वदेशी MALE ड्रोनची लष्करात एन्ट्री

नवी दिल्ली, दि. ७ वृत्तसंस्था

भारतीय लष्कराच्या ताफ्यात आता लवकरच स्वदेशी बनावटीचे MALE (Medium Altitude Long Endurance) सशस्त्र ड्रोन दाखल होणार आहेत. संरक्षण मंत्रालयाने 87 सशस्त्र MALE ड्रोन खरेदी करण्याच्या प्रस्तावाला मंजुरी दिली असून, यासाठी सुमारे२० हजार कोटींच्या निधीची तरतूद करण्यात आली आहे. ही खरेदी 'मेक इन इंडिया' धोरणांतर्गत होणार



असून ६० टक्के स्वदेशी तंत्रज्ञान वापरले जाईल.

त्यामुळे २०२९ नंतरच मिळणाऱ्या अमेरिकेच्या MQ-9B Predator ड्रोनच्या तुलनेत हे स्वदेशी ड्रोन लवकर भारतीय लष्कराच्या वापरात येणार आहेत. MALE म्हणजे मध्यम उंचीवर आणि दीर्घ काळपर्यंत उड्डाण करणारे सशस्त्र ड्रोन. हे ड्रोन सुमारे ३०००० ते ३५००० फूट उंचीवर तब्बल ३० तासांहून अधिक काळ हवेत राहू शकतात. हे केवळ निगराणी (surveillance) आणि गुप्तचर माहिती (intelligence) गोळा करत नाहीत, तर आवश्यक तेव्हा अत्यंत अचूक क्षेपणास्त्रांनी हल्लाही करू शकतात.

## आधी १२ हजार जणांना नारळ आणि आता पगारवाढीची घोषणा, टीसीएसमधील ८० टक्के कर्मचाऱ्यांसाठी गुड न्यूज

बंगळुरू, दि. ७ वृत्तसंस्था

भारतातील सर्वात मोठी आयटी सेवा कंपनी टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेसने नुकताच १२ हजार कर्मचाऱ्यांना कामावरुन काढून टाकण्याचा निर्णय जाहीर केला होता. आता त्यांनी त्यांच्या कर्मचाऱ्यांचा पगार १ सप्टेंबरपासून वाढवणार असल्याचे जाहीर केले आहे. याबाबतचे वृत्त मनीकंट्रोलने दिले आहे.

टीसीएसचे सीएचआरओ मिलिंद लक्कड आणि सीएचआरओ के सुदीप यांनी कर्मचाऱ्यांना पाठवलेल्या ईमेलमधून याची माहिती दिली आहे. या पगारवाढीचा फायदा सुमारे ८० टक्के कर्मचाऱ्यांना होईल.

ही पगारवाढ ज्युनियर ते मध्यम दर्जाच्या कर्मचाऱ्यांसाठी लागू असेल. ज्यात कंपनीच्या ८० टक्के कर्मचाऱ्यांचा समावेश असणार आहे. कंपनीने म्हटले आहे की C3A पर्यंतच्या ग्रेड्स आणि त्याच्या समकक्ष पातळीवरील कर्मचाऱ्यांच्या पगारात सुधारणा केली जाणार आहे.

"आम्हाला C3A आणि समतुल्य श्रेणीतील सर्व पात्र सहकाऱ्यांच्या पगारात सुधारणा जाहीर करताना आनंद होत आहे, ज्यात आमच्या ८० टक्के कर्मचाऱ्यांचा समावेश आहे. ही पगारवाढ १ सप्टेंबर २०२५ पासून लागू होईल," असे कर्मचाऱ्यांना पाठवलेल्या ईमेलमध्ये म्हटले आहे.

सदर कंपनीने नेमकी किती पगारवाढ होईल? याबाबत अचूक माहिती दिलेली नाही. गेल्यावेळी कामाच्या मूल्यांकन प्रक्रियेत, टीसीएसने एप्रिल २०२४ पासून सर्वोत्तम कामगिरी करणाऱ्या कर्मचाऱ्यांना वार्षिक ४.५ टक्के ते ७ टक्के पगारवाढ दिली होती. "आम्ही याची पुष्टी करू शकतो की आम्ही आमच्या सुमारे ८० टक्के कर्मचाऱ्यांना १ सप्टेंबर २०२५ पासून पगारवाढ देणार आहोत," असे कंपनीने जारी केलेल्या एका निवेदनात म्हटले आहे.

महासागर NASHIK Printed by S R PUBLICATION, Published by Shrikrishna Tansukhdas Chandak on behalf of Shrikrishna Tansukhdas Chandak, printed at GODOWN NO. 8, 9, 10, Mohan Arjun Compound, Near Ghartan Pada, Vaishali Nagar, Last Bus Stop, Dahisar (East), Mumbai Suburban, Maharashtra - 400068 and published at Plot No. 5, Anandi Bungalow, Kotwal Park, Tilakwadi, Dhamankar Corner, Nashik, Maharashtra - 422002.
Editor: Shrikrishna Tansukhdas Chandak. Resident Editor- Jayant Mahajan. PRGI Registration No.MHMAR/25/A0219

महासागर नाशिक मुद्रक एस. आर. पब्लिकेशन, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक, यांच्या वतीने श्रीकृष्ण तनसुखदास चांडक द्वारे प्रकाशित. मुद्रण स्थळ – गोडाऊन क्र. ८, ९, १०, मोहन अर्जुन कंपाउंड, घर्तन पाडा जवळ, वैशाली नगर, शेवटचा बस स्टॉप, दहिसर (पूर्व), मुंबई उपनगर, महाराष्ट्र – ४०००६८. प्रकाशन स्थळ – प्लॉट क्र. ५, आनंदी बंगलो, कोतवाल पार्क, टिळकवाडी, धमणकर कॉर्नर, नाशिक, महाराष्ट्र – ४२२००२. संपादक: श्रीकृष्ण तनसुखदास चांडक. निवासी संपादक – जयंत महाजन. PRGI नोंदणी क्रमांक: MHMAR/25/A0219